**(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

[२०२२]१० एस. सी. आर. ४६५

दि स्टेट ऑफ महाराष्ट्र.

– विरुद्ध –

६३ मून्स टेक्नॉलॉजीज लिमिटेड.

(दिवाणी अपील क्रमांक २७४८-४९/२०२२)

२२ एप्रिल २०२२

**[मा. न्या. डॉ. धनंजय वाय. चंद्रचूड, मा. न्या. सूर्य कांत आणि मा.न्या. बेला एम. त्रिवेदी]**

*महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९: कलम २(सी), २(डी) ४ आणि ५ -एन.एस.ई.एल.(NSEL), वित्तीय संस्था आहे किंवा नाही- एन.एस.ई.एल.(NSEL)कंपनीच्या समभागधारांपैकी उत्तरवाद्यांकडे ९९.९९% टक्के समभाग आहेत- एन.एस.ई.एल.(NSEL) ने कमोडिटीज (विक्रेय वस्तू) मधील स्पॉट ट्रेडिंगचे एक्सचेंज म्हणून काम सुरू केले- त्याने वेगवेगळ्या सेटलमेंट कालावधीसह त्याच्या व्यापार प्लॅटफॉर्मवर कमोडिटीज (विक्रेय वस्तू)ची खरेदी आणि विक्री करण्यासाठी करार सुरू केले- त्यानंतर, एन.एस.ई.एल.(NSEL)च्या व्यापार प्लॅटफॉर्मवर १३,००० हून अधिक विक्रेते/ गुंतवणूकदारांना देय असलेल्या ५५०० कोटी रुपयांच्या सेटलमेंट चा समावेश असलेली फसवणूक झाली- एन.एस.ई.एल.(NSEL) ने थकबाकी भरण्यात कसूर केला - कारण त्याच्याकडे कलम ४ अन्वये च्या जप्तीसाठी पुरेसे पैससे किंवा मालमत्ता उपलब्ध नव्हती म्हणून ९९.९९% टक्के समभाग असलेल्या उत्तरवाद्यांच्या मालमत्ता राज्य शासनाने जप्त केल्या- कलम २ (सी) अंतर्गत एन.एस.ई.एल.(NSEL)वित्तीय संस्था नव्हे ह्या आधारावरची, एम.पी.आय.डी.(MPID) अधिनियम लागू करण्याला आवाहन देणारी उत्तरवाद्यांच्या याचिका - एन.एस.ई.एल.(NSEL) मुंबई शेअर बाजाराप्रमाणेच केवळ सुविधा पुरवठादाराची भूमिका बजावली असे म्हणणारी अधिसूचना उच्च न्यायालयाने रद्दबातल केली - एन.एस.ई.एल.(NSEL) ने मुदत पूर्णतेनंतर परत करण्याच्या बंधनासह पैसा घेतले नाहीत; विक्री करणाऱ्या सदस्यांकडून खरेदी करणाऱ्या सदस्य व्ही.ए.टी.(VAT) घेतात आणि एन.एस.ई.एल.(NSEL) द्वारे टी.डी.एस.(TDS) कापला जात नाही हे तथ्य हे दर्शविते की एन.एस.ई.एल.(NSEL) हा केवळ पास-थ्रू प्लॅटफॉर्म आहे; हे की*

*एन.एस.ई.एल.(NSEL)ला  कलम २(सी)  अंतर्गत कोणतीही ठेव प्राप्त झाली नाही, कारण एन.एस.ई.एल.(NSEL) ला  ठेव म्हणून वस्तू किंवा पैसे मिळाले नाही; हे की एन.एस.ई.एल.(NSEL) ला केवळ व्यवहार आणि वखार शुल्क मिळाले जे 'ठेव' मानले जाऊ शकत नाहीत, त्यामुळे एन.एस.ई.एल.(NSEL) ही 'वित्तीय संस्था' नाही- अपील केल्यावर असे म्हटले गेलेः एन.एस.ई.एल.(NSEL) ही एक वित्तीय संस्था आहे- एम.पी.आय.डी.(MPID) अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत जारी केलेली आक्षेपित अधिसूचना ज्या उत्तरवाद्यांच्या मालमत्ता जप्त करतात त्या वैध आहेत - एन.एस.ई.एल.(NSEL)ला सेटलमेंट गॅरंटी फंडच्या स्वरूपात 'पैसे' मिळतात ज्याचा परतावा  पैसे आणि सेवा ह्या द्वारे दिला जातो- एस.जी.एफ.(SGF) कलम २(सी) च्या अपवादांमध्ये मोडत नाही, त्यामुळे ते कलम २(सी) अन्वये 'ठेव' ह्या शब्दप्रयोगामध्ये येईल. - एन.एस.ई.एल.(NSEL) वस्तु प्राप्त करण्याच्या बदल्यात ३ सामुदायिक  सेवा देते- वस्तु प्राप्त करणे आणि मान्यता प्राप्त वखरांमध्ये ठेवणे ही कलम २(सी) अंतर्गत 'ठेव' आहे - अशा प्रकारे, उच्च न्यायालयाने असे मत मांडण्यात चूक केली की जर परताव्या मध्ये व्याज, बोनस किंवा इतर कोणताही अतिरिक्त लाभ असेल तरच तो एम.पी.आय.डी. (MPID) अधिनियमाअंतर्गत 'ठेव' असेल- उच्च न्यायालयाने एम.पी.आय.डी.(MPID) अधिनियमाच्या हितकारक उद्देशाचा कोणताही संदर्भ न देता 'ठेव' ह्या शब्दाची संकुचित व्याख्या विचारात घेतली - अशा प्रकारे, उच्च न्यायालयाने दिलेला आदेश रद्द केला जातो.*

*कलम २(सी) आणि २(डी)- ठेव आणि वित्तीय संस्थेच्या व्याख्यांचे अर्थबोधन.*

*कलम २(सी) -सेटलमेंट गॅरंटी फंड-च्या अंतर्गत 'ठेव'चे स्पष्टीकरण.*

*कलम २(सी) -ठेव -वस्तूंची मिळकत -ग्राह्य धरले:  वस्तूंची मिळकत आणि वस्तू (जेव्हा सदस्यांना अर्थापन्न कब्ज्या दिला जाते) मान्यताप्राप्त वखारा मध्ये  ठेवणे ही 'ठेव' आहे.*

**अपील मंजूर करताना न्यायालयाचे**

**असे म्हणणे आहे की: १.१ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ४ अंतर्गत उत्तरवादिंच्या मालमत्तांची जप्ती करणारी अधिसूचना जारी करण्यात आली होती. कलम ४ मध्ये केवळ त्या परिस्थितींचा समावेश आहे जेथे वित्तीय संस्था कसूरदार संस्था आहे. [परिच्छेद– ३०[५०५- जी]**

१.२ वित्तीय संस्थेची व्याख्या 'ठेव स्वीकारणारी कोणतीही व्यक्ती' अशी केली जाते. या व्याख्येच्या कक्षेत(अ) राज्य किंवा केंद्र सरकारद्वारे नियंत्रित किंवा मालकीची असलेली महामंडळ किंवा सहकारी संस्था; आणि (ब) बँक व्यवसाय विनियमन अधिनियम १९४९ च्या कलम ५(सी) अंतर्गत परिभाषित केलेली बँकिंग कंपनी यांचा समावेश नाही. एन.एस.ई.एल. (NSEL) कोणत्याही अपवादांतर्गत येत नसल्यामुळे, जर ती ठेव स्वीकारणारी व्यक्ती असेल तर अधिनियमाच्या संदर्भात ती 'वित्तीय संस्था' असेल. सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम १८९७ चे कलम ३(४२) निगमित आणि अनिगमित अशा दोन्ही कंपन्यांचा समावेश करण्यासाठी 'व्यक्ती' ची सर्वसमावेशक व्याख्या प्रदान करते. एम.पी.आय.डी.(MPID) अधिनियमाच्या कलम २(सी) मध्ये ‘ठेव’ अभिव्यक्तीची व्याख्या केली आहे. ‘ठेव’ शब्दप्रयोगाच्या वैधानिक व्याख्येमध्ये खालील घटकांचा समावेश आहेः (१) पैश्यांची प्राप्ती किंवा वित्तीय संस्थेद्वारे मौल्यवान वस्तूंचा स्वीकार; (२) असा स्वीकार हा रोख रक्कम किंवा वस्तु विनिर्दिष्ट मुदतीनंतर किंवा अन्यथा परत करणे आवश्यक असल्याच्या अधीन असली पाहिजे; आणि (३) पैसे किंवा वस्तुची परतफेड, रोख, तितक्या किमतीचा इतर प्रकारचा मोबदला/वस्तू किंवा विशिष्ट सेवेच्या स्वरूपात, व्याज, बोनस, नफा किंवा इतर कोणत्याही स्वरूपात कोणत्याही लाभासह किंवा त्याशिवाय असू शकते. व्याख्येच्या या घटकांनंतर खंड (i) ते (vii) मध्ये विचारात घेतलेल्या विशिष्ट अपवादांचा समावेश आहे. अपवादांच्या खंड (i) मध्ये अशी रक्कम आहे जी भारतीय प्रतिभूती आणि विनियम मंडळाने (सेबी) घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे आणि केलेले विनियम यांच्या कक्षेत येणाऱ्या भाग भांडवलाद्वारे किंवा ऋणपत्र, रोखा किंवा कोणताही अन्य संलेख ह्याद्वारे उभारली जाते. खंड (v) मध्ये असे म्हटले आहे की प्रतिभूति ठेव, डिलरशिप ठेव, इसाऱ्याची रक्कम किंवा वस्तू किंवा सेवांच्या नोंदविण्यात आलेल्या मागणीसंबंधात आगाऊ दिलेली रक्कम, ह्या स्वरूपात प्राप्त झालेल्या रकमा वगळल्या जातील. कलम (i) ते (vii) मधील अपवर्जन सूचित करतात की जे व्यवहार अन्यथा व्याख्येच्या व्यापक व्याप्तीमध्ये येतात ते वगळले जातात.[परिच्छेद ३१] [५०६-एफ-जी; ५०७-ए; ५०८-बी-एफ]

१.३ 'ठेव' ह्या शब्दाच्या व्याख्येमध्ये 'समावेश होतो' आणि 'नेहमीच तसा समावेश असल्याचे मानण्यात येईल' या वाक्यांशाचा वापर झाला आहे. याचा अर्थ एक वैध कल्पित

तयार करणे आहे ज्याद्वारे वाक्यांशाच्या नैसर्गिक अर्थाने समाविष्ट नसलेल्या कृतींचा समावेश करणे. 'ठेव' या शब्दाची व्याख्या करताना 'समावेश होतो' आणि 'नेहमीच तसा समावेश असल्याचे मानण्यात येईल' याचा एकत्रित वापर हा शब्द सर्वसमावेशक बनवतो आणि निर्बंधक नाही. [परिच्छेद ३२] [५०९-ए-बी]

१.४ 'ठेव' या शब्दाची कक्षा आणि व्याप्ती स्पष्टपणे व्यापक आहे कारण त्यात केवळ पैसा प्राप्तीच नाही तर कोणत्याही योजना किंवा व्यवस्थेअंतर्गत वित्तीय संस्थांद्वारे कोणत्याही मौल्यवान वस्तुचा स्वीकार देखील समाविष्ट होतो. 'कोणतीही' हा शब्दप्रयोग 'ठेव' या संज्ञेच्या मूळ भागात पाच प्रसंगी वापरला जातो; (i) कोणताही पैसा; (ii) कोणतीही मौल्यवान वस्तू; (iii) कोणत्याही वित्तीय संस्थेने; (iv) कोणत्याही लाभासह किंवा त्याशिवाय; आणि (v)कोणत्याही अन्य स्वरूपात. [परिच्छेद ३३] [५०९-बी-ई]

१.५ वरील दोन्ही शब्दप्रयोग परिभाषित करताना अधिनियमाने 'कोणतीही' या शब्दप्रयोगाचा वारंवार वापर करणे हे अधिनियमाच्या नियामक तरतुदींचे जाळे व्यापक आणि सर्वसमावेशक पद्धतीने टाकण्याच्या विधानमंडळाच्या हेतूचे स्पष्ट प्रतिबिंब आहे. या क्षेत्रावर नियंत्रण ठेवणाऱ्या इतर अनेक राज्य कायद्यांप्रमाणे, एम.पी.आय.डी.(MPID) अधिनियमाच्या कलम २ खंड (सी) चा अर्थ केवळ पैसा प्राप्तीच नव्हे तर कोणत्याही मौल्यवान वस्तुची ठेव असा आहे.[परिच्छेद ३५] [५०९-एफ-जी]

१.६ कलम २(सी) च्या दुसऱ्या घटकानुसार, पैसा किंवा वस्तु परत करण्यासाठी जबाबदार असणे आवश्यक आहे. तथापि, असे परतावे, रोख रक्कम किंवा वस्तूच्या स्वरूपात असणे आवश्यक नाही, तर व्याजासारख्या कोणत्याही लाभासह किंवा त्याशिवाय सेवेच्या स्वरूपात असू शकते. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की कलम २(सी) च्या खंड (v) मध्ये असे म्हटले आहे की प्रतिभूति ठेव, डीलरशिप ठेव किंवा आगाऊ पैसा म्हणून केलेल्या पैस्यांच्या किंवा वस्तुंच्या 'ठेव' या शब्दाच्या व्याख्येतून वगळल्या आहेत. उदाहरणार्थ, जर एखाद्या वित्तीय संस्थेचा सदस्य रु.२५,००० 'ठेव' म्हणून जमा करतो आणि सदस्यत्वाची समाप्ती झाल्यावर, वजा करून ते पैसे परत करतो, तर ती 'ठेव' प्रतिभूति ठेव आहे, की, कलम २(सी) मध्ये मोडणाऱ्या स्वरूपाची आहे हा मुद्दा वित्तीय संस्थेच्या कामकाजाच्या आणि कामकाजाच्या संरचनेच्या संदर्भ घेऊन निश्चित केला पाहिजे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की या व्याख्येत असेही म्हटले आहे की परतावा

व्याजासह किंवा व्याजाविना किंवा कोणत्याही लाभासह असू शकतो. त्यामुळे, एन.एस.ई.एल.(NSEL) ने आपल्या निवेदनाद्वारे त्याच्या प्लॅटफॉर्म वरील व्यापारावर १६% परतावा मिळण्याची हमी दिली होती की नाही यावर दोन्ही बाजूंनी केलेले निवेदन, एन.एस.ई.एल.(NSEL) ने ठेवी स्वीकारल्या की नाही हे ठरवण्याच्या उद्देशाने महत्त्वाचे नाही. [परिच्छेद ३६] [५१०-ब-ई]

१.७ उपनियमांवरून स्पष्ट होते की एन.एस.ई.एल.(NSEL) ला व्यापारी सदस्यांकडून पैसा आणि वस्तू दोन्ही मिळतात. एन.एस.ई.एल.(NSEL) च्या या प्राप्तीनां 'ठेव' मानले जाऊ शकते की नाही हे ठरविण्यासाठी, 'परताव्याची' चाचणी पूर्ण करावी लागेल. चाचणी अशी आहे की परतावा रोख रक्कम, वस्तू किंवा सेवे च्या स्वरूपात असेल. 'परतावा' व्याज, बोनस किंवा नफ्याच्या लाभासह असावा हे आवश्यक नाही. त्यामुळे, जर वित्तीय संस्था कोणत्याही वाढीशिवाय ठेव परत करण्यास बांधील असेल, तरीही ती एम.पी.आय.डी.(MPID)अधिनियमाच्या कलम २(सी) च्या कक्षेत येईल, परंतु ठेव कोणत्याही अपवादात मोडणार नाही. प्रासंगिकतेचा अपवाद म्हणजे खंड (v) ज्यामध्ये असे म्हटले आहे की व्यवसायाच्या सामान्य प्रक्रियेत (अ) प्रतिभूती ठेव; (ब)डिलरशिप ठेव, (क)इसाऱ्याची रक्कम किंवा (ड)वस्तू किंवा सेवांच्या नोंदविण्यात आलेल्या मागणीसंबंधात आगाऊ दिलेली रक्कम, 'ठेव' या संज्ञेच्या कक्षेतून वगळली जातील. [परिच्छेद ३७] [५१०-ई-एफ; ५११-ए-बी]

१.८ व्यापारी सदस्य एन.एस.ई.एल.[NSEL] ला 'मार्जिन' ठेव देतात आणि एन.एस.ई.एल.[NSEL] सेटलमेंट गॅरंटी फंड- एस.जी.एफ.(SGF) ठेवते. नियमन ४.१२ मध्ये असे म्हटले आहे की केवळ ज्या सदस्यांनी 'मार्जिन' ठेव आणि प्रतिभूति ठेव भरली आहे त्यांचेच व्यवहार वैध मानले जातील. त्यामुळे एन.एस.ई.एल.[NSEL] च्या प्लॅटफॉर्म वर व्यापार करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला 'मार्जिन' ठेव आणि प्रतिभूति ठेव भरणे अनिवार्य आहे. नियमन ४.१२ प्रमाणे एस.जी.एफ.(SGF) ला 'प्रतिभूति ठेव' मानण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, उपनियम १२.२.१ प्रमाणे प्रत्येक सदस्याने किमान प्रतिभूती 'ठेव' भरावी, अशी अट घातली आहे. तथापि, एस.जी.एफ.(SGF) ला केवळ प्रतिभूती 'ठेव' म्हणून संबोधले जात असल्याने, अपवाद आपोआप लागू होणार नाहीत. 'प्रतिभूती ठेव' या वाक्यांशाचा अर्थ आजूबाजूच्या वाक्यांशांपासून आकार घेतो. उप -कलम २(सी) च्या

खंड(v) मध्ये 'ठेव' या वाक्यांशाच्या कक्षेतून प्रतिभूति ठेव, डिलरशिप ठेव, इसाऱ्याची रक्कम किंवा वस्तू किंवा सेवांच्या नोंदविण्यात आलेल्या मागणीसंबंधात आगाऊ दिलेली रक्कम, वगळण्यात आली आहे. उप-कलम २(सी)(v) मध्ये वापरल्या गेलेल्या संकल्पना दोन प्रवर्गांमध्ये येतातः (१) खरेदीसाठीची इसार दर्शविण्यासाठी दिलेल्या लाक्षणिक रकमा (इसाऱ्याची रक्कम आणि आगाऊ दिलेली रक्कम) आणि (२) पक्षाद्वारे देयके देण्यात कसूर होणे अश्या निकडीची परिस्थितीची पूर्तता करण्यासाठी आवश्यक देयके (डीलरशिप ठेव आणि प्रतिभूति ठेव).[परिच्छेद ३८] [५११-सी-एफ]

१.९ एस.जी.एफ.(SGF) ची वैशिष्ट्ये सूचित करतात की निधीचा वापर त्या खर्चांसाठी केला जातो, जे नियमित सुरक्षा निधीतून केलेल्या वापराच्या पलीकडे आहेत. घरमालक आणि भाडेकरू यांच्यातील प्रतिभूति ठेवीच्या विपरीत, जेथे निधीचा वापर घरमालकाचे 'आवश्यक बंधन' पूर्ण करण्यासाठी केला जातो, जसे की दुरुस्तीचे काम आणि भाडेकरूला थकबाकी असताना कपात करणे, एन.एस.ई.एल.(NSEL) ठेवीचा वापर व्यापारी सदस्याच्या (खरेदीदार) दुसऱ्या व्यापारी सदस्याच्या (विक्रेता) देय जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी करते, कारण एन.एस.ई.एल.(NSEL)हा व्यवहारांचा मध्यस्थ पक्ष आहे. तथापि, एन.एस.ई.एल. या निधीचा वापर मध्यस्थ पक्ष म्हणून त्याच्या भूमिकेच्या पलीकडे कार्ये पूर्ण करण्यासाठी करते. उदाहरणार्थ, या निधीचा वापर एन.एस.ई.एल.(NSEL)ला झालेल्या सेटलमेंट ऑपरेशन्समधील तोटा भरून काढण्यासाठी केला जातो, रोख्यांमध्ये गुंतवणूक केली जाते आणि या निधीचे वाटप व्यापाराच्या विविध विभागांमध्ये केले जाते, जेथे निधीचा वापर त्या विभागातील काही तोटा असल्यास तो भरून काढण्यासाठी देखील केला जातो. त्यामुळे एस.जी.एफ.(SGF) ची ही तीन वैशिष्ट्ये सूचित करतात की एस.जी.एफ.(SGF) ला नाम पद्धतीने 'प्रतिभूती ठेव' जरी म्हटले जात असले तरी त्याची वैशिष्ट्ये प्रतिभूति ठेव दर्शित करत नाहीत. एन.एस.ई.एल.(NSEL) ला एस.जी.एफ.(SGF) च्या स्वरूपात 'पैसे' प्राप्त होतात ज्याचा परतावा रोख रक्कम किंवा सेवांद्वारे केला जातो आणि अपवादांद्वारे समाविष्ट केले जात नाहीत, त्यामुळे ते कलम २(सी) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे 'ठेव' या शब्दप्रयोगामध्ये येईल. [परिच्छेद ४१] [५१२-जी -एच ; ५१३ ए -सी]

१.१० एन.एस.ई.एल.[NSEL] च्या प्लॅटफॉर्म वर व्यापार करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने वस्तू एन.एस.ई.एल.[NSEL] च्या मान्यताप्राप्त वखारामध्ये ठेवणे आवश्यक आहे. त्यानंतर एन.एस.ई.एल.[NSEL] व्यापाऱ्याला 'वखाराची पावती' देईल. जेव्हा खरेदीदाराचा प्रस्ताव आणि विक्रेत्याचा प्रस्ताव जुळेल, तेव्हा एन.एस.ई.एल.[NSEL] खरेदीदार सदस्याच्या देय शुल्कातून रक्कम वजा करेल आणि ती एन.एस.ई.एल.[NSEL] च्या 'एक्सचेंज सेटलमेंट' खात्यात जमा केली जाईल. विक्रेत्याच्या विशिष्ट वस्तुचे आवश्यक प्रमाण उपलब्ध असल्यास संचालन विभाग वितरण विभागाशी पुष्टी करेल. अशा पुष्टीकरणानंतर, परिचालन विभाग विक्री दलालाच्या नियुक्त बँक खात्यात खरेदी किंमत जमा करेल. त्याच वेळी, खरेदीदाराच्या दलालाला किंवा खरेदीदाराला डिलिव्हरी नियत झाल्याचे प्रतिवेदन जारी केल जाईल. एकदा व्ही.ए.टी. (VAT) चे चलन भरले की, एन.एस.ई.एल.[NSEL] एक 'पोचवणी पत्र' जारी करेल जे खरेदीदाराला नियुक्त केलेल्या वखारातून सोडवून घेण्यास अधिकृत करेल किंवा खरेदीदाराला वाटल्यास तो वस्तुचा अर्थापन्न कब्जा घेऊ शकेल. 'ठेव' या शब्दाच्या व्याख्येत असे काहीही नाही की वस्तुचा स्वीकार वस्तुच्या मालकीच्या हस्तांतरणासह असावा. जरी वित्तीय संस्थे जवळ  केवळ वस्तुचा 'ताबा ' असला, तरीही ती 'वस्तु स्वीकारणे' या वाक्यांशाच्या कक्षेत येईल. वस्तुचा ताबा स्वीकारल्यावर, एन.एस.ई.एल.[NSEL] ला विविध सेवा, म्हणजे वस्तू सुरक्षित आणि कोणत्याही हानीशिवाय ठेवण्याचे बंधन, पुरवाव्या लागतात. याव्यतिरिक्त, करारांची जुळवाजुळव करताना परिचालन विभाग आणि वितरण विभाग यांच्यात समन्वय साधावा लागतो. त्याचप्रमाणे, पोचवणी पत्र खरेदीदाराला पाठवल्यानंतर, वस्तु एकतर खरेदीदाराकडे पाठवली जाते किंवा खरेदीदारला वस्तुचा अर्थापन्न कब्जा दिला जातो. वस्तु एन.एस.ई.एल.[NSEL] कडे मान्यताप्राप्त वखारात आहे याचा पुरावा देणारा दस्तऐवज म्हणून उपविधी २.९६ मध्ये 'वखार पावती' या वाक्यांशाची व्याख्या केली आहे. उपविधी ४.२० खंड (ब) मध्ये असे म्हटले आहे की जर थकबाकी व्यवहारांचा निपटारा डेलिव्हरी देऊन किंवा प्राप्त करून केला गेला नसेल, तर त्याचा (वस्तू) लिलाव एक्सचेज च्या व्यवसाय नियमांनुसार आत बोलीने किंवा 'संपूर्ण विक्री' द्वारे केला जाईल. उपविधी १०.११ मध्ये असे म्हटले आहे की वस्तू केवळ नियुक्त केलेल्या वखारांमध्ये पोहोचवल्या जातील आणि वितरित केल्या जातील. त्यामुळे एन.एस.ई.एल.[NSEL] वस्तुच्या बदल्यात किंवा

वस्तु प्राप्त करण्याच्या बदल्यात अनेक 'सेवा' देते. वस्तूची पावती आणि वस्तू (जेव्हा सदस्यांना अर्थापन्न कब्जा दिला जातो) मान्यताप्राप्त वखारांमध्ये ठेवणे ही अधिनियमाच्या कलम २ (सी) प्रमाणे 'ठेव' आहे. [परिच्छेद ४२] [५१३- डी-एच; ५१४-ए-सी]

१.११ ‘मौल्यवान वस्तु’ हा शब्दप्रयोग संविधिने परिभाषित केलेला नाही. ह्या शब्दप्रयोगामध्ये केवळ सोने आणि चांदी सारखे मौल्यवान धातुंचाच समावेश असला पाहिजे हे उत्तरवाद्यांचे निवेदन स्वीकारण्यास कोणताही वैध आधार नाही. जर विधानमंडळचा मौल्यवान वस्तु या शब्दप्रयोगाची व्याख्या मर्यादित करण्याचा हेतू असता, तर ते अभिव्यक्तीला कृत्रिम अर्थ देऊन स्पष्टीकरण देऊ शकले असते. मात्र, विधानमंडळाने तसे केले नाही. मौल्यवान वस्तु ही एक अशी वस्तु आहे जिचे महत्त्वपूर्ण मूल्य आहे. हे केवळ वस्तुच्या आंतरिक मूल्याचा संदर्भ देत नाही. एखादी वस्तु मौल्यवान आहे की नाही हे ठरवताना या अधिनियमाचा हितावह उद्देश आणि प्रयोजन लक्षात घ्यावे लागेल जे म्हणजे ठेवीदारांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे. या संदर्भात अधिनियमाचा अर्थ आणि आशय प्रभावी होईल अशा सहेतुक रचनेचा अवलंब करणे आवश्यक होते. निर्बंधक अर्थ घेतल्यास ते कायदेशीर हेतूच्या विरोधात असेल. 'ठेव' हा शब्दप्रयोग तसेच 'वित्तीय संस्था' हा शब्दप्रयोग सर्वसमावेशक आणि व्यापक पद्धतीने परिभाषित करणे हा विधिमंडळाचा हेतू आहे. त्यामुळे 'मौल्यवान वस्तू' हा शब्दप्रयोग केवळ मौल्यवान धातूंपुरता मर्यादित राहू शकत नाही. एन.एस.ई.एल.[NSEL] ज्या कृषी वस्तूंचा व्यापार करते, त्या ह्या शब्दप्रयोगाच्या कक्षेत येतील.[परिच्छेद ४३] [५१४-डी- जी]

१.१२ जोड करार एन.एस.ई.एल. [NSEL] द्वारे एक अद्वितीय व्यापार संधी म्हणून तयार केले गेले होते, ज्या अंतर्गत व्यापारी, उदाहरणार्थ, टी+२ करार खरेदी करेल (टी + २ वर ‘पे इन’ च्या बंधनासह) आणि एकाच वेळी टी + २५ करार विकेल (टी + २५ वर निधीच्या ‘पे आऊट’ सह). सुमारे १६ टक्के वार्षिक परतावा देण्यासाठी दोन सेटलमेंट तारखांमधील किंमतीतील फरक दर्शविला गेला. एन.एस.ई.एल.(NSEL) स्पष्टपणे दर्शित करते की प्रत्येक व्यवहाराला मालाच्या स्वरूपात संपार्श्विकांचा आधार असेल आणि त्याच्या माल व्यवस्थापन उपक्रमांमध्ये निवड, मान्यता, गुणवत्ता चाचणी, धूम्र आणि विमा ह्यांचा समावेश असेल. त्यामुळे, एन.एस.ई.एल.[NSEL] ने असे म्हंटले की पैसे आणि वस्तू मिळाल्यावर सदस्यांना खात्रीशीर परतावा आणि सेवा मिळेल. एन.एस.ई.एल.(NSEL)

**ला ठेवी मिळत असल्या तरी ठेवींच्या बदल्यात दिलेल्या आश्वासनानुसार सेवा पुरवण्यात आणि मागणी नुसार ठेवी परत करण्यात ते अपयशी ठरले आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सरकारने एम.पी.आय.डी.(MPID) अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत जप्तीच्या अधिसूचने ला समर्थन दिले. [परिच्छेद ४५][५१७-ई-एच]**

**१.१३ उच्च न्यायालयाने चुकीचे मत बनवले आहे की, एकतर जर परताव्यामध्ये व्याज, बोनस किंवा इतर कोणताही अतिरिक्त लाभ असेल तरच तो एम.पी.आय.डी.(MPID) अधिनियमाच्या संदर्भात ठेव समजला जाईल. तथापि, कलम २ (सी) मध्ये असे म्हटले आहे की परतावा व्याज, बोनस, नफा किंवा इतर कोणत्याही स्वरूपात कोणत्याही लाभासह किंवा त्याशिवाय असू शकतो. या व्याख्येमध्ये असे नमूद केलेले नाही की अतिरिक्त लाभ असणे आवश्यक आहे, त्याऐवजी वाढीव लाभ व्याख्येच्या कक्षेसाठी अप्रासंगिक आहे; दुसरे म्हणजे, कलम २ (सी) च्या कक्षेत, वस्तु किंवा पैश्यांची प्राप्ती राखून ठेवली गेली पाहिजे. या व्याख्येमध्ये असा कोणताही निर्बंध नाही. त्याऐवजी, मर्यादित हेतूसाठी वस्तूंचा ताबा देखील समाविष्ट करण्यासाठी ही व्याख्या व्यापकपणे शब्दबद्ध केली आहे. उच्च न्यायालयाने एम.पी.आय.डी.(MPID) अधिनियमाच्या हितकारक उद्देशाचा कोणताही संदर्भ न देता 'ठेव' ह्या शब्दाची संकुचित व्याख्या विचारात घेतली. मुंबई उच्च न्यायालयाच्या आक्षेपीत निकालाला रद्द केले जाते. एम.पी.आय.डी.(MPID) अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत उत्तरवाद्यांच्या मालमत्तांना जप्त करण्यासाठी जारी केलेली आक्षेपीत अधिसूचना वैध आहे.[परिच्छेद ६१,६६] [५३५-सी-ई; ५३६-एफ]**

६३ मून्स टेक्नॉलॉजीज – विरुद्ध - युनियन ऑफ इंडिया **(२०१९) १८ एससीसी ४०१;** न्यू होराइझन शुगर मिल्स लिमि. - विरुद्ध - गवर्मेंट ऑफ पाँडिचेरी **(२०१२) १० एससीसी ५७५ : [२०१२] ८ एससीआर ८७४;** के. के. भास्करन - विरुद्ध - राज्य सरकार **(२०११) ३ एससीसी ७९३:[२०११] ३ एससीआर ५२७;** राज्य सरकार – विरुद्ध - के. एस. पलानीचामी **(२०१७)१६ एससीसी ३८४:[२०१७] ४ एससीआर ३४;** पी.जी.एफ. -- विरुद्ध -- युनियन ऑफ इंडिया **(२०१५) १३ एससीसी ५०:[२०१३] ६ एससीआर ३२;** मोहिंदर सिंग गिल - विरुद्ध - सी.ई.सी. **(१९७८) १ एससीसी ४०५:[१९७८]२ एससीआर २७२;** इंद्र सर्मा – विरुद्ध – व्ही. के. व्ही. सर्मा **(२०१३) १५ एससीसी ७५५:[२०१३]१४ एससीआर १०१९;** विजय सी. पुलजल -

विरुद्ध - स्टेट ऑफ महाराष्ट्र **(२००५) ४ सीटीसी ७०५ (बीओएम);** न्यू होरायझन्स शुगर मिल्स लिमि. - विरुद्ध - गवर्मेंट ऑफ पाँडिचेरी **(२०१२) १० एससीसी ५७५ : [२०१२] ८ एससीआर ८७४;** स्टेट ऑफ महाराष्ट्र - विरुद्ध - विजय ए. सी. पुलजल **(२०१२) १० एससीसी ५९९;** सोनल हेमंत जोशी - विरुद्ध - स्टेट ऑफ महाराष्ट्र **(२०१२) १० एससीसी ६०;** सोमा सुरेश कुमार -- विरुद्ध -- गवर्मेंट ऑफ आंध्र प्रदेश **(२०१३) १० एससीसी ६७७:[२०१३] १० एस.सी.आर. ३२८ – चा संदर्भ**

ब्रायन ए गार्नर, ब्लॅक्स लॉ डिक्शनरी (११ वी आवृत्ती थॉमसन रॉयटर्स)-चा संदर्भ.

**निर्णयविधी संदर्भ**

| | | |
|---|---|---|
| **(२०१९) १८ एससीसी ४०१** | **परिच्छेद ११ (xii)** | **मध्ये संदर्भित** |
| **[२०१२] ८ एससीआर ८७४** | **परिच्छेद १३ (iii)** | **मध्ये संदर्भित** |
| **[२०११] ३ एससीआर ५२७** | **परिच्छेद १३ (iii)** | **मध्ये संदर्भित** |
| **[२०१७] ४ एससीआर ३४** | **परिच्छेद १३ (iii)** | **मध्ये संदर्भित** |
| **[२०१३] ६ एससीआर ३२** | **परिच्छेद १३ (iii)** | **मध्ये संदर्भित** |
| **[१९७८] २ एससीआर २७२** | **परिच्छेद १४ (ix ब)** | **मध्ये संदर्भित** |
| **[२०१३] १४ एससीआर १०१९** | **परिच्छेद ३२** | **मध्ये संदर्भित** |
| **[२०१२] ८ एससीआर ८७४** | **परिच्छेद ५५** | **मध्ये संदर्भित** |
| **(२०१२) १० एससीसी ५९९** | **परिच्छेद ५६** | **मध्ये संदर्भित** |
| **(२०१२) १० एससीसी ६०१** | **परिच्छेद ५६** | **मध्ये संदर्भित** |
| **[२०१३] १० एससीआर ३२८** | **परिच्छेद ५६** | **मध्ये संदर्भित** |

दिवाणी अपिलीय अधिकारिता : दिवाणी अपील क्र. २७४८-४९/२०२२

रिट याचिका क्र.५०८/२०१७ आणि रिट याचिका क्र. ११८१/२०१८ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक २२.०८.२०१९ रोजीचा न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

सोबत

दिवाणी अपील क्र. २७५०-५१ /२०२२

विक्रमजीत बॅनर्जी, ए.एस.जी., जयंत मेहता, वरिष्ठ अधिवक्ता, राहुल चिटनीस, सचिन पाटील, आदित्य ए.पांडे, जिओ जोसेफ, श्वेता शेपाल, सिद्धार्थ सिन्हा, तथागत

शर्मा, सुश्री जान्हवी प्रकाश, प्रशांत रावत, आदित्य मिश्रा, अभिषेक महाजन, सुश्री संजना सॅड्डी, भूषण शाह, सन्यत लोढा अपीलककर्त्यांचे अधिवक्ता.

डॉ.ए.एम. सिंघवी, वरिष्ठ वकील, महेश अग्रवाल, अंकुर सहगल, अरविंद लखावत, सुश्री प्रियंका वोरा, सुश्री मिशा रोहतगी, अमित भंडारी, सुश्री मानसी तनेजा, आयुषी अमोद, करण वर्मा, ई. सी. अग्रवाल, सुश्री अनिंदिता मित्रा, अखिल सच्चर, संग्राम सिंग, सुश्री जॅस्मीन दामकेवाला, मेसर्स लीगल ऑप्शन्स, उत्तरवाद्यांचे वकील.

न्यायालयाचा न्यायनिर्णय: **मा. न्या. डॉ. धनंजय वाय. चंद्रचूड,** ह्यांच्या द्वारे देण्यात आला

**अनुक्रमणिका**


**ए. तथ्ये...................................................................................... ३***

**बी. सादरीकरणे............................................................................. १७***

**सी. विश्लेषण.............................................................................. २५***

**सी.१ एम.पी.आय.डी.(MPID) अधिनियमाची चौकट.....................२५***

**सी.२ एन.एस.ई.(NSE) ची चौकट............................................२७***

**सी.३ 'ठेव' आणि 'वित्तीय संस्था' च्या व्याख्याः एम.पी.आय.डी.(MPID) अधिनियमाच्या कलम २ (सी) आणि २ (डी) चे निर्वचन ................ ४०***

**सी.३.१ सेटलमेंट गॅरंटी फंड : एम.पी.आय.डी.(MPID)अधिनियमाच्या कलम २(सी) अंतर्गत ठेव ........................................... ..........४६***

**सी.३.२अधिनियमाच्या कलम २(सी) अंतर्गत वस्तूंची प्राप्ती .......................४९***

**सी.४ कट उघड करणे................................................................ ५५***

**सी.४.१ द ग्रांट थॉर्नटन रिपोर्ट....................................... ५५***

**सी.४.२ ६३ मून्स न्यायनिर्णय ......................................... ५६***

**सी.५ एम.पी.आय.डी (MPID) अधिनियमाची घटनात्मक वैधता.......... ६५***

**सी.६ उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय.......................................... ७१***


१. हे अपील मुंबई उच्च न्यायालयाच्या २२ ऑगस्ट २०१९ रोजीच्या एका निकालावरून उद्भवते, ज्याद्वारे महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे

** टीप : पुष्ठांकन मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे केले आहे

संरक्षण अधिनियम, १९९९[1]: च्या कलम ४ अंतर्गत उत्तरवाद्यांच्या मालमत्तेची जप्ती करणाऱ्या काही अधिसूचना रद्द करण्यात आल्या आहे. नॅशनल स्पॉट एक्सचेंज लिमिटेड[2] च्या समभागधारकांपैकी ९९.९९% हिस्सा उत्तरवाद्यांकडे आहे. एन.एस.ई.एल(NSEL) ही, एम.पी.आय.डी.(MPID)अधिनियमाच्या कलम २(डी) अंतर्गत, वित्तीय संस्था आहे की नाही हा वादाचा मूळ मुद्दा आहे.

**ए. तथ्ये**

२.एन.एस.ई.एल.(NSEL) ही 'कंपनी अधिनियम १९५६' अंतर्गत स्थापन केलेली कंपनी आहे आणि ती फायनान्शियल टेक्नॉलॉजीज (इंडिया) लिमिटेडची संपूर्ण मालकीची उपकंपनी आहे, जी आता ६३ मून्स टेक्नॉलॉजीज लिमिटेड [3] म्हणून ओळखली जाते. ५ जून २००७ रोजी, युनिअन ऑफ इंडिया ने भावी संविधा (नियमन) अधिनियम १९५२[4] च्या कलम २७ अंतर्गत एक अधिसूचना जारी केली, ज्यात एन.एस.ई.एल.(NSEL) वर व्यापार केलेल्या वस्तूंच्या विक्री आणि खरेदीसाठी एका दिवसाच्या कालावधीच्या फॉरवर्ड कॉन्टॅक्टसना अधिनियमाच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली. एन.एस.ई.एल.(NSEL) ने वस्तूंच्या स्पॉट ट्रेडिंग एक्सचेंज म्हणून काम करण्यास सुरुवात केली. एन.एस.ई.एल.(NSEL) ने टी+० ते टी+३६ दिवसांच्या वेगवेगळ्या सेटलमेंट कालावधीसह त्याच्या ट्रेडिंग प्लॅटफॉर्म वर वस्तूंच्या खरेदी आणि विक्रीसाठी करार करणे सुरू केले.'टी' ट्रेड ची तारीख दर्शवितो, म्हणजे ज्या तारखेला व्यापार झाला आणि + ० किंवा + ३६, व्यापार दिवसानंतरच्या व्यावसायिक दिवसांची संख्या दर्शविते जेव्हा वस्तुची डिलिव्हरी आणि किंमतीची देयके दिली जातात.

३. एन.एस.ई.एल.(NSEL) ने 'जोड' करार देऊ केले. अशा करारांमुळे व्यापारी एकतर स्वतः किंवा त्यांच्या दलालांद्वारे एकाच वेळी टी+२ आणि टी+२५ कालावधीसारख्या जोड करार करू शकतात. विक्रेता त्याच्या दलालाच्या माध्यमातून वस्तूंची विक्री करतो आणि खरेदीदार त्याच्या दलालाच्या माध्यमातून विशिष्ट गरजेच्या वस्तू खरेदी करू इच्छितो. एन.एस.ई.एल.(NSEL) नंतर खरेदीदाराची गरज आणि

---

1 एम.पी.आय.डी (MPID)


2 एन.एस.ई.एल (NSEL)


3 "एफ.सी.आइ.एल (FCIL) किंवा ६३ मुन्स"

4 एफ.सी.आर.ए.(FCRA)

उपलब्ध वस्तू आणि विक्रेता यांच्यात मेळ असल्यास खरेदीदार आणि विक्रेत्याची जोडी बनवते. खरेदीदार आणि विक्रेता एकाच वेळी टी+२ आणि टी+२५ करार करतात. उदाहरणार्थ, जर 'अ' (खरेदीदार) ला एक टन बासमती तांदूळ खरेदी करायचा असेल तर तो त्याच्या दलालाच्या माध्यमातून एन.एस.ई.एल.(NSEL) च्या प्लॅटफॉर्म वर व्यापार करेल. प्लॅटफॉर्म हे ओळखेल की 'ब' (विक्रेता) कडे परिमाणित वस्तु विकण्याचा प्रस्ताव आहे. त्यानंतर एन.एस.ई.एल.(NSEL) दोन्ही करारांची जुळवणी करेल. कराराच्या जुळणीच्या तारखेस व्यापार तारीख किंवा 'टी' म्हणतात.''अ' ने नंतर वस्तुची किंमत एन.एस.ई.एल.(NSEL) ला द्यायची, एन.एस.ई.एल.(NSEL) हे तपासते की 'ब' ने दोन दिवसांच्या आत वितरणासाठी माल मान्यताप्राप्त वखारात जमा केला आहे की नाही. एकदा एन.एस.ई.एल.(NSEL) ने पुष्टी केली की 'ब' ने वखारात माल जमा केला आहे, ते पैसा 'ब' कडे हस्तांतरित करते. त्याच वेळी, तेच पक्ष टी+२५ करार करतात ज्याद्वारे 'ए' (जो टी+२ करारातील खरेदीदार होता) खरेदी केलेल्या वस्तुच्या समान प्रमाणात 'बी' ला (जो टी+ २ करारातील विक्रेता होता) विकेल. खरेदी खर्च आणि विक्री खर्च यामधील फरक म्हणजे व्यापारी सदस्याला व्यापाराद्वारे मिळणारा नफा. व्यवहाराचे प्रतिनिधित्व दर्शविणारा प्रवाह तक्ता खाली दिलेला आहे:

टी + २






४. जोड करारांची तपशीलवार टप्प्याटप्प्याने व्यापार प्रसंभाविक प्रक्रिया खाली दर्शविली आहेः

(i) एन.एस.ई.एल.(NSEL)च्या व्यापारी सदस्याला, ज्याला प्लॅटफॉर्मवर व्यापार करायचा आहे, त्याने वस्तुचे विशिष्ट प्रमाण एन.एस.ई.एल.(NSEL)च्या मान्यताप्राप्त वखारात ठेवणे आवश्यक आहे. वखार नंतर वखार पावती तयार करेल;

(ii) नोंदणीकृत व्यापारी सदस्य किंवा ज्या दलालाने आपला माल वखारात ठेवला होता, तो एन.एस.ई.एल.(NSEL) ने देऊ केलेल्या प्रमाणित प्रोफार्मा करारांच्या आधारे, देऊ केलेली किंमत आणि प्रमाण निश्चित करून प्लॅटफॉर्मवर वस्तुच्या विक्रीसाठी प्रस्ताव देऊ शकतो;

(iii) खरेदी करणारा व्यापारी सदस्य किंवा त्याचा दलाल एन.एस.ई.एल. च्या व्यापार प्लॅटफॉर्मवर विशिष्ट वस्तु आणि प्रमाणाच्या खरेदीच्या ऑर्डर दाखल करेल;

(iv) जेव्हा विक्रीचा प्रस्ताव आणि खरेदीचा प्रस्ताव जुळतील, तेव्हा वस्तु, किंमत आणि प्रमाण निश्चित करून एन.एस.ई.एल.(NSEL) द्वारे एक्सचेंजची जुळवाजुळव केली जाईल;

(v) 'एक्सचेंज' हे झालेल्या सर्व व्यवहारांची माहिती दिवसाच्या शेवटी देईल;

(vi) दुसऱ्या दिवशी, दायित्व अभिलेख ज्यामध्ये 'पे इन' आणि 'डिलिव्हरी' संबंधी चे देयके व्यापारी सदस्यांना पाठविली जातील;

(vii) त्या नंतरच्या दिवशी (म्हणजेच सेटलमेंट तारीख), एन.एस.ई.एल.(NSEL) खरेदी करणाऱ्या सदस्याच्या 'पे इन' देयक व्यापारी सदस्याच्या नियुक्त सेटलमेंट खात्यातून वजा करेल आणि ती एन.एस.ई.एल.(NSEL) च्या एक्सचेंज सेटलमेंट खात्यात जमा केली जाईल. एन.एस.ई.एल.(NSEL) चा परिचालन विभाग एन.एस.ई.एल.(NSEL) च्या वितरण विभागाला विक्री करणाऱ्या सदस्याच्या वितरण जबाबदाऱ्यांची माहिती देईल. या सूचनेच्या आधारे, एन.एस.ई.एल.(NSEL) चा वितरण विभाग वखार पावत्यांनुसार विशिष्ट वस्तुचे आवश्यक प्रमाण उपलब्ध असल्यास संचालन विभागाला पुष्टी देईल. अशा पुष्टीकरणानंतर, परिचालन विभाग विक्री दलालाच्या नियुक्त बँक खात्यात खरेदी किंमत जमा करेल. त्याच वेळी, खरेदीदाराला डिलिव्हरी नियत झाल्याचे प्रतिवेदन जारी केला जाईल. दलाल किंवा खरेदीदार त्याला कळवेल की खरेदी केलेली वस्तु त्याला देण्यात आली आहे; आणि

(viii) एन.एस.ई.एल.(NSEL)नंतर खरेदीदाराचा तपशील विक्रेत्या व्यापारी सदस्याला पाठवेल आणि विक्रेता व्यापारी सदस्य गैर-सदस्य ग्राहक/विक्रेत्याला वस्तुचे व्ही.ए.टी.(VAT)चलन भरलेले विक्री बीजक तयार करण्याची व्यवस्था करेल. डिलिव्हरी नियत झाल्याचे प्रतिवेदन आणि व्ही.ए.टी.(VAT)चलन भरलेले विक्री बीजक ह्यांच्या आधारावर एन.एस.ई.एल.[NSEL] एक 'पोचवणी पत्र' जारी करेल जी खरेदीदाराला नियुक्त केलेल्या वखारातून डिलिव्हरी घेण्यास अधिकृत करेल. जर खरेदीदाराला डिलिव्हरी घ्यायची नाही असे वाटले तर त्याला त्या वस्तूचा

अर्थापन्न कब्जा देण्यात येईल जेणेकरून तो वस्तू ची डिलिव्हरी कधीही घेऊ शकेल.

५. २७ एप्रिल २०१२ रोजी ग्राहक व्यवहार विभाग [5] ने एन.एस.ई.एल.(NSEL) ला सूट अधिसूचनेचे उल्लंघन करून व्यवहारांना परवानगी दिल्याबद्दल कारवाई का केली जाऊ नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली. १२ जुलै २०१२ रोजी, डी.सी.ए.(DCA) ने एन.एस.ई.एल.(NSEL) ला पुढील सूचना मिळेपर्यंत कोणतेही कंत्राट सुरू केले जाणार नाही आणि सर्व विद्यमान कंत्राटे नियत तारखांवर निकाली काढली जावीत, असे हमीपत्र देण्याचे निर्देश दिले. जुलै २०१३ मध्ये, एन.एस.ई.एल.(NSEL)च्या प्लॅटफॉर्मवर व्यापार करणाऱ्या सुमारे १३००० व्यक्तींनी दावा केला की इतर व्यापार सदस्यांनी अंदाजे ५६०० कोटी रुपये भरण्यात कसूर केली आहे. एन.एस.ई.एल.(NSEL) ने ३१ जुलै २०१३ रोजी त्याचे स्पॉट एक्सचेंज ऑपरेशन्स निलंबित करण्याचे परिपत्रक जारी केले. त्यात असे म्हटले आहे की सर्व प्रलंबित करार विलीन केले जातील आणि १५ दिवसांनंतर करार नक्की केले जातील. एन.एस.ई.एल.(NSEL) ने ६ ऑगस्ट २०१३ रोजी एक निवेदन प्रकाशित केले ज्यात त्याच्या गोदामांमध्ये ६,०३२ कोटी रुपये किमतीचा पुरेसा साठा असल्याचे सांगितले. एन.एस.ई.एल.(NSEL) ने १४ ऑगस्ट २०१३ रोजी नवीन पे-इन अनुसूची जाहीर केले, ज्याद्वारे एक्स्चेंजने १६ ऑगस्ट २०१३ पासून पे-इन अनुसूची आणि २० ऑगस्ट २०१३ पासून पे-आउट अनुसूची दर आठवड्याला त्याच पद्धतीने सुरू केले. १६ ऑगस्ट २०१३ पासून सेटलमेंट कॅलेंडरच्या शेवटापर्यंत वार्षिक ८ टक्के दराने कमी होणाऱ्या शिल्लक रकमेवर सदस्यांना त्यांच्या थकबाकी रकमेवर सरळ व्याज मिळण्याचा हक्क असेल, असेही या बैठकीत मांडण्यात आले. अधिसूचना खाली दिलेली आहेः

"नॅशनल स्पॉट एक्सचेंज लिमिटेड

परिपत्रक

ऑगस्ट १४ २०१३

सेटलमेंट कार्यसूची

नियमांच्या तरतुदींच्या, एक्सचेंजचे उपनियम आणि व्यवसाय नियमांच्या अनुसार आणि दिनांक ३१ जुलै २०१३ रोजी च्या परिपत्रक क्र. एन. एस. ई. एल./टी. आर.

5 डी.सी.ए (DCA)

डी./२०१३/०६५, च्या अभिवृध्द्यर्थ, एक्सचेंजच्या सदस्यांना याद्वारे सूचित केले जाते की एक्सचेंजने सदस्यांना देय असलेल्या थकबाकीच्या सेटलमेंटसाठी खालील सुधारित अंतिम कार्यसूची खालील प्रमाणे आहे.

अचानक व्यापार बंद झाल्यामुळे उद्भवलेली निकड भागविणे, बँकांकडून पे इन सदस्यांमधील खरेदीदारांची पत मर्यादा मागे घेतल्यामुळे वाढलेली तरलता समस्या, ज्या सदस्यांना पेमेंट पूर्ण करायचे आहे आणि ज्या सदस्यांना पेमेंट मिळायचे आहे अशा सदस्यांनी केलेली विस्तृत चर्चा विचारात घेऊन ही कार्यसूची तयार करण्यात आली आहे. आव्हाने लक्षात घेऊन, पेमेंट रिस्टमध्ये कपात सुनिश्चित करण्यासाठी आणि सेटलमेंटची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी सेटलमेंटचे सुधारित वेळापत्रक तयार केले गेले आहे:

१. एक्सचेंज शुक्रवार, १६ ऑगस्ट २०१३ पासून पे-इन कार्यसूची सुरू करेल आणि मंगळवार, २० ऑगस्ट २०१३ पासून आणि त्यानंतर दर आठवड्याला त्याच पद्धतीने पे-आउट करेल.

२. येथे संलग्न केलेल्या सेटलमेंट कॅलेंडरनुसार वसूल केलेल्या पैशाच्या आधारे एक्सचेंज दर आठवड्याला प्रमाणानुसार पैसा देईल. ही देयके अश्या सदस्यांच्या धनादेशांच्या सिद्धीच्या अधीन आहेत, ज्यांना पे इन पूर्ण करावयाचे आहे. जर कोणतीही देय रक्कम वसूल झाली नाही, तर एक्सचेंज त्याच्या नियमांनुसार आणि उपनियम कायद्यांनुसार उपाययोजना करेल.

३. १६ ऑगस्ट २०१३ पासून दर आठवड्याला शुक्रवारपर्यंत जमा झालेला सर्व निधी पुढील आठवड्याच्या मंगळवारी वितरित केला जाईल.

४. ज्या सदस्यांनी तारखेनंतरचे धनादेश किंवा वचनबद्धता पत्रे दिली आहेत, त्यांच्याकडून सर्व वचनबद्ध किंवा अपेक्षित देयके कार्यसूचीमध्ये विचारात घेतली आहेत.

५. सभासद/क्लायंट १६ ऑगस्ट २०१३ पासून त्यांच्या थकबाकीवर व्याज मिळविण्यास पात्र असतील, जे सेटलमेंट कॅलेंडरच्या समाप्तीपर्यंत वार्षिक 8% च्या सरळ व्याज दरावर आधारित, मूल्यऱ्हास घसारा पद्धतीवर लागू होतील. व्याजाची रक्कम सेटलमेंटच्या शेवटी दिली जाईल.

६. एक तपशीलवार सेटलमेंट कॅलेंडर यासोबत जोडले जात आहे.

नॅशनल स्पॉट एक्सचेंज लिमिटेड च्या वतीने

संतोष मानसिंग

सहाय्यक उपाध्यक्ष"

६. १९ सप्टेंबर २०१४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे केंद्र सरकारने २३ जुलै २००८ रोजी दिलेली सूट मागे घेतली. फॉरवर्ड मार्केट कमिशन [6] ने डी. सी. ए.(DCA ) ला शिफारस केली की अधिकृत वखारांमधील वस्तूंचे प्रमाण आणि गुणवत्ता, खरेदीदार आणि व्यापारी सदस्यांची आर्थिक स्थिती निश्चित करण्यासाठी पावले उचलली जावीत आणि एन. एस. ई. एल. (NSEL) म्हणजेच ६३ मुन्स च्या प्रवर्तकांवर दायित्व निश्चित केले जावे. २७ ऑगस्ट २०१३ रोजी, एफ. एम. सी. (FMC) ने ग्रँट थॉर्नटन एल. एल. पी. द्वारे एन. एस. ई. एल. (NSEL) चे न्यायसहायक लेखापरीक्षण करण्याचे निर्देश दिले. भारत सरकारने कंपनी कायद्याच्या कलम २०९ ए अंतर्गत एन. एस. ई. एल. (NSEL) आणि ६३ मून्सच्या खात्यांची तपासणी करण्याचे आदेश दिले. आर्थिक गुन्हे शाखेने एन. एस. ई. एल.(NSEL) व ६३ मून्स चे संचालक आणि प्रमुख व्यवस्थापन कर्मचारी आणि एन. एस. ई. एल. (NSEL) चे व्यापारी सदस्य आणि दलाल यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता आणि एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या तरतुदींनुसार गुन्हे दाखल केले.

७. ३० सप्टेंबर २०१३ रोजी वोस्ताक फार ईस्ट सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड, गुंतवणूक, व्यापार आणि वित्तपुरवठ्याच्या व्यवसायात गुंतलेली कंपनी, चे संचालक पंकज रामनरेश सराफ ह्यांनी एन. एस. ई. एल. (NSEL) मधील प्रमुख व्यवस्थापन पदे धारण करणारे संचालक आणि व्यक्ती, २५ कर्जदार/व्यापारी सदस्य आणि एन. एस. ई. एल. (NSEL) च्या काही दलालांविरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम १२० बी, ४०९, ४६५, ४६८, ४७१, ४७४ आणि ४७७ ए अंतर्गत गुन्ह्यांसाठी ३० सप्टेंबर २०१३ रोजी तक्रार[7] दाखल केली. तक्रारदाराने सांगितले की तो प्रामुख्याने टी + २ आणि टी + २५ करारांमध्ये व्यवहार करत होता. ते पुढे म्हणाले की, एन. एस. ई. एल.(NSEL) ने व्यापार स्थगित केल्यापासून आणि सर्व एक दिवसीय फॉरवर्ड काँट्रॅक्टस वरील तडजोड पंधरा दिवसांसाठी पुढे ढकलल्यापासून, त्यांना विविध करारांतर्गत देय असलेल्या २०२ लाख रुपयांची रक्कम

---

66 **"FMC"**

77 F.I.R. क्र. २०१३ चा २१६

मिळालेली नाही. १४ ऑगस्ट २०१३ रोजी, त्यांच्या दलालाने त्यांना कळवले की एन. एस. ई. एल. (NSEL) ने सात महिन्यांनंतर थकबाकी भरण्यासाठी सेटलमेंट अनुसूची जारी केली आहे. 'अस्तित्त्वात नसलेल्या वस्तूंच्या' 'खोट्या' वखाराच्या पावत्या देऊन वस्तूंचा व्यापार केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. एन. एस. ई. एल.(NSEL) ने ठेवीदारांच्या (खरेदीदारांच्या) वतीने 'विश्वस्त' म्हणून अधिस्वीकृत केलेल्या वस्तू वाखरांमध्ये ठेवल्या तसेच गैरव्यवहार हा दंडनीय विश्वासघात आहे, असा आरोपही तक्रारीत करण्यात आला होता. वरील गोष्टींव्यतिरिक्त, एन. एस. ई. एल. (NSEL) ने सेटलमेंट गॅरंटी फंड[8] चा गैरवापर केल्याचा आरोपही त्यांनी केला.

८. त्यानंतर एफआयआर मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे[9] शाखेकडे हस्तांतरित करण्यात आला. प्रकरण दाखल करण्यात आले आणि एफ. आय. आर. मध्ये एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याचे कलम ३ आणि ४ जोडण्यात आले. हे प्रकरण एम. पी. आय. डी. (MPID)[10]1010 कायद्यांतर्गत स्थापन केलेल्या विशेष न्यायालयात हस्तांतरित करण्यात आले. एन. एस. ई. एल. (NSEL) ने कायद्याच्या तरतुदींनुसार एक्सचेंज ही 'वित्तीय संस्था' नाही या आधारावर एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याला आव्हान देणारी रिट याचिका दाखल केली. १ ऑक्टोबर २०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने ही याचिका खालील कारणांमुळे फेटाळली होतीः

(i) तपासादरम्यान ई. ओ. डब्ल्यू.(EOW) ने गोळा केलेल्या दस्तऐवजा वरून असे उघड झाले की एन. एस. ई. एल. (NSEL ) ने उपनियमानुसार आपले विनिमय कार्य केले नाही. हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते की एन. एस. ई. एल. (NSEL) ने व्यापाऱ्यांसमोर दर्शित केले की त्यांना प्रतिभूतीमुक्त कर्ज दिले जाईल आणि त्यांना प्रति वर्ष १४ ते १६ टक्के निश्चित परतावा मिळेल.

(ii) अभिलेखावरून असे दिसून येते की व्यवहार मालांच्या प्रत्यक्ष वितरणासह नव्हते. अनेक प्रकरणांमध्ये एन. एस. ई. एल. (NSEL) आणि वस्तूंच्या पुरवठादारांची खाती जुळत नव्हती. एन.एस.ई.एल. (NSEL) आणि व्यापारी सदस्यांमधील संगनमतामुळे आकोमोडेशनच्या

---

8 8“SGF”

9 9“EOW”

10 10 २०१४ चे एमपीआयडी प्रकरण १ म्हणून प्रकरण नोंदवण्यात आले होते.

(accommodation) अनेक नोंदी घेण्यात आल्या होत्या असेही अभिलेखा वरून दिसून येते .;

(iii ) एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या कलम २ (डी) मध्ये 'वित्तीय संस्था' ची व्याख्या योजना अन्वये कोणतीही ठेवी स्वीकारणारी व्यक्ती अशी केली आहे. एम. पी. आय. डी. (MPID ) कायद्याच्या कलम २ (सी) मध्ये 'ठेव' या शब्दाची सर्वसमावेशक व्याख्या देण्यात आली आहे. एन. एस. ई. एल.(NSEL) ने व्यापाऱ्यांना आश्वासन दिले होते की, जोड करारातील (paired contracts) त्यांच्या गुंतवणुकीमुळे त्यांना प्रति वर्ष १४ ते १६ टक्के परतावा मिळेल, त्यामुळे परताव्याची पावती प्रथमदर्शनी 'ठेव' च्या व्याख्येत येईल; आणि

(iv) आरोपपत्र व पूरक आरोपपत्र दाखल करण्यात आले आहेत. एन. एस. ई. एल. (NSEL) कडे न्यायचौकशी न्यायालयासमोर आरोपमुक्तीसाठी अर्ज करण्याचा पर्यायी उपाय आहे.

९. महाराष्ट्र शासनाने २१ सप्टेंबर २०१६ रोजी एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या कलम ४ अंतर्गत अधिसूचना जारी केली ज्याद्वारे उत्तरवादी ची मालमत्ता जप्त करण्यात आली. अधिसूचनेचा संबंधित उतारा खाली उद्धृत केला आहेः

"क्र. एमपीआय -२०१६/प्र.क्र.५४१/बी/पोल-११:- ज्याअर्थी मेसर्स ला-फिन फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स ला-फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (यापुढे 'उक्त वित्तीय संस्था' म्हणून संदर्भित) यावित्तीयसंस्थेने ठेवीदारांकडून स्वीकारलेल्या ठेवी मुदत पुर्तीनंतर परत करण्यास कसूर केली आहे,अशा तक्रारी त्यांच्याविरुध्द बहुतांश ठेवीदारां कडून प्राप्त झालेल्या आहेत,

आणि ज्याअर्थी, राज्यशासनाची अशी खात्री झाली आहे की, उक्त वित्तीय संस्था आणि त्यांचे अध्यक्ष/संचालक ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत करण्याची शक्यता नाही आणि म्हणून, राज्यशासनाला अशा ठेवीदारांच्या हितसंबंधाचे रक्षण करावे लागेल,

आणि ज्याअर्थी, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली मालमत्ता उक्त

वित्तीय संस्थेकडून आणि त्यांच्या अध्यक्ष/संचालकांकडून आणि उक्त वित्तीय संस्थेकडून गोळा केलेल्या ठेवींमधून आणि ठेवींतून संपादित करण्यात आलेली आहे असे अभिकथित आहे.

त्याअर्थी आता, महाराष्ट्र ठेवीदारांच्या(वित्तीयसंस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ (२०००चा महा.१६)(यात यापुढे ज्याचा उक्त अधिनियम असानिर्देश करण्यात आला आहे)याच्या कलम ४ चे पोटकलम (१),कलम५ आणि कलम ८ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापरकरुन महाराष्ट्र शासनयाद्वारे अनूसुचीत विनिर्दिष्ट केल्या प्रमाणे, उक्त वित्तीय संस्थेची आणि त्यांचेअध्यक्ष/संचालक यांच्या नावे असलेली मालमत्ता जप्त करीत आहे."

१०. २६ ऑक्टोबर २०१६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाविरूद्ध दाखल केलेली विशेष अनुमती याचिका मागे घेतल्याने खारीज केली . २१ सप्टेंबर २०१६ रोजी एम. पी. आय. डी.(MPID) कायद्याच्या कलम ४ अंतर्गत, उत्तरवादिंची मालमत्ता जप्त करण्यासंबंधी, जारी केलेल्या अधिसूचनेला आवाहन देण्यासाठी अपीलकर्त्यांनी यांनी रिट याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली. एम. पी. आय. डी.(MPID) कायद्याच्या कलम ४ आणि ५ च्या वैधतेस, ते संविधानाच्या अनुच्छेद १४, १९ आणि ३००-ए चे उल्लंघन करणारे आहेत या आधारावर आव्हान देण्यात आले होते. रिट याचिकेत मागितलेले अनुतोष खाली द्धृत केले आहेः

"ए. एम.पी.आय.डी. (MPID) कायद्याचे कलम ४ आणि ५ हे संविधाना च्या अनुच्छेद १४, १९ आणि ३००-अ चे उल्लंघन करणारे आहेत असे माननीय न्यायालय घोषित करू शकते आणि परिणामी, उत्तरवादी, त्याचे कर्मचारी आणि/किंवा प्रतिनिधी यांना त्या तरतुदींचे पालन करण्यापासून प्रतिबंधित करणारे रिट, आदेश किंवा निर्देश, उत्तरवादिंना प्रतिबंधित करणारे आदेश किंवा निर्देश , मांड्यामस रिट आणि/किंवा इतर कोणतेही योग्य रिट, जारी करू शकते.

बी. वरील 'अ' प्रार्थना लक्षात घेता, एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या कलम ४ अंतर्गत अधिकारांचा वापर करून उत्तरवादी यांनी दिनांक २१.०९.२०१६ रोजी जारी केलेली आक्षेपित अधिसूचना (येथे निशाणी -एस आहे) रद्दबातल करणारा रिट आदेश किंवा निर्देश संविधानाच्या कलम २२६ अंतर्गत जारी करावे ;

सी . पर्याय म्हणून, दिनांक २१.०९.२०१६ रोजीची अधिसूचना ही एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या कलम ४ आणि ५ अंतर्गत अधिकारिताबाह्य असल्याचे नमूद करून रद्दबातल करून , त्या स्वरूपात सरशीओररी (Certiorari) रिट , आदेश किंवा निर्देश किंवा संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत अन्य कोणतेही योग्य रिट , आदेश किंवा निर्देश जारी करावे.

११. महाराष्ट्र शासनाने ४ एप्रिल २०१८[11]1111, ७ एप्रिल २०१८[12]1212, ११ एप्रिल २०१८[13]1313, १९ एप्रिल २०१८[14]1414, १५ मे २०१८[15]1515 आणि १९ ऑक्टोबर २०१८[16]1616 रोजी एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या कलम ४ आणि ५ अंतर्गत पुढील अधिसूचना जारी करून देण्यात कसूर केलेला पैसे वसूल करण्यासाठी उत्तरवादी ची मालमत्ता जप्त केली. रिट याचिकांवर एकत्रित सुनावणी घेण्यात आली आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या दिनांक २२ ऑगस्ट २०१९ रोजीच्या न्यायनिर्णयाद्वारे याचिका निकाली काढण्यात आल्या.

याचिका खालील कारणांवर मंजूर करण्यात आलीः

(i) खरेदीदाराकडून मिळालेली देय रक्कम केवळ त्याच तारखेला विक्रेत्याकडे पाठवण्याच्या उद्देशाने होती. ही रक्कम एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या कलम २ (सी) च्या कक्षेत येणार नाही, ज्याच्या संदर्भात 'ठेव' ही एखाद्या मौल्यवान वस्तुची पावती किंवा स्वीकृती असणे आवश्यक आहे, जी विशिष्ट कालावधीनंतर वित्तीय संस्थांद्वारे 'परतफेड' केली जाईल;

(ii ) एन.एस.ई.एल. (NSEL) ने केवळ बॉम्बे स्टॉक एक्सचेंज प्रमाणेच सुविधा पुरवठादाराची भूमिका बजावली. एन. एस. ई. एल. (NSEL) ला मुदतसमाप्ती नंतर परत करण्याच्या बंधनासह पैसे मिळाले नाहीत. विक्री

---

1111 अधिसूचना क्र. एम. पी. आय./१११८/सी. आर.-३९४/पोल-११

12 12 अधिसूचना क्र. एमपीआय-१११८/सी. आर. ३२९/पोल-११

13 13 अधिसूचना क्र. एम. पी. आय.-१११८/सी. आर. ४३४/पोल११ सह १९ एप्रिल २०१८ रोजीचे शुद्धिपत्र क्र. एम. पी. आय. क्रमांक१११८/सी. आर.-४३४/पोल ११

14 14 अधिसूचना क्र. एमपीआय १११८/सी. आर. ४९९९ पोल ११

15 15 अधिसूचना क्र. एमपीआय- १११८/सी. आर. ५९७/पोल ११

16 16 अधिसूचना क्र. एमपीआय १११८/सी. आर. १०४०/पोल ११

करणाऱ्या सदस्यां द्वारे  खरेदी करणाऱ्या सदस्यां कडून मूल्यवर्धित कर (व्हॅट) गोळा केला जातो आणि एन. एस. ई. एल. (NSEL ) द्वारे टी. डी. एस. कापला जात नाही ही वस्तुस्थिती सूचित करते की एन. एस. ई. एल. (NSEL)  हा केवळ पास- थ्रू प्लॅटफॉर्म आहे;

(iii ) एन. एस. ई. एल. (NSEL) ला खात्रीशीर परताव्यासह कोणताही पैसे  किंवा वस्तु मिळाल्याचे कराराच्या नोंदिं द्वारे उघड केले जात नाही. त्याऐवजी, खरेदी करार आणि विक्री करारातील फरक म्हणजे सदस्याला मिळणारा नफा. व्यवहारातून मिळणारा नफा, वस्तु विकली गेल्याच्या आणि परतफेडीचे वेळापत्रक ठरवलेल्या दिवसांची संख्या विचारात घेऊन दोन रकमांची बेरीज करून निर्धारित केला जातो. विक्री करार (जो दुसरा करार आहे) नियोजित कालावधीनुसार तो वेगवेगळ्या उत्पादनांनुसार बदलतो;

iv ) व्यापाऱ्यांच्या खातेवहीतील नोंदींमध्ये वितरण दायित्व परावर्तित होते आणि व्यापारानुसार जमा/खर्च  नोंदवले जातात .एन. एस. ई. एल. (NSEL) च्या सेटलमेंट बँक खात्यातील नोंदी एका विशिष्ट व्यापाऱ्याकडून मिळालेली रक्कम दर्शवतात. पे-इन आणि पे-आउटच्या नोंदी वैयक्तिक व्यापाऱ्यांच्या खात्याशी जुळतात;

(v) श्री. पंकज सराफ यांनी त्यांच्या एफआयआर मध्ये त्यांनी एन. एस. ई. एल. (NSEL) मध्ये पैसे जमा केल्याचे नमूद केलेले नाही. पुढील व्यवहार बंद होईपर्यंत प्लॅटफॉर्मवरील व्यापार यशस्वी असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

(vi) व्यवहार चुकीचे झाले होते कारण एन. एस. ई. एल.(NSEL) ला दिलेल्या कारणे दाखवा नोटीसमध्ये दर्शविल्याप्रमाणे, व्यापाराच्या थकबाकीच्या स्थितीचा परिणाम दिवसाच्या अखेरीस वितरणात झाला नाही. ३१  जुलै २०१३ नंतर, २४  विक्रेते टी + २५ दिवशी वस्तू परत खरेदी करून कराराच्या त्यांच्या भागाची आद्दती करण्यात अयशस्वी ठरले. हे दिलेल्या सवलतीचे उल्लंघन असल्याचे नमूद करण्यात आले. तथापि, यामुळे एन. एस. ई. एल. (NSEL) ला एम. पी. आय. डी.(MPID ) कायद्याच्या कलम २ (सी) च्या अर्थानुसार कोणतीही 'ठेवी' प्राप्त झाली नाही, कारण एन. एस. ई. एल.

(NSEL) ला वस्तू किंवा पैसे  राखून ठेवण्यासाठी मिळाले नाहीत, ही वस्तुस्थिती बदलत नाही.

(vii) ई. ओ. डब्ल्यू. (EOW ) ने ४ ऑगस्ट २०१४ रोजी आरोपपत्र दाखल केले ज्यामध्ये असे म्हटले गेले होते की की देवाणघेवाणीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य हे आहे की ते हमी देते की दोन्ही पक्ष त्यांच्या करारातील  जबाबदाऱ्यांचे पालन करतील आणि जर व्यापारी सदस्य पैसे देण्यास असमर्थ असेल तर देवाणघेवाण वस्तू विकेल आणि पैसे  वसूल करेल. आरोपपत्रात असेही नमूद केले आहे की एन. एस. ई. एल.(NSEL) ने गुंतवणूकदारांना वाखारांमध्ये वस्तू जमा न करता करार करण्यास प्रोत्साहित केले. तथापि, आरोपपत्रातून हे स्पष्ट होते की ईओडब्ल्यू (EOW ) चेही असे मत होते की एक्सचेंज (Exchange) केवळ व्यवहार प्रतिनिधी म्हणून काम करत होते. पुढे, एफ. एम. सी.(FMC) कडून १६ ऑगस्ट २०१३ रोजी लिहिलेल्या पत्राद्वारे, एन. एस. ई. एल.(NSEL)  ने कसूरदारांची माहिती मागितली होती;

(viii) केवळ एका माहितीपत्रकात प्रतिवर्ष  १४ ते १६ टक्के चे निश्चित उत्पन्न नमूद केल्यामुळे, 'ठेव' केली गेली असे मानले जाऊ शकत नाही;

(ix) एन. एस. ई. एल. (NSEL) आणि पुरवठादारांची खाती जुळत नसल्यास आणि वस्तूंचे वितरण केले नसल्यास, हे आय. पी. सी. (I.P.C.) च्या कलम ४६५ आणि ४६७ अंतर्गत गुन्हा ठरू शकते. एन. एस. ई. एल. (NSEL) यापैकी कोणत्याही दायित्वातून मुक्त नाही;

(x) सर्वाधिक, सदस्यांना टी + २५ वर देय रक्कम परत करावी लागत असल्याने, त्यांचा अर्थ 'वित्तीय संस्था' असा लावला जाऊ शकतो;

(xi) वखाराच्या पावत्या व्यवहाराचे स्वरूप स्थापित करत नाहीत किंवा वस्तुंच्या ठेवी, 'ठेवी' च्या व्याख्येच्या कक्षेत येतील असे मानले जाऊ शकत नाही कारण वखारात जमा होणारी वस्तु विक्रेत्याने विकली होती;

(xii) एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या कलम ४  अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या मालमत्तांची जप्ती वैध आहे की नाही यावर **६३ मून्स टेक्नॉलॉजीज -**

**विरुद्ध - भारत सरकार [17]1717** मधील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा कोणताही परिणाम होत नाही.

(xiii) १७ कसूरदार कंपन्यांच्या न्यायसहायक अहवालात असे दिसून आले आहे की कसूरदारांनी निधीचा वापर केला आहे आणि ते त्यांच्या सिस्टर कंपन्यांकडे हस्तांतरित केले आहेत;

(xiv) गुजरात उच्च न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या डिफॉल्टिंग ट्रेडिंग सदस्यांपैकी एकाच्या दुसऱ्या प्रकरणात, महाराष्ट्र सरकारच्या गृह विभागाच्या उपसचिवांनी व्यापारी सदस्याला 'डिफॉल्टर' म्हणून संबोधले होते, ज्याने भारतीय दंड संहितेच्या कलम ४०९, ४६५, ४६७, ४६८, ४७१ आणि ४७४ अंतर्गत गुन्हे केले होते;

(xv) ज्या तरतुदींचा गैरवापर केला जाऊ शकतो त्यांची 'विस्तृत व्याप्ती' लक्षात घेऊन एम. पी. आय. डी. (MPID ) कायद्याच्या कलम ४ चे वाचन करणे आवश्यक आहे हा युक्तिवाद खुला ठेवला आहे कारण सर्वोच्च न्यायालयाने **के. के. भास्करन -विरुद्ध- राज्य आणि सोनल हेमंत जोशी -विरुद्ध- महाराष्ट्र राज्य** या प्रकरणात तामिळनाडू आणि पाँडिचेरीमधील ठेवीदार कायद्यांची घटनात्मक वैधता कायम ठेवली आहे, हे विशेषत: लक्षात घेऊन की हा निर्णय एम. पी. आय. डी. ( MPID) कायद्यालाही लागू होईल, कारण तरतुदी समान आहेत.

(xvi) २४ ऑक्टोबर २०१८ रोजी अंतरिम आदेशाद्वारे, मालमत्ता जप्त करणाऱ्या आक्षेपित अधिसूचनांना, जप्ती ही देण्यात कसूर केलेल्या रकमेपेक्षा जास्त होती, या आधारावर स्थगिती देण्यात आली होती . अंतरिम आदेशात असे नमूद करण्यात आले होते की देण्यात कसूर केलेली रक्कम हि ४८२२.५३ कोटी रुपये आहे आणि अधिकाऱ्यांनी ८५४७ कोटी रुपये किमतीची मालमत्ता जप्त केली आहे, ज्यात एन. एस. ई. एल. (NSEL) च्या २२०० कोटी रुपयांचा समावेश आहे. या आदेशाला सर्वोच्च न्यायालयासमोर

---

1717 (२०१९) १८ एससीसी ४०१

आव्हान देण्यात आले होते आणि त्यांनी हस्तक्षेप करण्यास नकार दिला; आणि

(xvii) यू. एस. गांधी अँड कंपनीने सादर केलेल्या लेखापरीक्षा अहवालत कासूरदार असलेल्या व्यापारी सदस्यांच्या व्यापार दायित्वांचा शोध घेण्यात आला आहे. एन. एस. ई. एल. ने थकबाकीदारां विरुद्ध वसुलीचे दावेही दाखल केले आहेत.

**ब. सादरीकरणे**

१२ . अपीलकर्त्याची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील श्री. जयंत मेहता यांनी सादर केलेः

(i) एम. पी. आय. डी. कायद्याच्या कलम २ (सी) मधील 'ठेवी' ची व्याख्या व्यापक आणि सर्वसमावेशक आहे. उद्दिष्टांचे विवरण आणि कायदा लागू करण्याची कारणे लक्षात घेऊन तरतुदीचा व्यापक अर्थ लावला गेला पाहिजे ;

(ii) एन. एस. ई. एल. (NSEL ) ला विक्रेत्याकडून पैसे मिळाले आणि ते (वस्तूंच्या माध्यमातून) परत केले. एन. एस. ई. एल. (NSEL ) ने विक्रेत्यांकडून वस्तू प्राप्त केल्या आणि ठराविक कालावधीनंतर रोख रकमेच्या समतुल्य रक्कम परत केली. त्यामुळे एन. एस. ई. एल. (NSEL) ने विक्रेता आणि खरेदीदार या दोघांकडून बँक ठेवी स्वीकारल्या;

(iii ) जोड कराराद्वारे (paired contract),विकत घेणारा सदस्य खरेदी करार विकत घेईल आणि त्याच वेळी एन. एस. ई. एल. (NSEL) ने जोडलेला विक्री करार विकेल. खरेदी करणाऱ्या सदस्याला १४-१६ % चा वार्षिक परतावा देण्यासाठी एन. एस. ई. एल. (NSEL) ने विक्री किंमत पूर्वनियोजित केली होती;

(iv) एन.एस.ई.एल. (NSEL) हा (खरेदीदार च्या दृष्टीने) रोकड व (विक्रेत्याच्या च्या दृष्टीने) मौल्यवान वस्तू या दोन्हींचा निक्षेपग्राही आहे.

(v) एम.पी.आय.डी. (MPID) कायद्याच्या कलम ७ अंतर्गत नियुक्त न्यायालयासमोर मालमत्ता जप्तीविरोधात आक्षेप नोंदवण्याचा पर्यायी उपाय असल्याने, उच्च न्यायालयासमोर उत्तरवादी यांनी दाखल केलेली रिट याचिका दाखल करून घेण्यायोग्य नव्हती. तसेच, कलम १० अंतर्गत नियुक्त

न्यायालयाच्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या कलम ११ च्या संदर्भात आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उच्च न्यायालयात अपील करू शकते; आणि

(vi) तडजोडीचे चक्र तुटले कारणः

(अ) एन. एस. ई. एल.(NSEL) ने, त्याच्या उपनियमांच्या आणि नियमांच्या विरुद्ध जाऊन, वस्तूंची साठवणूक केली नाही. खरेदी करणाऱ्या सदस्याला वस्तू साठवून ठेवण्यात आल्या आहेत की नाही याची माहिती नव्हती; आणि

(ब) वखरातील वस्तु ही प्रतिभूती असेल आणि एन. एस. ई. एल. (NSEL ) ही प्रति-हमीदार असेल, या आश्वासनावरून खरेदी करणाऱ्या सदस्याला जोड कराराचे (paired contract) आमिष दाखवण्यात आले. तथापि, एन. एस. ई. एल. (NSEL) ने विक्री करणाऱ्या सदस्यांशी संगनमत केले आणि वस्तु वखारांमध्ये जमा आहेत याची खात्री न करता व्यापार सुलभ केला.

१३. महाराष्ट्र शासनाची बाजू मांडणारे ए. एस. जी.(ASG ) विक्रमजीत बॅनर्जी यांनी खालील बाबी मांडल्याः

(i) एन. एस. ई. एल. (NSEL) ही एम. पी. आय. डी.(MPID) कायद्याच्या कलम २ (डी) अंतर्गत वित्तीय संस्था आहे कारण त्यांनी कलम २ (सी) अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे बँक ठेवी स्वीकारल्या आहेत. एन. एस. ई. एल. (NSEL) 'शेतकरी' करार, जोड करार (paired contracts), ई-मालिका करार (e-series contracts) आणि इतर माध्यमातून विविध प्रकारच्या वस्तूंमध्ये व्यापार करीत आहेत. एन. एस. ई. एल. (NSEL) ने गुंतवणूकदारांना खात्रीशीर परताव्याची हमी दिली;

(ii ) परताव्याच्या आश्वासनासह गोदाम पावत्यांची तरतूद असल्याने एन.एस.ई.एल. (NSEL) ठेवी स्वीकारत असल्याचे सूचित करते;

(iii) न्यू होरिझॉन **शुगर मिल्स लिमिटेड -विरुद्ध -पाँडिचेरी शासन**[18]1818 या प्रकरणात या न्यायालयाने असे म्हटले आहे की गुंतवणूकदारांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने वित्तीय संस्थां बाबत कायदे करण्यास राज्य विधानमंडळ सक्षम आहे. न्यायालयाने असेही म्हटले आहे की 'वित्तीय संस्थां' या अभिव्यक्तीमध्ये कंपनी कायद्यांतर्गत समाविष्ट केलेल्या कंपनीसारखी नैसर्गिक आणि कायदेशीर व्यक्ती समाविष्ट आहे. या न्यायालयाने **के. के. भास्करन -विरुद्ध- राज्य**[19]**1919, राज्य -विरुद्ध- के. एस. पलानीचामी**[20]**2020 आणि पी. जी. एफ. -विरुद्ध- भारताचे संघराज्य**[21]2121 या प्रकरणांमध्ये असे म्हटले आहे की वित्तीय संस्थांचे नियमन करणाऱ्या कायद्याचा उद्देश गुंतवणूकदारांचे संरक्षण करणे हा आहे. त्यामुळे हा मुख्य उद्देश लक्षात घेऊन कायद्यातील तरतुदींचा अर्थ लावला गेला पाहिजे.

(iv ) या न्यायालयाने **६३ मून्स टेक्नॉलॉजीज** (उपरोल्लेखित) प्रकरणात असे म्हटले आहे की एन. एस. ई. एल.(NSEL) ने वस्तूंच्या जोड करारांमध्ये (paired contracts) व्यापार केला आणि यामुळे विक्री आणि खरेदी व्यवहारांपेक्षा वेगळे आर्थिक व्यवहार निर्माण झाले; आणि

(v) उत्तरवादी कडे एम. पी. आय. डी.(MPID) कायद्याच्या कलम १० अंतर्गत पर्यायी सांविधिक उपाय उपलब्ध आहे.

१४. उत्तरवादी ची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील डॉ. अभिषेक मनू सिंघवी यांनी सांगितले कीः

(i) वस्तु विक्रेत्यांना खरेदीदारांकडून टी + २ वर पैसे मिळाले आणि टी + २५ वर पैसे परतफेड करण्याचे बंधन होते. एन. एस. ई. एल. (NSEL) ने कसूरदारांच्या विरोधात हुकूमनामा मिळवला. म्हणून, अपीलकर्ते, फार फार तर, केवळ असा युक्तिवाद करू शकतात की डिफॉल्टिंग ट्रेड सदस्य (एनएसईएल नाही) 'वित्तीय संस्था' आहेत;

18 18(२०१२) १० एससीसी ५७५
19 19(२०११) ३ एससीसी ७९३
20 20(२०१७) १६ एससीसी ३८४
21 21(२०१५) १३ एससीसी ५०

(ii) गृह विभागाने ३१ मार्च २०१७ आणि २४ मार्च २०१८ रोजी जारी केलेल्या अधिसूचनांमध्ये राज्याने एक्सचेंजच्या कसूरदार सदस्यांना 'कसूरदार कंपन्या' आणि 'वित्तीय संस्था' म्हणून वैशिष्ट्यीकृत केले आहे, जे एनएसईएल (NSEL) कसूरदार नसल्याचे सूचित करते;

(iii) ई. ओ. डब्ल्यू.(EOW) ने सादर केलेल्या न्यायसहायक अहवालानुसार, कसूरदार सदस्यांकडे संपूर्ण पैश्याचा माग आढळला आहे. एन. एस. ई. एल. (NSEL) ला 'ठेव' म्हणून कोणतेही पैसे मिळाले नाहीत;

(iv ) महाराष्ट्र शासनाने प्रतिज्ञापत्र सादर करतांना गुजरात उच्च न्यायालयामध्ये एका सदस्याशी (खरेदीदार) संबंधित प्रलंबित असलेल्या प्रकरणातचा हवाला देत सांगितले की कसूरदार सदस्यांनी गुंतवणूकदारांची फसवणूक केली आहे;

(v) जरी आक्षेपित निकाल कायम राहिला तरी एन. एस. ई. एल. (NSEL) ला आय. पी. सी. (I.P.C.) अंतर्गत त्याच्या फौजदारी दायित्वातून मुक्त केले जाणार नाही परंतु एम. पी. आय. डी. (MPID) कायद्यांतर्गत कोणतेही फौजदारी दायित्व उद्भवणार नाही. एन. एस. ई. एल.(NSEL) आणि ६३ मून्सवर इतर विविध फौजदारी कारवाईनुसार खटले चालवले जात आहे. त्यांना दिवाणी खटल्यांनाही सामोरे जावे लागेल;

(vi) सध्याच्या रु. ४६७६ कोटीच्या थकबाकी दाव्याच्या बदल्यात रु ६००० कोटी पेक्षा जास्त रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

(vii) एन. एस. ई. एल. (NSEL) केवळ कसूरदारांकडून पैसे वसूल करण्यास बांधील आहे. त्यांनी सदस्यांकडून ३,३९७ कोटी रुपयांचा हुकूमनामा/लवाद निवाडा मिळवला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने, त्यांनी नियुक्त केलेल्या समितीने कसूरदारांच्या विरोधात १३६.९८ कोटी रुपयांचे निश्चित केलेले दायित्व, स्वीकारले आहे. समितीने कसूरदारांच्या विरोधात आणखी ७६० कोटी रुपयांचे दायित्व निश्चित केले आहे, जे मुंबई उच्च न्यायालयाकडे स्वीकृतीसाठी प्रलंबित आहे.

(viii) एन. एस. ई. एल. (NSEL) ने पाच राज्यांमध्ये कसूरदारांविरुद्ध हुकूमनाम्याच्या आणि निवाड्याच्या अंमलबजावणी करिता कार्यवाही दाखल केली आहे. या प्रक्रियाला वेळ लागत असल्याने, एन. एस. ई. एल. (NSEL) ने अनुच्छेद ३२ अंतर्गत या न्यायालयासमोर एक याचिका[22]2222 दाखल केली, ज्यात अंमलबजावणीच्या सर्व कार्यवाहीचे एकत्रीकरण करण्याची मागणी केली गेली;

(ix) एन. एस. ई. एल.(NSEL ) ला एम. पी. आय. डी.(MPID) कायद्याच्या कलम २ (सी) अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे कोणतीही 'ठेव' प्राप्त झाली नाही, कारणः

(अ) ज्या आक्षेपित अधिसूचनांद्वारे उत्तरवादी ची मालमत्ता एम. पी. आय. डी. (MPID ) कायद्याच्या कलम ४ अंतर्गत जप्त करण्यात आली होती, त्या अधिसूचना केवळ एन. एस. ई. एल. ने पैसे स्वीकारले जे ते परत करण्यात अयशस्वी ठरले आणि वस्तूंच्या स्वीकृतीबाबत ठेवीचा कोणताही संदर्भ मिळाला नाही या आधारावर काढण्यात आल्या;

(ब) सरकार त्यानंतरच्या प्रतिज्ञापत्राद्वारे कारणे सुधारू शकत नाही (**मोहिंदर सिंग गिल -विरुद्ध - सी. ई. सी.[23]2323 वर आधारित**); आणि

(क) एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या कलम २ (सी) अंतर्गत 'ठेव' च्या व्याख्येनुसार, केवळ 'मौल्यवान' वस्तुच्या ठेवीचा समावेश आहे. सामान्य बोलण्यात, मौल्यवान वस्तु केवळ सोने, चांदी किंवा इतर मौल्यवान धातूंपुरत्या मर्यादित आहेत. एन. एस. ई. एल. (NSEL) ने केवळ कृषी वस्तु आणि पोलादामध्ये व्यापार केला. कृषी वस्तु या व्याख्येत समाविष्ट नाहीत.

(x) एन. एस. ई. एल. (NSEL) च्या प्लॅटफॉर्मवर सहभागी झालेले व्यापारी हे कॉर्पोरेट व्यापारी आहेत. एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या उद्दिष्टांच्या आणि कारणांच्या विवरणपत्रात असे म्हटले आहे की हा कायदा 'छोट्या' ठेवीदारांच्या संरक्षणासाठी आहे;

---

22 22 २०१९ चा डब्ल्यू. पी. (सी) क्रमांक ३३५

23 23(१९७८) १ एस. सी. सी. ४०५

(xi) एम. पी. आय. डी. (MPID) कायद्या अंतर्गत कार्यवाही ही एन. एस. ई. एल. ( NSEL ) आणि ६३ मून्स या दोघांविरुद्ध प्रलंबित असलेल्या दिवाणी खटल्यांना शॉर्ट सर्किट करेल. ६३ मून्स ही ५०,००० हून अधिक भागधारक, ८०० कर्मचारी आणि २० लाख वापरकर्ते असलेली सार्वजनिक सूचीबद्ध कंपनी आहे. जर ६३ मुन्स ची मालमत्ता जप्त केली गेली तर हितसंबंध्यांयांचे बाधित होतील; आणि

(xii) व्यापाऱ्यांकडून मिळणाऱ्या कोणत्याही पैशावर एन. एस. ई. एल. (NSEL) चे नियंत्रण नव्हते. एन. एस. ई. एल. (NSEL) हा एक पास थ्रू प्लॅटफॉर्म आहे, जिथे त्याच दिवशी काउंटर पार्टी दलालांना पैसे पाठवण्यात आले होते.

१५. उत्तरवादी ची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील श्री. मुकूल रोहतगी यांनी खालील बाबी मांडल्याः

(i) एन. एस. ई. एल. (NSEL) शेअर बाजाराप्रमाणेच कमोडिटी एक्सचेंज (commodity exchange) चालवते. एन. एस. ई. एल. (NSEL) हे केवळ व्यवहार करणारे माध्यम आहे आणि ते 'ठेवी' गोळा करत नाही किंवा परताव्याची हमी देत नाही.

(ii) एन. एस. ई. एल. (NSEL ) व्यापाऱ्यांकडून व्यापार मूल्याच्या (0.१ टक्के) म्हणजे लाखावर १०० रुपये दलाली मिळवते ;

(iii) **भास्करन** प्रकरणामध्ये (उपरोल्लेखित), या न्यायालयाने असे म्हटले आहे की तामिळनाडू ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण कायदा १९९७[24]2424 हा घटनात्मकदृष्ट्या वैध आहे. निकालाच्या परिच्छेद १५ मध्ये, न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की तामिळनाडू कायदा आणि एम. पी. आय. डी. (MPID) मध्ये किरकोळ फरक असला तरी, निकालात घेतलेला दृष्टिकोन एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या वैधतेसाठी तितकाच लागू होईल. या न्यायालयाने कायद्यातील तरतुदींची तपासणी न करता अनुच्छेद १४,१९ आणि २१ च्या आधारावर आव्हान फेटाळले. त्यामुळे

---

2424 **"तामिळनाडू अधिनियम "**

न्यायालयाला सध्याच्या प्रकरणातील एम. पी. आय. डी. कायद्याच्या तरतुदींच्या घटनात्मक वैधतेचे परीक्षण करण्यापासून अवरोधित केले नाही.

(iv) एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याचे कलम ४ हे मनमानी आणि घटनात्मकदृष्ट्या अवैध आहे आणि ते अतिशय विस्तृत आहे कारणः

(अ) कलम ४ चे पोटकलम (१), उक्त वित्तीय संस्थांच्या प्रवर्तक, संचालक, भागीदार, व्यवस्थापक किंवा सदस्य यांची मालमत्ता जप्त करणे अनिवार्य करते.

(ब) कलम ४ चे उपकलम (२) योग्य कायदेशीर प्रक्रिया न करता जप्त केलेल्या मालमत्तांचे अधिकार काढून घेतात; आणि

(क) कलम ७ मध्ये असे म्हटले आहे की नियुक्त न्यायालय वित्तीय संस्थांना किंवा ज्याची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे अशा इतर कोणत्याही व्यक्तीला नोटीस बजावेल आणि दावा करण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तिंकडून आक्षेप घेतला जाईल. त्यानंतर, आक्षेप सी. पी. सी. (C.P.C.) १९०८ च्या आदेश ३७ अंतर्गत संक्षिप्त कार्यवाहीद्वारे निश्चित केला जाईल. अशाप्रकारे, संक्षिप्त प्रक्रियेद्वारे मालमत्तेच्या मालकीचे अधिकार काढून घेणे हे मनमानी स्वरूपाचे आहे.

(v) एन. एस. ई. एल. (NSEL) ने त्यांच्या प्लॅटफॉर्म वर केलेला व्यवहार जरी कागदावर वस्तूंची देवाणघेवाण असल्यासारखा वाटत असला, तरी तो धनको आणि कर्जदार यांच्यातील करार होता. त्यामुळे, कर्ज फेडण्यात चूक करणाऱ्या कर्जदाराला त्याची परतफेड करण्यासाठी जबाबदार धरले जाऊ शकते;

(vi) न्यायसहायक लेखापरीक्षणात एन. एस. ई. एल. (NSEL) कडे नव्हे, तर कर्ज घेणाऱ्या व्यापाऱ्यांकडे पैशाचा माग जातो;

(vii) सहा संलग्नक अधिसूचनांपैकी पाच अक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या "सर्वसमावेशक अधिसूचना" होत्या; आणि

(viii) एन. एस. ई. एल. (NSEL) ने १६ टक्के परताव्याचे व्यापक आश्वासन दिले नाही. याचा अर्थ केवळ 'सुज्ञ गुंतवणूक' करणाऱ्या गुंतवणूकदारांना १६ टक्के वार्षिक परतावा मिळेल असा होता.

**सी. विश्लेषण**

**सी. १ एम. पी. आय. डी. (MPID ) कायद्याची चौकट**

१६ . महाराष्ट्रातील विधिमंडळाने एम. पी. आय. डी. (MPID) कायदा लागू केला आणि २१ जानेवारी २००० रोजी त्याला राष्ट्रपतींची संमति मिळाली. या विधेयकाच्या प्रस्तावाशी संबंधित उद्दिष्टे आणि कारणांच्या निवेदनात असे म्हटले आहे की ठेवींच्या स्वरूपात जनतेकडून पैसे हडपणाऱ्या वित्तीय संस्थांच्या वाढत्या धोक्यापासून जनतेचे संरक्षण करण्यासाठी हा कायदा लागू करण्यात आला आहेः

> "अलीकडच्या काळात महाराष्ट्र राज्यात वित्तीय संस्थांची वाढ झपाट्याने होत आहे. या संस्थांचा एकमेव उद्देश, अभूतपूर्व उच्च आकर्षक व्याज दर किंवा बक्षिसांच्या आश्वासनांवर आणि गुंतवणूकदारांना मुदत समाप्ती नंतर ठेव परत करण्याच्या कोणत्याही बंधनाशिवाय किंवा हमी दिल्याप्रमाणे, त्या बदल्यात सेवांचे प्रदान सुनिश्चित करण्यासाठी कोणत्याही तरतुदीशिवाय, जनतेकडून, मुख्यतः मध्यम वर्गीयांकडून आणि गरीबांकडून बँक ठेवी म्हणून मिळालेले पैसे मिळवणे हा आहे. यापैकी अनेक वित्तीय संस्थांनी बँक ठेवी जनतेला परत करण्यात कसूर केली आहे. अशा बँक ठेवी कोट्यवधी रुपयांच्या असल्याने, यामुळे जनतेमध्ये तीव्र नाराजी आणि गोंधळ निर्माण झाला आहे, ज्यामुळे महाराष्ट्र राज्यात, विशेषतः भारताची "आर्थिक राजधानी " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईसारख्या शहरात कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील अशा वित्तीय आस्थापनांच्या अनैतिक कृत्यांना आळा घालण्यासाठी लोकहितार्थ योग्य कायदा करणे उपयुक्त ठरेल."

१७. एम. पी. आय. डी. (MPID) कायद्याच्या कलम ३ मध्ये मुदत संपल्यानंतर ठेवींची परतफेड करण्यात कपटपूर्ण रीतीने कसूर केलेल्या वित्तीय संस्थेच्या व्यवस्थापनास

किंवा तिचा धंदा अथवा कामकाज चालविण्यास जबाबदार असलेल्या प्रवर्तक, भागीदार, संचालक, व्यवस्थापक किंवा कोणतीही अन्य व्यक्ती किंवा कर्मचारी यांसह, प्रत्येक व्यक्तीस, दोषी ठरवल्यावर शिक्षेची तरतूद आहे. कलम ३ खालील अटींमध्ये आहेः

"जिने अभिवचन दिल्याप्रमाणे मुदत संपल्यानंतर व्याज, लाभांश, फायदा यांच्या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य स्वरूपातील कोणत्याही लाभांसह ठेवीची कोणतीही परतफेड करण्यास कपटपूर्ण रीतीने कसूर केली असेल किंवा आश्वासन दिल्याप्रमाणे ठेवीच्या बदल्यात सेवा देण्यास कपटपूर्ण रीतीने कसूर केली असेल अशा कोणत्याही वित्तीय संस्थेस, अशा वित्तीय संस्थेच्या व्यवस्थापनास किंवा तिचा धंदा अथवा कामकाज चालविण्यास जबाबदार असलेल्या प्रवर्तक, भागीदार, संचालक, व्यवस्थापक किंवा कोणतीही अन्य व्यक्ती किंवा कर्मचारी यांसह, प्रत्येक व्यक्तीस, अपराधसिद्धीनंतर सहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल आणि अशी वित्तीय संस्थादेखील एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल.

स्पष्टीकरण.-- या कलमाच्या प्रयोजनार्थ, ज्या वित्तीय संस्थेने अभिवचन दिल्याप्रमाणे व्याज, लाभांश, फायदा यांच्या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य स्वरूपातील अशा लाभांसह अशा ठेवीची परतफेड करण्यात कसूर केली असेल किंवा अशा ठेवीच्या बदल्यात कबूल केलेली कोणतीही विनिर्दिष्ट सेवा देण्यास कसूर केली असेल किंवा एखाद्या व्यक्तीला अन्याय्य लाभ देण्याच्या हेतूने किंवा अन्य एखाद्या व्यक्तीची अन्याय्य हानी करण्याच्या हेतूने, ठेवीच्या बदल्यात कबूल केलेली कोणतीही विशिष्ट सेवा देण्यास कसूर केली असेल किंवा अशी ठेव स्वीकारताना दिलेल्या अव्यवहार्य किंवा व्यापारी दृष्ट्या व्यवहार्य नसलेल्या अभिवचनांमधून उद्भवणाऱ्या किंवा अशा ठेवीमधून संपादन करण्यात आलेला पैसे किंवा मत्ता, आवश्यक तेव्हा त्या परंत मिळविण्यात ज्यामध्ये अंगभूत जोखीम अंतर्भूत असेल अशा रीतीने उपयोगात आणल्यामुळे उद्भवणाऱ्या तिच्या असमर्थतेमुळे, अशी कसूर केली असेल त्या वित्तीय संस्थेने कपटपूर्ण रीतीने अशी कसूर केली असल्याचे किंवा विशिष्ट सेवा देण्यात कसूर केली असल्याचे मानण्यात येईल"

कलम ४ मध्ये अशी तरतूद आहे की, ठेवीदारांकडून तक्रारी प्राप्त झाल्यावर किंवा अन्यथा शासनाची अशी खात्री पटली असेल की, कोणत्याही वित्तीय संस्थेने, मुदत संपल्यानंतर किंवा ठेवीदारांनी मागणी केल्यावर ठेव परत करण्यात, किंवा व्याज किंवा आश्वासन दिलेला इतर लाभ देण्यात; किंवा अशा ठेवीच्या बदल्यात देण्याचे अभिवचन दिलेली सेवा पुरविण्यात कसूर करीत आहे तर त्या बाबतीत किंवा-- कोणतीही वित्तीय संस्था ठेवीदारांची फसवणूक करण्याच्या इराद्याने त्यांच्या हितसंबंधास हानिकारक ठरेल अशा रीतीने बुद्धिपुरस्सरपणे काम करीत आहे असे शासनाला सकारण वाटत असल्यास, ते वित्तीय आस्थापनाने अधिग्रहित केलेले पैसे किंवा मालमत्ता ठेवीतून जप्त करू शकते. जर असा पैसे किंवा मालमत्ता जप्त करण्यासाठी उपलब्ध नसेल तर वित्तीय संस्था किंवा प्रवर्तक, संचालक, भागीदार, व्यवस्थापक किंवा सदस्याची मालमत्ता जप्त केली जाऊ शकते, असे या तरतुदीत म्हटले आहे.

१८. कलम ५ मध्ये सक्षम प्राधिकाऱ्याच्या नियुक्तीची तरतूद आहे तर कलम ६ मध्ये विशेष न्यायालयासाठी तरतूद आहे. कलम ७ जप्तीसंबंधी विशेष न्यायालयाच्या अधिकारांचा उल्लेख करते. कलम ७ अंतर्गत, कलम ५ अन्वये अर्ज आल्यानंतर विशेष न्यायालय वित्तीय संस्थेला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस ज्याची मालमत्ता जप्त करायची आहे, त्याला जप्तीचा आदेश का करू नये यासंबंधी कारणे दाखवा नोटीस जारी करेल. त्याच प्रमाणे त्या मालमत्तेमध्ये हितसंबंध आहे अशा सर्व व्यक्तिंना नोटीस पाठवेल आणि त्यांना मालमत्तेमध्ये किंवा मालमत्तेच्या भागामध्ये त्यांचा हितसंबंध असल्याच्या कारणावरून जप्तीचा आक्षेप घेण्यास फर्मावेल. जर कारण देण्यात आले नाही तर जप्तीचा आदेश करण्यात येईल आणि जप्त केलेल्या मत्तेच्या वसुलीसाठी व समन्याय वाटपाकरिता निदेश देण्यात येईल. जर कारण दाखवले गेले असेल तर विशेष न्यायालय त्याच्या तपासणीची कार्यवाही करील आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ३७ खालील संक्षिप्त कार्यपद्धतीचे अनुसरण करेल. कलम ११ मधील तरतुदींनुसार विशेष न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध अपील करता येते.

१९. एन. एस. ई. एल.(NSEL) कडे कलम ४ अंतर्गत, थकबाकी रकमेच्या फेडीसाठी कसूर केल्याने, जप्तीसाठी पुरेसे पैसे किंवा मालमत्ता नसल्यामुळे, महाराष्ट्र राज्याने एन. एस.

ई. एल.(NSEL) च्या ९९.९ % समभागांची मालकी असलेल्या उत्तरवादी ची मालमत्ता जप्त केली.

**सी.२ एन. एस. ई. (NSE) ची चौकट**

२० एन. एस. ई. एल. (NSEL) च्या कार्याची आणि कामकाजाची रचना निश्चित करण्यासाठी एन. एस. ई. एल. (NSEL) च्या उपनियमांचा संदर्भ घेणे आवश्यक आहे. उपनियम २.१७ मध्ये "मान्यताप्राप्त वखाराची पावती " ची व्याख्या खालील प्रमाणे देण्यात आली आहे :-

> " मान्यताप्राप्त वखाराची पावती म्हणजे मान्यताप्राप्त वखार म्हणून एक्सचेंजच्या अधिकाराखाली किंवा एक्सचेंजद्वारे मान्यताप्राप्त कोणत्याही एजन्सीद्वारे जारी केलेली पावती, जी मान्यताप्राप्त वखार पावतीचा लाभार्थी मालक किंवा धारकाद्वारे नमूद केलेल्या श्रेणीच्या आणि गुणवत्तेच्या वस्तूंच्या मान्यताप्राप्त प्रमाणाच्या मालकीचा पुरावा देते. मान्यताप्राप्त वखाराची पावती एकतर प्रत्यक्ष स्वरूपात किंवा कायद्याने परवानगी दिल्याप्रमाणे डिमटेरियलाइज्ड/इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असू शकते."

'मान्यताप्राप्त वखार या पदावलीची व्याख्या उपनियम २.१८ मध्ये "वस्तूंमधील व्यवहारामुळे उद्भवलेल्या कंत्राटी जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी वितरण करण्यासाठी आणि वितरण घेण्यासाठी एक्स्चेंजने मंजूर केलेले आणि नियुक्त केलेले वखार' अशी केली आहे." "
उपनियम २.५१ मध्ये 'मार्जिन' ची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहेः

> "मार्जिन म्हणजे **एखाद्या वस्तुमध्ये स्थिती स्थापित करण्यासाठी किंवा टिकवून ठेवण्यासाठी रोख रक्कम/इतर निर्दिष्ट मत्ता/कागदपत्रांची ठेव किंवा भरणा** आणि त्यात प्रारंभिक मार्जिन, विशेष मार्जिन, सामान्य मार्जिन, वितरण कालावधी मार्जिन, अतिरिक्त मार्जिन आणि व्हेरिएशन (variation) मार्जिन किंवा एक्सचेंजद्वारे वेळोवेळी निर्धारित केल्या जाणाऱ्या इतर कोणत्याही प्रकारच्या मार्जिनचा समावेश असतो." **(भर देण्यात आला)**

२१. 'वखार पावती' या शब्दप्रयोगाची व्याख्या उपविधी २.९६ मध्ये केली आहे, ज्याचा अर्थ असा आहे की एखादी वस्तु मान्यताप्राप्त वखारामध्ये ठेवली जात आहे याचा पुरावा देणारा दस्तऐवज. उपविधी ३.७ मध्ये दायित्वाच्या मर्यादेची तरतूद आहेः

"एक्सचेंज त्याच्या सदस्यांच्या किंवा कोणत्याही सदस्याच्या नावाने काम करणाऱ्या कोणत्याही अधिकृत किंवा अनधिकृत व्यक्तीने एकट्याने किंवा संयुक्तपणे केलेल्या कोणत्याही कृताकृतकरिता जबाबदार राहणार नाही आणि कोणत्याही वेळी, त्यांच्यापैकी कोणीही एक्सचेंजचा अभिकर्ता म्हणून केलेले कृताकृत असा अर्थ लावला जाणार नाही. या उपविधींमध्ये आणि एक्सचेंजच्या व्यवसाय नियम आणि विनियमांमध्ये अन्यथा विशेषतः प्रदान केल्याप्रमाणे वगळता, एक्सचेंजला कोणतेही दायित्व सोसावे लागणार नाही किंवा असे मानले जाणार नाही. आणि त्यानुसार, एक्सचेंज, संचालक मंडळाचा कोणताही सदस्य/किंवा त्याने विधिवत नियुक्त केलेली समिती किंवा एक्सचेंजच्या वतीने काम करणारी इतर कोणतीही अधिकृत व्यक्ती, एक्सचेंजच्या सदस्यांनी एक्सचेंजद्वारे केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या संबंधित किंवा त्याच्याशी संबंधित इतर कोणत्याही बाबींबाबत, जे एक्सचेंजच्या व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी, सुलभ करण्यासाठी, सहाय्य करण्यासाठी, विनियमित करण्यासाठी किंवा अन्यथा व्यवस्थापित करण्यासाठी, एक्सचेंजच्या संस्थापन समयलेख आणि नियमावलीत परिभाषित केल्याप्रमाणे त्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हाती घेतले आहेत म्हणून त्यांच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा दायित्व नसेल."

२२. उपविधी ४.२० (ए ) मध्ये असे म्हटले आहे की वस्तूंमधील सर्व अपूर्त व्यवहार अनिवार्यपणे एक किंवा अधिक वितरण केंद्रांवर किंवा एक्सचेंजचे मान्यताप्राप्त वखारांमध्ये वितरित केले जातील. उपविधीच्या खंड (बी) मध्ये असे म्हटले आहे की जर अपूर्त व्यवहारांचा निपटारा वितरण देऊन किंवा प्राप्त करून केला गेला नसेल, तर एक्सचेंजच्या व्यवसाय नियमांनुसार आतबोलीने परत घेतल्या जाईल किंवा संपूर्ण विक्री करून त्याचा लिलाव केला जाईलः

(अ) वस्तूंमधील सर्व अपूर्त व्यवहार सर्वसाधारणपणे एक्सचेंजद्वारे मान्यताप्राप्त, प्रमाणित आणि नियुक्त केलेल्या कोणत्याही एक किंवा अधिक वितरण केंद्रांवर आणि/किंवा वखरांमध्ये अनिवार्य वितरणासाठी असतील.

(बी ) वितरण देऊन किंवा प्राप्त करून निकाली न निघालेल्या सर्व अपूर्त स्थितीत असलेल्यांचा लिलाव, व्यवस्थापन संचालकांनी किंवा अशा समितीने

विहित केलेल्या दंडासह, एक्सचेंजच्या व्यवसाय नियमांनुसार आतबोलीने परत घेतल्या जाईल किंवा संपूर्ण विक्री केला जाईल.

उपविधी ७.१०.२ मध्ये असे नमूद केले आहे की कसुर केल्याचे कारण सेटलमेंट गॅरंटी फंडात समाविष्ट नसलेल्या अयोग्य व्यापारांखाली नसल्यास प्रत्येक समाशोधन सदस्याप्रती असलेल्या वचनबद्धतेसाठी एक्सचेंज जबाबदार असेलः

"सेटलमेंट गॅरंटी फंड (एस. जी. एफ.) अंतर्गत न येणारे अनुचित व्यवहार हे कसुर केल्याची कारण आहेत अशा परिस्थितीत वगळता उर्वरित समाशोधन सदस्य ज्यांच्याशी त्यांनी व्यवहार केले आहेत त्यांनी कसूर केली आहे की नाही हे प्रत्येक समाशोधन सदस्याला दिलेल्या वचनबद्धतेसाठी एक्सचेंज जबाबदार असेल..."

उपविधी ७.११ मध्ये असे म्हटले आहे की, इतर गोष्टींबरोबरच, मार्जिन देयके प्राप्त करणे, वखार पावत्यांचे प्रमाणीकरण आणि कागदपत्र पुढे पाठविण्याची जबाबदारी एक्सचेंजच्या समाशोधन गृहावर असेल. उपविधी ७.११ खालीलप्रमाणे आहेः

"एक्सचेंजचे समाशोधन गृह , संबंधित समितीने किंवा संबंधित प्राधिकरणाने निर्दिष्ट केलेल्या पद्धतीने, **मार्जिन देयके प्राप्त करणे आणि देखरेख करणे, खुली स्थिती आणि मार्जिनवर देखरेख ठेवणे आणि दस्तऐवज, देयके आणि प्रमाणित वखार पावत्या** व्यापारी-तथा-समाशोधन सदस्यांमध्ये आणि एक्सचेंजच्या संस्थात्मक समाशोधन सदस्यांमध्ये हस्तांतरित करण्यासाठी जबाबदार असेल."

**(भर दिला जातो)**

उपविधी ९ मध्ये समाशोधन आणि सेटलमेंटची तरतूद आहे. उपविधी ९.५, ९.६ आणि ९.७ हे खालीलप्रमाणे आहेत :

" ९.५ खरेदी किंवा विक्रीची ऑर्डर **तेव्हाच जुळणारा व्यवहार होईल जेव्हा तो व्यापार प्रणालीमध्ये जोडला जाईल** आणि समाशोधन गृहाला इतर कोणत्याही विचारांवर आणि खालील बाबी करारानुसार आणि/किंवा क्रमाने आहेत याची पडताळणी केल्यानंतर ऑर्डर अवैध असल्याचे आढळत नाहीः

(i ) वस्तु,

(ii ) किंमत निर्देशांक,

(iii ) प्रमाण,

(iv ) व्यवहाराचे उद्धृत

**(भर दिला जातो)**

९.६ एकदा का समाशोधन गृहाने व्यापार जुळवला आणि बाजारासाठी चिन्हांकित केला की**, ज्या विशिष्ट वस्तूंमध्ये एक्सचेंजने आर्थिक जबाबदाऱ्यांची हमी देण्याची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे, त्या विशिष्ट वस्तूंमधील समाशोधन सदस्यांच्या सर्व निव्वळ आर्थिक जबाबदाऱ्यांसाठी एक्सचेंजला काउंटर पार्टी म्हणून बदलले जाईल.**

**(भर दिला जातो)**

९.७ सर्व अपूर्त व्यवहार मूळ करारांच्या पक्षांवर, म्हणजेच एक्सचेंजच्या सदस्यांवर, डिलिव्हरी नोटीस किंवा डिलिव्हरी ऑर्डर जारी होईपर्यंत किंवा वितरणासाठी पैसे देईपर्यंत बंधनकारक असतील.

२३. उपविधी १० मध्ये वितरणासंदर्भात तरतुदी आहेतः

"१०.१ अपूर्त स्थितीची पूर्तता करण्यासाठी, व्यापार नियम किंवा विनियमांमध्ये विहित केलेल्या पद्धतीने संबंधित समाशोधन सदस्यांद्वारे डिलिव्हरी ऑर्डरनुसार वस्तु समाशोधन गृहाकडे पाठवल्या जातील.

१०.२ एक्सचेंज प्रत्येक वस्तुसाठी दिवस आणि वितरण कालावधी निश्चित करेल ज्या दरम्यान अपूर्त विक्री स्थिती असलेल्या विक्रेत्यांनी त्यांच्या संबंधित समाशोधन सदस्यांद्वारे समाशोधन गृहाला डिलिव्हरी ऑर्डर जारी करणे आवश्यक आहे.

१०.३ समाशोधन गृह त्याला प्राप्त झालेले डिलिव्हरी ऑर्डर, अपूर्त दीर्घ खुली स्थितीत असलेल्या एक किंवा अधिक खरेदीदारांना, संबंधित प्राधिकरणाने योग्य समजल्या जाणाऱ्या पद्धतीने वाटप करेल.

१०.४ संबंधित प्राधिकरण एखाद्या वस्तुचा व्यापार सुरू करण्यापूर्वी, निविदा केल्या जाऊ शकणाऱ्या वस्तूच्या विविध श्रेणी आणि अशा श्रेणीसाठी सवलती आणि हप्ते आधीच निर्दिष्ट करू शकते.

१०.५ दिवसाच्या शेवटी अपूर्त असलेल्या सर्व स्थितीमुळे संबंधित प्राधिकरणाने निश्चित केलेल्या व्यवहाराच्या तारखेच्या अंतिम दराने अनिवार्य वितरणाचे दायित्व असेल. प्रत्यक्ष व्यवहार किंमत आणि अंतिम किंमतीतून उद्भवणारे फरक, प्रत्यक्ष

वितरण प्रलंबित असताना, व्यापाराच्या दुसऱ्या दिवशी सदस्यांकडून प्राप्त केले जातील आणि त्यांना वितरित केले जातील. डिलिव्हरी ऑर्डर जारी करण्यात अपयशी ठरलेल्या अपूर्त स्थितीतील विक्रेत्यांवर संबंधित प्राधिकरण दंड विहित करू शकते आणि ज्या खरेदीदारांकडे खरेदी अपूर्त स्थितीत आहे आणि ज्याचा वितरण उचलण्याचा हेतू आहे आणि विक्रेत्याच्या अपयशामुळे अशा स्थितीविरुद्ध डिलिव्हरी ऑर्डर प्राप्त करू शकत नाहीत अशा खरेदीदारांना वितरण सुनिश्चित करण्यासाठी एक्सचेंज लिलाव आयोजित करू शकते. लिलाव प्रक्रियेदरम्यान वस्तूंची उपलब्धता नसल्यास, व्यवसाय नियमात परिभाषित केल्यानुसार क्लोज-आउट प्रक्रिया लागू होईल. संबंधित प्राधिकरण अपूर्त स्थितीत असलेल्या खरेदीदारांवर दंड विहित करू शकते जे त्याच्या खरेदीच्या कर्तव्याच्या बदल्यात पैसे भरण्यात अयशस्वी ठरतात आणि विक्रेत्यांना त्यांच्या विक्रीच्या कर्तव्याच्या बदल्यात वितरित केलेल्या वस्तूंची किंमत मिळेल आणि खरेदीदारांच्या अपयशामुळे पैसे मिळू शकणार नाहीत याची खात्री करण्यासाठी एक्सचेंज विक्री लिलाव आयोजित करू शकते. लिलाव प्रक्रियेदरम्यान योग्य खरेदीदार उपलब्ध नसल्यास, व्यवसाय नियमात परिभाषित केल्यानुसार क्लोज-आउट प्रक्रिया लागू होईल. अशा बंद होण्याशी संबंधित देय रक्कम आणि दंड निर्धारित कालावधीत भरण्यात अयशस्वी झाल्यास सदस्याला कसूरदार म्हणून घोषित केले जाईल आणि त्याला शिस्तभंगाच्या कार्यवाहीसाठी जबाबदार धरले जाईल."

२४. उपविधी १०.७ मध्ये असे अभिप्रेत आहे की डिलिव्हरी ऑर्डर जारी करणाऱ्या विक्रेत्याला डिलिव्हरी ऑर्डर दरानुसार वितरित केलेल्या वस्तुची संपूर्ण किंमत समाशोधन गृहाकडून प्राप्त होईल, जी उपविधी अंतर्गत विहित केलेल्या हप्त्याच्या किंवा सवलतीच्या भरण्याच्या किंवा कपातीच्या अधीन असेल. उपविधी १०.८ अंतर्गत, खरेदीदाराला समाशोधन गृहाला, एक्सचेंजने त्याच्याकडून वाटप केलेले वितरण मूल्य, निर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत द्यावे लागते. तथापि, वितरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच एक्सचेंजच्या समाधानासाठी पैसा समाशोधन गृहाद्वारे विक्रेत्याला दिले जातील. उपविधी खालीलप्रमाणे आहेः

"१०.८ खरेदीदार, एक्सचेंजद्वारे निर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत, एक्सचेंजद्वारे त्याच्या खात्यावर वाटप केलेले वितरण मूल्य समाशोधन गृहाला देईल. खरेदीदाराला देण्यात आलेल्या डिलिव्हरी ऑर्डरनुसार त्याच्याकडून वितरणाची संपूर्ण किंमत मिळाल्यानंतर, एक्सचेंज डिलिव्हरी ऑर्डरला मान्यता देईल. **त्यानंतर, वितरण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, पैसा समाशोधन गृहाकडे ठेवले जातील आणि वितरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच विक्रेत्याकडे एक्सचेंजच्या समाधानासाठी पाठवले जातील. परिस्थितीनुसार, गुणवत्ता, प्रमाण आणि मालवाहतूक घटकांशी संबंधित समायोजन केल्यानंतर समाशोधन गृह ही रक्कम विक्रेत्याकडे पाठवेल.** अशा समायोजनांनंतर शिल्लक राहिलेली रक्कम, जर काही असेल, तर ती समाशोधन गृहाकडून खरेदीदाराला दिली जाईल किंवा त्यांच्याकडून वसूल केली जाईल.

**(भर दिला जातो)**

उपविधी १०.११ मध्ये अशी तरतूद आहे की डिलिव्हरी ऑर्डर जारी करताना, वस्तूच्या विक्रेत्याने समाशोधन सदस्याचे समाधान केले पाहिजे की त्याच्या मालकीच्या आवश्यक प्रमाण आणि गुणवत्ता असलेल्या वस्तूंचा पुरेसा साठा त्याच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या ताब्यात आहे. उपविधी १०.१२ असे नमूद करतो कीः

"**विक्रेता सदस्याला संबंधित वस्तुसाठी एक्सचेंजद्वारे निर्दिष्ट केलेल्या वितरण केंद्रांवरच आधी वितरण करण्याचा अधिकार आहे.** एक्सचेंजने निर्दिष्ट केलेल्या वितरण प्रक्रियेनुसार काटेकोरपणे अशा निर्दिष्ट केंद्रांवर वितरण केले जाऊ शकते.वितरण करण्यापूर्वी, विक्रेत्याने एक्सचेंजद्वारे नामिकाप्रविष्ट केलेल्या सर्वेक्षणकर्त्याकडून प्रमाणपत्र घेणे देखील आवश्यक आहे आणि अशा प्रमाणपत्रासह त्याने समाशोधन गृहाला दिलेली डिलिव्हरी ऑर्डर असणे आवश्यक आहे. सर्वेक्षणकर्त्याच्या प्रमाणपत्रात दिल्या केलेल्या वस्तूंची गुणवत्ता स्पष्टपणे विनिर्देश केली जाईल आणि एक्सचेंजच्या कराराच्या तपशीलांनुसार अशी गुणवत्ता देण्यायोग्य आहे याची देखील पुष्टी केली जाईल. **यापैकी कोणत्याही अटींचे पालन न झाल्यास, डिलिव्हरी ऑर्डर सुरुवातीपासूनच नाकारला जातो.**

**(भर दिला जातो)**

२५. अशा प्रकारे, वरील उपविधीनुसार, विक्री सदस्य केवळ वितरण केंद्रांवरच वितरण देऊ करण्यास पात्र आहे, जे वितरणापूर्वी प्रदान केलेल्या वितरण प्रक्रियेनुसार

एक्सचेंजमध्ये काटेकोरपणे निर्दिष्ट केले आहे. विक्रेत्याला सर्वेक्षकाचे प्रमाणपत्र घ्यावे लागते, जे त्याने समाशोधन गृहाला दिलेल्या डिलिव्हरी ऑर्डरसह द्यावे लागते. उपविधी १०.१४, १०.१५, आणि १०.१६ मध्ये खालील अटी असतातः

> " १०.१४ एक्सचेंजचे सदस्य आणि त्यांच्या माध्यमातून व्यवहार करणारे ग्राहक/घटक, संबंधित प्राधिकरणाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या वितरण प्रक्रिया, नमुने घेण्याच्या पद्धती, सर्वेक्षण, वाहतूक, साठवण, पॅकिंग, वजन आणि अंतिम तोडगा काढण्याच्या प्रक्रियेचे काटेकोरपणे पालन करतील. अशा पद्धतीचे कोणतेही उल्लंघन झाल्यास संबंधित प्राधिकरणाकडून वेळोवेळी निर्दिष्ट केल्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.
>
> १०.१५ वस्तूच्या विक्रेत्याने एक्सचेंजच्या नियमांमध्ये, व्यवसाय नियमांमध्ये आणि विनियमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीत वस्तूतील त्याच्या निव्वळ विक्रीच्या स्थितीनुसार आणि त्याअंतर्गत वेळोवेळी जारी केलेल्या सूचना आणि आदेशांनुसार निर्दिष्ट प्रमाण वितरित केले पाहिजे, जे कराराच्या तपशीलात एक्सचेंजने निर्दिष्ट केलेल्या गुणवत्तेची पुष्टी करतील. असे करण्यात अयशस्वी झाल्यास, अशी निव्वळ विक्री स्थिती लिलावात खरेदी करून संपुष्टात आणली जाईल आणि विक्रेत्याला समाशोधन गृहाने ठरविल्याप्रमाणे फरक आणि त्याव्यतिरिक्त दंड भरावा लागेल.
>
> १०.१६ खरेदीदाराला त्याला दिलेल्या डिलिव्हरी ऑर्डरनुसार संबंधित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या कालावधीत निर्दिष्ट वखारातून वितरण उचलणे आवश्यक आहे. असे करण्यात अयशस्वी झाल्यास, त्याला वखार शुल्क, विमा शुल्क आणि वाढीव कालावधीसाठीच्या साठवणुकीशी संबंधित इतर खर्च आणि त्याव्यतिरिक्त दंड देखील भरावा लागेल."

२६. उपविधी १२ मध्ये सेटलमेंट गॅरंटी फंडासाठी तरतुदी आहेत. सेटलमेंट गॅरंटी फंड हा एक्सचेंजच्या सदस्यांनी केलेल्या ठेवींद्वारे तयार केला जातो आणि त्याचा वापर व्यापारी सदस्यांनी देयके भरण्यात चूक झाल्यास, विमा संरक्षण भरणे आणि एक्सचेंजचे नुकसान भरून काढण्यासाठी केला जातो. उपविधी १२.१.१ खालील अटींमध्ये आहेः

"१२.१ एक्सचेंजने सेटलमेंट गॅरंटी फंड राखण्यासाठी

१२.१.१ संबंधित प्राधिकरणाने वेळोवेळी विहित केलेल्या हेतूंसाठी एक्सचेंजच्या विविध वस्तू विभागांच्या संदर्भात एक्सचेंज सेटलमेंट गॅरंटी फंड राखेल."

२७. उपविधी १२.१.२ असे विहित करते की संबंधित प्राधिकरण वेळोवेळी सेटलमेंट गॅरंटीचे नियमन करणारे निकष आणि अटी निर्धारित करू शकते, ज्यात इतर गोष्टींबरोबरच प्रत्येक व्यापारी सदस्याने सेटलमेंट गॅरंटी फंडात ठेवण्याची किंवा अंशदान देण्याची रक्कम निर्दिष्ट केली जाऊ शकते. उपविधीत असेही म्हटले आहे की इतर अटींसह अंशदान , परतफेडीच्या अटी आणि निधीतून योगदान काढून घेण्याबाबत नियम बनवायचे आहेत. उपविधी १२.१.३ मध्ये असे म्हटले आहे की व्यापार सुरू करण्यापूर्वी निधीतील किमान रक्कम १ कोटी रुपये असणे आवश्यक आहे, जी योग्य प्रकारे वाढवली जाऊ शकते. उपविधी १२.२ मध्ये सेटलमेंट गॅरंटी फंडात अंशदान आणि ठेवीची तरतूद करण्यात आली आहेः

" १२.२ सेटलमेंट गॅरंटी फंडात अंशदान आणि बँक ठेवी

१२.२.१ **प्रत्येक सदस्याने संबंधित सेटलमेंट गॅरंटी फंडात अंशदान देणे आणि संबंधित प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी निर्धारित केल्याप्रमाणे किमान प्रतिभूती ठेव ठेवणे आवश्यक आहे**. सेटलमेंट गॅरंटी फंड एक्सचेंजकडे असेल. सेटलमेंट गॅरंटी फंडातील पैसा या उपविधींमध्ये, नियमांमध्ये, एक्सचेंजच्या व्यापार नियमांमध्ये आणि विनियमांमध्ये आणि त्याअंतर्गत वेळोवेळी जारी केलेल्या सूचना आणि आदेशांमध्ये प्रदान केल्याप्रमाणे लागू केला जाईल.

१२.२.२ संबंधित प्राधिकरण प्रत्येक सदस्य आणि/किंवा समाशोधन सदस्यांच्या श्रेणीद्वारे करावयाच्या अतिरिक्त अंशदानाची किंवा ठेवीची रक्कम निर्दिष्ट करू शकते, ज्यामध्ये इतर गोष्टींबरोबरच, प्रत्येक समाशोधन सदस्याने पुरवलेली किमान रक्कम समाविष्ट असू शकते.

१२.२.३ व्यवहारांच्या तडजोडीच्या संदर्भात, ओघाने येणाऱ्या बहुपक्षीयांचा परिणाम म्हणून, अशा व्यवहारांच्या आर्थिक तडजोडीची हमी देईल, जी त्याने वेळोवेळी संबंधित उपविधींमध्ये प्रदान केल्याप्रमाणे कायदेशीर प्रतिपक्ष म्हणून काम केले आहे.

१२.२.४ येथे निर्दिष्ट केल्याप्रमाणे कोणत्याही स्वरूपात, एक्सचेंजच्या समाशोधन गृहात समाशोधन सदस्याद्वारे ठेवली जाणारी प्रतिभूती ठेव आणि अतिरिक्त ठेवीची एकूण रक्कम सेटलमेंट गॅरंटी फंडाचा भाग असेल.

१२.२.५ संबंधित प्राधिकरणाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून, प्रतिभूती ठेवीसाठी समाशोधन सदस्याने जमा केलेली रक्कम परत करण्यायोग्य असेल. **समाशोधन सदस्याने जमा केलेली किंवा भरलेली कोणतीही रक्कम परत केली जाऊ शकते, परंतु अशी रक्कम अतिरिक्त असेल आणि समाशोधन सदस्याने कोणत्याही ग्राहकाचा किंवा समाशोधन बँकेचा दावा किंवा कोणतेही वास्तविक/स्पष्ट किंवा आकस्मिक दायित्व नसेल.**

**(भर दिला जातो)**

२८. उपविधी १२.३ मध्ये असे नमूद केले आहे की सदस्य रोख रक्कम, मुदत ठेवीच्या पावत्या, बँक हमी किंवा अशा इतर स्वरूपात ठेव देऊ शकतो.

१२.३ **अंशदान किंवा ठेवीचा प्रकार**

संबंधित प्राधिकरण, आपल्या विवेकबुद्धीनुसार, एखाद्या सदस्याला सेटलमेंट गॅरंटी फंडात, एकतर रोख, मुदत ठेवीच्या पावत्या, बँक गॅरंटी किंवा अशा इतर स्वरूपात किंवा पद्धतीमध्ये अंशदान करण्याची किंवा ठेव ठेवण्याची परवानगी देऊ शकते आणि संबंधित प्राधिकरणाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून.

उपविधी १२.४ मध्ये असे म्हटले आहे की बँक ठेवीची जागा नवीन बँक ठेवी घेऊ शकतात. उपविधी १२.५ मध्ये असे म्हटले आहे की सेटलमेंट गॅरंटी फंड रोख किंवा गुंतवणुकीच्या इतर मार्गांमध्ये गुंतवला जाऊ शकतोः

१२.४ **ठेवीचे पुनःस्थापन**

एक्सचेंजला नोटीस देऊन आणि संबंधित प्राधिकरणाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या अटींच्या अधीन राहून, सेटलमेंट गॅरंटी फंडातील सदस्याच्या अंशदानाचे किंवा ठेवी दर्शविणाऱ्या, सदस्य एक्सचेंजला दिलेल्या मुदत ठेवीच्या पावत्या किंवा बँक गॅरंटी काढू शकतो परंतु सदस्याने अशा पैसे काढण्याबरोबरच, समाशोधन गृह किंवा एक्सचेंजमध्ये रोख रक्कम, मुदत ठेवीच्या पावत्या किंवा बँक हमी जमा केल्या

असतील किंवा समाशोधन गृह  किंवा एक्सचेंजद्वारे वेळोवेळी मंजूर केल्या जाणाऱ्या इतर पद्धतीद्वारे अंशदान दिले असेल, जेणेकरून या उपविधींमध्ये  तरतूद केल्याखेरीज, त्याचे आवश्यक अंशदान किंवा ठेव पूर्ण करता येईल.

१२.५ सेटलमेंट गॅरंटी फंडातील गुंतवणूक

**सेटलमेंट गॅरंटी फंडातील निधी अशा मान्यताप्राप्त रोख आणि/किंवा गुंतवणुकीच्या इतर मार्गांमध्ये गुंतवला जाऊ शकतो**, ज्यासाठी मंडळाने वेळोवेळी अंमलात असलेले

संबंधित व्यवसाय नियम आणि विनियमांमध्ये तरतूद केली असेल.

**(भर दिला जातो)**

उपविधी  १२.६ मध्ये असे म्हटले आहे की सेटलमेंट गॅरंटी फंडाचा वापर (i ) निधीची देखभाल करणे; (ii ) निधीचा तात्पुरता वापर करून समाशोधन आणि सेटलमेंटच्या जबाबदाऱ्यांमुळे उद्भवणारे  अभाव  आणि कमतरता पूर्ण करणे; (iii ) विमा संरक्षण भरणे; (iv ) समाशोधन  आणि सेटलमेंटच्या जबाबदाऱ्यांमुळे होणारे नुकसान भरून काढणे; आणि (v ) सदस्यांना परतफेड करणे, जी शिल्लक रक्कम वापरानंतर उपलब्ध आहे, या उद्देशाने केला जाऊ शकतो.

" १२.६ सेटलमेंट गॅरंटी फंडची व्यवस्था  आणि वापर

१२.६.१ सेटलमेंट गॅरंटी फंडचा  वापर या उपविधींमध्ये  आणि विनियमांमध्ये प्रदान केलेल्या हेतूंसाठी केला जाऊ शकतो आणि संबंधित प्राधिकरण वेळोवेळी विहित करू शकेल अशा अटींच्या अधीन राहून, ज्यात समाविष्ट असू शकतेः

ए. सेटलमेंट गॅरंटी फंडाची निर्मिती आणि देखभालीच्या  खर्चाची फेड करणे ;

बी. वेळोवेळी अंमलात असलेल्या या उपविधींमध्ये, नियमांमध्ये, एक्सचेन्जच्या व्यवसाय नियम आणि विनियमांमध्ये प्रदान केल्याप्रमाणे, अशा व्यवहारांच्या संदर्भात समाशोधन सदस्यांच्या समाशोधन आणि सेटलमेंटमुळे उद्भवणाऱ्या अभाव  आणि कमतरता पूर्ण करण्यासाठी सेटलमेंट गॅरंटी फंडाचा  तात्पुरता वापर;

सी. संबंधित प्राधिकरण वेळोवेळी घेऊ शकणाऱ्या विमा संरक्षणावरील हप्त्याची रक्कम भरणे आणि/किंवा संबंधित प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी ठरवल्याप्रमाणे दरवर्षी विशिष्ट रक्कम हस्तांतरित करून पूर्वनिर्धारित राखीव निधी तयार करणे;

डी. वेळोवेळी लागू असलेल्या या उप-विधी , नियम, एक्सचेंजचे व्यवसाय नियम आणि विनियमांमध्ये प्रदान केल्याप्रमाणे, अशा व्यवहाराच्या समाशोधन आणि सेटलमेंटच्या कार्यातून उद्भवणारे एक्सचेंजचे कोणतेही नुकसान किंवा दायित्व पूर्ण करणे;

ई. जेव्हा असा सदस्य, सदस्य म्हणून राहणार नाही , तेव्हा एक्सचेंजचे उपविधी , नियम, एक्सचेंजचे व्यवसाय नियम आणि विनियमांनुसार सर्व जबाबदाऱ्या पूर्ण केल्यानंतर ठेवीच्या परतफेडीशी संबंधित तरतुदींनुसार सदस्याला शिल्लक रकमेची परतफेड करणे आणि

एफ. इतर कोणताही उद्देश जो संबंधित प्राधिकरणाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेला आहे.

२९. उपविधी १२.७ आणि १२.८ मध्ये व्यापारी सदस्याच्या सेटलमेंटच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात अपयशी ठरल्याबद्दल किंवा जेव्हा त्याला कसूरदार म्हणून घोषित केले जाते तेव्हा निधीचा वापर करण्याची विशेष तरतूद आहेः

**“ १२.७ जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात अपयशी ठरल्यावर केलेला वापर**

जेव्हा जेव्हा एखादा सदस्य त्याच्या व्यवहाराच्या संबंधात त्याच्या समाशोधन आणि सेटलमेंट ऑपरेशन्समुळे उद्भवलेल्या त्याच्या एक्सचेंजच्या सेटलमेंट जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात अयशस्वी होतो, ज्या की या उपविधीत आणि एक्सचेंजचे व्यवसाय नियम आणि विनियमांनुसार प्रदान केले जाऊ शकते, तेव्हा संबंधित प्राधिकरण वेळोवेळी निर्दिष्ट करील अशा अटी आणि शर्तींनुसार त्याच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी संबंधित प्राधिकरण सेटलमेंट गॅरंटी फंड आणि उक्त सदस्याच्या खात्यात असलेल्या इतर पैशांचा वापर करू शकेल;

१२.८ सेटलमेंटच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्यास किंवा कसूरदार घोषित झाल्यावर

जेव्हा जेव्हा एखादा सदस्य त्याच्या व्यवहाराच्या संबंधात उद्भवलेल्या त्याच्या एक्सचेंजच्या सेटलमेंट जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात अयशस्वी होतो, ज्या की वेळोवेळी या उपविधीत आणि एक्सचेंजचे व्यवसाय नियम आणि विनियमांनुसार प्रदान केले जाऊ शकते किंवा जेव्हा जेव्हा एखादा सदस्य कसूरदार म्हणून घोषित केला जातो तेव्हा संबंधित प्राधिकरण वेळोवेळी निर्दिष्ट करील अशा अटी आणि

शर्तींनुसार त्याच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी संबंधित प्राधिकरण सेटलमेंट गॅरंटी फंड आणि उक्त सदस्याचा असलेल्या इतर पैशांचा वापर करू शकेल;

[...]

१२.९.२ जर वरील सर्व शीर्षकांखालील संचयी रक्कम पुरेशी नसेल, तर सर्व समाशोधन सदस्यांविरुद्ध शिल्लक जबाबदाऱ्यांचे मूल्यांकन त्यांच्या एकूण अंशदानाच्या आणि प्रतिभूती ठेवीच्या समान प्रमाणात केले जाईल आणि समाशोधन सदस्यांनी, संबंधित प्राधिकरण वेळोवेळी या संदर्भात निर्दिष्ट करेल अशा कालावधीत सेटलमेंट गॅरंटी फंडामध्ये कमी असलेली रक्कम जमा करणे किंवा अंशदान देणे आवश्यक असेल."

[...]

उपविधी १२.११ मध्ये असे म्हटले आहे की ठेवीचे वाटप एक्सचेंजद्वारे व्यापाराच्या विविध विभागांमध्ये केले जाईलः

१२.११ **अंशदान किंवा ठेवीचे वाटप**

सेटलमेंट गॅरंटी फंडासाठी प्रत्येक समाशोधन सदस्याचे अंशदान आणि ठेवी एक्सचेंजद्वारे व्यापाराच्या **विविध विभागांमध्ये वाटणी केली जाईल , ज्या एक्सचेंजद्वारे निर्देशित केल्या जातील आणि ज्यामध्ये सदस्य अशा प्रमाणात जे एक्सचेंज वेळोवेळी ठरवेल, त्यात सहभागी होऊ शकतात.** व्यापाराच्या विशिष्ट विभागाला वाटप केलेल्या निधीचा वापर करण्याचे अधिकार एक्सचेंज नुकसान किंवा दायित्वे समतोल साधण्यासाठी राखून ठेवेल जे एक्सचेंज त्या विभागासाठी किंवा इतर कोणत्याही विभागासाठीच्या कामकाजाच्या अनुषंगाने त्याच्या विवेकबुद्धीनुसार ठरवू शकेल.

उपविधी १२.१२ मध्ये असे म्हटले आहे की समाशोधन सदस्याला कपात केल्यानंतर त्याच्या ठेवीची परतफेड केली जाईलः

**१२.१२ समाशोधन सदस्याला त्याचे सदस्यत्व संपुष्टात आल्यावर केलेली परतफेड**

१२.१२.१ सदस्याला सेटलमेंट गॅरंटी फंडात त्याने केलेल्या ठेवीच्या वास्तविक रकमेची, जर काही असेल तर, परतफेड करण्याचा अधिकार असेल, जर ती प्रवेश शुल्काचा भाग नसेल तर,

ए. सदस्य कोणत्याही कारणास्तव एक्सचेंज सदस्य म्हणून संपुष्टात आल्यास,

बी. सदस्य एक्सचेंज सदस्य म्हणून संपुष्टात आल्यास त्यावेळी प्रलंबित असलेले सर्व व्यवहार, ज्यामुळे सेटलमेंट गॅरंटी फंडावर शुल्क आकारले जाऊ शकते, ते बंद केले गेले आहेत आणि निकाली काढले गेले आहेत.

सी. एक्सचेंज सदस्य असताना ज्या एक्सचेंजसाठी सदस्य जबाबदार होता, त्या एक्सचेंजसाठीच्या सर्व जबाबदाऱ्या पूर्ण झाल्या आहेत किंवा संबंधित प्राधिकरणाच्या विवेकबुद्धीनुसार, एक्सचेंजद्वारे सदस्याच्या वास्तविक ठेवीतून वजा करण्यात आल्या आहेत; परंतु, सदस्याने संबंधित प्राधिकरणाला आवश्यक वाटेल असे क्षतिपूरित किंवा हमी एक्सचेंजला दिलेली आहे किंवा समाशोधन सदस्य जो सदस्य राहिला नव्हता त्याच्या व्यवहारांसाठी आणि जबाबदाऱ्यांसाठी दुसऱ्या समाशोधन सदस्याची जबाबदारी बदलण्यात आली आहे.

डी. संबंधित प्राधिकरणाने त्याच्या विवेकबुद्धीनुसार ठरवलेली योग्य रक्कम, त्याच्या मागील व्यवहारांमुळे उद्भवणारे कोणतेही नुकसान/दायित्व/दायित्व सांभाळण्यासाठी बाजूला ठेवली आहे आणि

ई. संबंधित प्राधिकरणाने आपल्या विवेकबुद्धीनुसार ठरवलेली योग्य रक्कम, एक्सचेंजद्वारे अशा इतर जबाबदाऱ्यांसाठी बाजूला ठेवली गेली आहे, जी एक्सचेंजला अस्तित्वात असल्याचे किंवा भविष्यात उद्भवेल असे एक्सचेंजला वाटू शकते.

१२.१२.२ संबंधित प्राधिकरण ठेवीची परतफेड करण्याची पद्धत, रक्कम आणि ज्या कालावधीत ती दिली जाऊ शकते यासह निकष निर्दिष्ट करू शकते. परतफेडीची रक्कम, कोणत्याही वेळी, प्रारंभिक ठेवीसह अशा समाशोधन सदस्याने वेळोवेळी देय असलेली आवश्यक देय रक्कम किंवा शुल्क वजा केल्यानंतर, समाशोधन सदस्याच्या कर्जासाठी उपलब्ध असलेल्या वास्तविक ठेवीपेक्षा जास्त होणार नाही.

**सी. ३ 'ठेव' आणि 'वित्तीय संस्था' यांची व्याख्याः एम. पी. आय. डी. (MPID) अधिनियमाच्या कलम २ (सी) आणि २ (डी) चे निर्वचन**.

३०. एम. पी. आय. डी. अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत उत्तरवादीच्या मालमत्तांची जप्ती करणारी अधिसूचना जारी करण्यात आली होती. कलम ४ मध्ये केवळ

त्या परिस्थितींचा समावेश आहे जेथे 'वित्तीय संस्था ' हि एक कसूर करणारी संस्था आहे. कलम ४ खाली पुनरुत्पादित केले आहेः

४. (१) त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात काहीही अंतर्भूत असले करण्यात तरी,-

(i) ठेवीदारांकडून तक्रारी प्राप्त झाल्यावर किंवा अन्यथा शासनाची अशी खात्री पटली केल्यास मालमत्ता असेल की, कोणत्याही वित्तीय संस्थेने, -

(ए) **मुदत संपल्यानंतर किंवा ठेवीदारांनी मागणी केल्यावर ठेव परत करण्यात, किंवा**

**(बी) व्याज किंवा आश्वासन दिलेला इतर लाभ देण्यात; किंवा**

**(सी) अशा ठेवीच्या बदल्यात देण्याचे अभिवचन दिलेली सेवा पुरविण्यात कसूर करीत आहे तर त्या बाबतीत किंवा**

(ii) कोणतीही वित्तीय संस्था ठेवीदारांची फसवणूक करण्याच्या इराद्याने त्यांच्या हितसंबंधास हानिकारक ठरेल अशा रीतीने बुद्धिपुरस्सरपणे काम करीत आहे असे शासनाला सकारण वाटत असेल; तर त्या बाबतीत

[...]

**(भर दिला जातो)**

३१. कलम २ (डी) च्या अर्थानुसार एन. एस. ई. एल.(NSEL ) ही 'वित्तीय संस्था ' आहे की नाही हा प्राथमिक मुद्दा आहे. कलम २ (डी) खालीलप्रमाणे आहेः

(डी) “ वित्तीय संस्था " याचा अर्थ, कोणतीही योजना किंवा व्यवस्था या अन्वये किंवा कोणत्याही अन्य रीतीने, **ठेवी स्वीकारणारी** कोणतीही व्यक्ती, असा आहे, परंतु त्यात राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या मालकीच्या किंवा त्याचे नियंत्रण असलेल्या महामंडळाचा किंवा सहकारी संस्थेचा किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम,१९४९ याच्या कलम ५, खंड (सी) अन्वये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेल्या बँक व्यवसाय कंपनीचा समावेश होत नाही;

वित्तीय संस्थेची व्याख्या 'ठेव' स्वीकारणारी कोणतीही व्यक्ती अशी केली जाते. या व्याख्येत (ए ) राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या मालकीच्या किंवा त्याचे नियंत्रण

असलेल्या महामंडळाचा किंवा सहकारी संस्थेचा आणि (बी ) बँक व्यवसाय विनियमन अधिनियम,१९४९ याच्या कलम ५, खंड (सी) अन्वये असलेल्या बँक व्यवसाय कंपनीचा समावेश होत नाही. एन. एस. ई. एल. (NSEL ) कोणत्याही अपवादांतर्गत येत नसल्यामुळे, जर ती 'ठेवी स्वीकारणारी व्यक्ती' असेल तर अधिनियमाच्या उद्देशाने ती 'वित्तीय संस्था' असेल. सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम १८९७ च्या कलम ३ (४२) मध्ये निगमित आणि अनिगमित अशा दोन्ही कंपन्यांचा समावेश करण्यासाठी 'व्यक्ती' ची सर्वसमावेशक व्याख्या दिली आहे. [25]**2525**

> "'व्यक्ती' यात, कोणतीही कंपनी अधिसंघ किंवा इसमांचा समूह - मग तो निगमित असो वा नसो - याचा समावेश असेल."

एम. पी. आय. डी. (MPID) अधिनियमाच्या कलम २ (सी) मध्ये शब्दप्रयोग 'ठेव' याची व्याख्या खालील अटींमध्ये केली आहेः

> **"**(सी) " ठेव " या शब्दप्रयोगामध्ये कोणत्याही वित्तीय संस्थने, व्याज, लाभांश, फायदा यांच्या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य स्वरूपातील कोणत्याही लाभासह किंवा त्याशिवाय एका विनिर्दिष्ट मुदतीनंतर किंवा अन्यथा, रोख रकमेच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात किंवा एखाद्या विनिर्दिष्ट सेवेच्या स्वरूपात परत करण्यात यावयाचा घेतलेला कोणताही पैसा किंवा स्वीकारलेली कोणतीही मौल्यवान वस्तु यांचा समावेश होतो आणि त्यांचा नेहमीच तसा समावेश असल्याचे मानण्यात येईल; परंतु, यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश नसेल: ---
>
> (i) भारतीय प्रतिभूती आणि विनियम मंडळ अधिनियम, १९९२ या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या भारतीय प्रतिभूती आणि विनियम मंडळाने (सेबी) घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे आणि केलेले विनियम यांच्या कक्षेत येणाऱ्या भाग-भांडवलाद्वारे किंवा ऋणपत्र, रोखा किंवा कोणताही अन्य संलेख याद्वारे उभारलेली रक्कम;
>
> (ii) एखाद्या भागीदारी संस्थेच्या भागीदारांनी भांडवल म्हणून दिलेल्या रकमा;

---

25 25 न्यू हॉरीझॉन शुगर मिल्स लिमिटेड -विरुद्ध- गव्हर्नमेंट ऑफ पाँडिचेरी , (२९१२) १० एस. सी. सी. ५७५ (परिच्छेद ५८)

(iii) अनुसूचित बँक किंवा सहकारी बँक किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम ५, खंड (सी) यामध्ये व्याख्या केलेली कोणतीही अन्य बँक व्यवसाय कंपनी यांच्याकडून प्राप्त झालेल्या रकमा;

(iv)(ए) भारतीय औद्योगिक विकास बँक,

( बी) राज्य वित्तीय महामंडळ,

(सी) भारतीय औद्योगिक विकास बँक अधिनियम, १ ९ ६४ याच्या कलम ६ क मध्ये १ ९ ६४ किंवा त्या अन्वये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही वित्तीय संस्था; किंवा चा १८.

(डी) या बाबतीत शासन विनिर्दिष्ट करील अशी अन्य कोणतीही संस्था, यांच्याकडून प्राप्त झालेली कोणतीही रक्कम;

(v) सध्याच्या सर्वसाधारण ओघात-

(ए) प्रतिभूती ठेव,

(बी) डिलरशिप ठेव.

(सी) इसाऱ्याची रक्कम,

(डी) माल किंवा सेवा यांच्या नोंदवण्यात आलेल्या मागणीसंबंधात · आगाऊ दिलेली रक्कम, या स्वरूपात प्राप्त झालेल्या रकमा;

(vi) राज्यात त्या वेळी अंमलात असलेल्या सावकारी व्यवसायाशी संबंधित एखाद्या? अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आलेली एखादी व्यक्ती किंवा निगम निकाय नसलेली एखादी व्यवसाय संस्था किंवा व्यक्तींचा संघ यांच्याकडून प्राप्त झालेली कोणतीही रक्कम; आणि

(vii) चिट-फंडाच्या बाबतीत वर्गणीच्या मार्गाने प्राप्त झालेली कोणतीही रक्कम.

स्पष्टीकरण एक. -- " चिट फंड " या शब्दप्रयोगाला, चिट फंड अधिनियम, १ ९ ८२ याच्या कलम २, खंड (बी) मध्ये नेमून दिलेला अर्थ असेल;

स्पष्टीकरण दोन.--एखाद्या मालमत्तेच्या (जंगम किंवा स्थावर) विक्रीवर, विक्रेत्याने खरेदीदाराला दिलेली पतउधारी (क्रेडिट), ही या खंडाच्या प्रयोजनार्थ ठेव म्हणून मानण्यात येणार नाही;

'ठेव' या संज्ञेच्या वैधानिक व्याख्येमध्ये खालील घटकांचा समावेश आहेः

(i) वित्तीय संस्थेने घेतलेला कोणताही पैसा किंवा स्वीकारलेली कोणतीही मौल्यवान वस्तु;

(ii) अशी स्वीकृती निश्चित कालावधीनंतर किंवा अन्यथा परत करणे आवश्यक असलेल्या पैशावर किंवा वस्तुच्या अधीन असली पाहिजे; आणि

(iii) पैसे किंवा वस्तूची परतफेड रोख, वस्तूच्या किंवा विशिष्ट सेवेच्या स्वरूपात, व्याज, बोनस, नफा किंवा इतर कोणत्याही स्वरूपात कोणत्याही लाभासह किंवा त्याशिवाय असू शकते.

व्याख्येच्या या घटकांनंतर खंड (i) ते (vii) मध्ये विचारात घेतलेल्या विशिष्ट अपवादांचा समावेश आहे. अपवादांच्या खंड (१) मध्ये अशी रक्कम आहे जी भारतीय प्रतिभूती आणि विनियम मंडळाने (सेबी) घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे आणि केलेले विनियम यांच्या कक्षेत येणाऱ्या भाग भांडवलाद्वारे किंवा ऋणपत्र, रोखा किंवा कोणताही अन्य संलेख ह्याद्वारे उभारली जाते. खंड (v) मध्ये असे म्हटले आहे की प्रतिभूति ठेव, डिलरशिप ठेव, इसाऱ्याची रक्कम किंवा वस्तू किंवा सेवांच्या नोंदविण्यात आलेल्या मागणीसंबंधात आगाऊ दिलेली रक्कम, ह्या स्वरूपात प्राप्त झालेल्या रकमा वगळल्या जातील. कलम (i) ते (vii) मधील अपवर्जन सूचित करतात की जे व्यवहार अन्यथा व्याख्येच्या व्यापक व्याप्तीमध्ये येतात ते वगळले जातात.

३२. विधिमंडळ एखाद्या शब्दाचा स्वाभाविक अर्थ मर्यादित करून किंवा त्याचा विस्तार करून कृत्रिमरित्या त्याची व्याख्या करू शकतो. जेव्हा विधिमंडळ 'याचा अर्थ' या वाक्यांशाचा वापर करते, तेव्हा व्याख्या परिपूर्ण असण्याचा हेतू असतो. **इंद्र सर्मा -विरुद्ध- व्ही. के. व्ही. सर्मा**[26]**2626**, या प्रकरणात या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २००५ च्या कलम २ (एफ) मधील 'कौटुंबिक नातेसंबंध' या शब्दप्रयोगाची व्याख्या निर्बंधक आहे कारण ती 'याचा अर्थ' या शब्दाच्या वापराद्वारे परिभाषित केली गेली आहे. दुसरीकडे, न्यायालयाने एक सुसंगत दृष्टिकोन घेतला आहे की जिथे एखाद्या शब्दाची व्याख्या सर्वसमावेशक आहे, तिथे 'समाविष्ट' या शब्दप्रयोगाचा स्वीकार करून मांडलेली व्याख्या प्रथमदर्शनी व्यापक

---

26 26(२०१३) १५ एस. सी. सी. ७५५

आहे.[27]2727 'ठेव' याच्या व्याख्येत "यांचा समावेश होतो आणि त्यांचा नेहमीच तसा समावेश असल्याचे मानण्यात येईल" या वाक्यांशाचा वापर केला आहे. याचा अर्थ एक विधिकल्पित तयार करणे आहे ज्याद्वारे शब्दप्रयोगाच्या वास्तविक अर्थाने समाविष्ट नसलेल्या कृतींचा समावेश करण्याचा हेतू आहे. 'ठेव' या शब्दाची व्याख्या करताना 'याचा समावेश होतो ' आणि 'नेहमीच तसा समावेश असल्याचे मानण्यात येईल' याचा एकत्रित वापर हा शब्द सर्वसमावेशक बनवतो आणि निर्बंधक नाही.

३३. 'ठेव' हा शब्दप्रयोग त्याच्या विस्तारामध्ये आणि व्याप्तीमध्ये ठळकपणे विस्तृत आहे कारण त्यात केवळ घेतलेला कोणताही पैसा नाहीतर कोणत्याही योजना किंवा व्यवस्थेअंतर्गत वित्तीय संस्थेद्वारे कोणत्याही मौल्यवान वस्तुची स्वीकृती देखील समाविष्ट आहे. स्वारस्याची बाब म्हणून, आम्ही या टप्प्यावर लक्षात घेऊ शकतो की 'कोणताही ' हा शब्दप्रयोग 'ठेव' या शब्दप्रयोगाच्या व्याख्येच्या मुख्य भागात पाच प्रसंगी वापरला जातो, म्हणजे;

(i ) घेतलेला कोणताही पैसा ;

(ii ) कोणतीही मौल्यवान वस्तू;

(iii ) कोणत्याही वित्तीय संस्थेने ;

(iv) कोणत्याही लाभासह किंवा त्याशिवाय; आणि

(v) कोणत्याही अन्य स्वरूपातील

३४. त्याचप्रमाणे, वित्तीय संस्थेची व्याख्या ठेवींच्या स्वीकृतीचा संदर्भ देतेः

(i) कोणतीही योजना किंवा व्यवस्था या अन्वये; किंवा

(ii) कोणत्याही अन्य रीतीने.

३५. वरील दोन्ही शब्दप्रयोग परिभाषित करताना संविधीने 'कोणताही' या शब्दप्रयोगाचा वारंवार वापर करणे हे कायद्याच्या नियामक तरतुदींचे जाळे व्यापक आणि सर्वसमावेशक पद्धतीने टाकण्याच्या विधिमंडळाच्या हेतूचे स्पष्ट प्रतिबिंब आहे. या विषयात नियमन करणाऱ्या इतर अनेक राज्य कायद्यांप्रमाणे, एम. पी. आय. डी. अधिनियमाच्या कलम २ चे खंड (सी) केवळ पैसा स्वीकृतीच नव्हे तर कोणत्याही मौल्यवान वस्तुची

---

27 27 कर्नाटक पॉवर ट्रान्समिशन कॉर्पोरेशन -विरुद्ध- अशोक आयर्न वर्क प्रायव्हेट लिमिटेड, (२००९) ३ एस. सी. सी. २४०; रमणलाल भाईलाल पटेल - विरुद्ध- स्टेट ऑफ गुजरात , (२००८) ५ एस. सी. सी. ४४९.

स्वीकृती  हे ठेव या अर्थाने समजून घेते. उदाहरणार्थ, याउलट, तामिळनाडू अधिनियमाच्या कलम २ (२) मध्ये 'ठेव' ची व्याख्या केवळ पैसा संदर्भात केली आहे, वस्तुच्या संदर्भात नाही. कलम २ (२) खालीलप्रमाणे आहेः

(२) "ठेव" म्हणजे एकतर ठोक रकमेत किंवा  हप्त्यांमध्ये  वित्तीय संस्थेकडे निश्चित कालावधीसाठी,  व्याजासाठी  किंवा  कोणत्याही  प्रकारच्या  परताव्यासाठी  किंवा कोणत्याही सेवेसाठी  पैसे जमा करणे;

त्याचप्रमाणे, ओरिसा[28]2828 , केरळ[29]2929, हिमाचल प्रदेश[30]3030, गोवा [31]3131, तेलंगणा[32]3232, आंध्र प्रदेश [33]3333 आणि सिक्कीम[34] 34 34 मधील ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करणारे कायदे केवळ 'ठेव' या  शब्दाची  व्याख्या केवळ पैशाच्या बाबतीत  करतात आणि एखाद्या वस्तूच्या स्वीकृतीसाठी नाही .

३६.  कलम २ (सी) च्या दुसऱ्या घटकानुसार, पैसे  किंवा वस्तु परत करणे आवश्यक आहे. तथापि, असा परतावा रोख किंवा वस्तुच्या स्वरूपात असणे आवश्यक नाही, तर सेवेच्या स्वरूपात असणे आवश्यक आहे, व्याजासारख्या कोणत्याही लाभासह किंवा त्याशिवाय.  हे लक्षात घेणे आवश्यक आहे की कलम २ (सी) च्या खंड  (व्ही) मध्ये असे म्हटले आहे की  पैसे किंवा वस्तूची  ठेव म्हणून प्रतिभूती ठेव , डिलरशिप  ठेव, आगाऊ रक्कम 'ठेव' या शब्दाच्या व्याख्येतून वगळल्या आहेत. उदाहरणार्थ, जर एखाद्या वित्तीय आस्थापनेच्या सदस्याने रु. २५,०००/- जमा केले आणि सदस्यत्वाची समाप्ती झाल्यावर वजा करून ते पैसा परत केले, ठेव ही  प्रतिभूती ठेव आहे की कलम २ (सी) अंतर्गत समाविष्ट असलेल्या स्वरूपाची आहे हा मुद्दा वित्तीय आस्थापनेच्या कामकाजाच्या आणि कामकाजाच्या संरचनेच्या संदर्भात निश्चित केला पाहिजे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की या व्याख्येत असेही म्हटले आहे की परतावा व्याजासह किंवा व्याजाविना किंवा कोणत्याही

---

28 28 ओडिसा ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम,२०११

29 29 केरला ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम,२०१३

30 30 हिमाचल प्रदेश ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम,१९९९

31 31 गोवा ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम,१९९९

32 32 तेलंगणा ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम,१९९९

33 33 आंध्र प्रदेश ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम,१९९९

34 34 सिक्कीम ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम,२०००

लाभासह किंवा त्याविना असू शकतो. त्यामुळे, एनएसईएल(NSEL)ने आपल्या निवेदनात माध्यम  व्यापारावर १६% टक्के परतावा मिळण्याची हमी माध्यमाद्वारे दिली होती की नाही, यावर दोन्ही बाजूंनी सादर केलेले निवेदन हे, जर एनएसईएल(NSEL) ने ठेवी स्वीकारल्या असतील तर, ते  निश्चित करण्यासाठी अनावश्यक आहे.

३७. संबंधित उपउपविधीचा संदर्भ दिल्यानंतर, एमपीआयडी(MPID) कायद्याच्या कलम २(सी) नुसार एनएसईएल(NSEL)ला 'ठेव' मिळाल्या आहेत की नाही हे आम्ही ठरवू. उपविधी विशद करतात कि एनएसईएल(NSEL) व्यापारी सदस्यांकडून पैसे आणि वस्तू दोन्ही प्राप्त करते. एनएसईएल (NSEL) द्वारे ही मिळकत 'ठेव' म्हणून गणल्या जाऊ शकते कि नाही हे ठरविण्यासाठी, 'परताव्याची' चाचणी घेणे आवश्यक आहे. चाचणी अशी आहे की परतावा रोख, वस्तू किंवा सेवेच्या स्वरूपात असेल. परतावा हा व्याज, अधिलाभांश किंवा नफा या स्वरूपातील फायदयासहीत असावा असे नाही. म्हणून जर आर्थिक आस्थपना कोणत्याही वाढीशिवाय ठेव परत करण्यास बांधील असेल जर ती ठेव अपवादात्मक नसेल तर ती एमपीआयडी (MPID) कायद्याच्या कलम २(सी) च्या अधिकारकक्षेत येते. आमच्या प्रकरणातील प्रासंगिकतेचा अपवाद हा खंड (v) आहे ज्यामध्ये असे नमूद केले आहे की जर सामान्य व्यवसायाच्या मार्गाने म्हणजे (ए) प्रतिभूती ठेव (बी) डीलरशिप ठेव (सी)इसाऱ्याची रक्कम आणि (डी) माल किंवा सेवा या कामासाठी आगाऊ प्राप्त झालेली रक्कम'ठेव' या संज्ञेच्या कक्षेतून वगळण्यात येईल.

**सी.३.१ सेटलमेंट गॅरंटी फंडः एमपीआयडी (MPID)अधिनियमाच्या  कलम २(सी) अंतर्गत ठेव.**

३८.व्यापारी सदस्य एनएसईएल(NSEL)ला मार्जिन ठेव देतात आणि एनएसईएल (NSEL)सेटलमेंट गॅरंटी फंड चालू ठेवतात. विनियमन ४.१२ मध्ये असे म्हटले आहे की केवळ ज्या सदस्यांनी मार्जिन ठेव आणि प्रतिभूति ठेव भरली आहे त्यांचे व्यवहार वैध मानले जातील. त्यामुळे एनएसईएल(NSEL) च्या प्लॅटफॉर्म द्वारे व्यापार करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला मार्जिन ठेव आणि प्रतिभूति ठेव भरणे'अनिवार्य' आहे. विनियमन ४.१२ एसजीएफ (SGF)ला 'प्रतिभूति ठेव' म्हणून संदर्भित करते. त्याचप्रमाणे, उपविधी १२.२.१ मध्ये असे नमूद केले आहे की प्रत्येक सदस्याने 'किमान प्रतिभूति ठेव' भरावी. तथापि,एसजीएफ (SGF)ला केवळ 'प्रतिभूति ठेव' म्हणून संबोधले जात असल्याने, अपवाद

आपोआप लागू होणार नाही. 'प्रतिभूति ठेव' या वाक्यांशाचा अर्थ आजूबाजूच्या वाक्यांशांमधून घेतो. खंड (v) ते उप-कलम २ (सी) मधून प्रतिभूती ठेव, डिलरशिप ठेव, इसाराऱ्याची रक्कम, माल आणि सेवेच्या कामासाठी दिलेली रक्कम ठेव वाक्याच्या कक्षेतून वगळते. उप-कलम २(सी)(व्ही) मध्ये वापरल्या गेलेल्या संकल्पना दोन श्रेणींमध्ये मोडल्या आहेतः (i) खरेदीसाठी इसारा दर्शविण्यासाठी दिलेली लाक्षणिक रक्कम (इसाराचे पैसे आणि आगाऊ पैसे) आणि ii) पक्षाद्वारे कसूर केल्यास निकडीच्या परिस्थितीची पूर्तता करण्यासाठी आवश्यक लागणारे भरणा (डीलरशिप ठेव आणि प्रतिभूति ठेव).

३९. ब्लॅक्स लॉ शब्दकोश[35]3535 मध्ये प्रतिभूती ठेवीची व्याख्या अशी केली आहे की, "भाडेकरूने घरमालकाकडे ठेव म्हणून भाडेपट्टीच्या अटींच्या पूर्ण आणि विश्वासू कामगिरीसाठी जमा केलेला पैसा, ज्यात परिसराच्या नुकसानाचा समावेश आहे. भाडेकरूने मालमत्तेचे नुकसान किंवा क्षति केली नसेल किंवा वहिवाटीच्या अटींचा किंवा भाडेदाराला नियंत्रित करणाऱ्या कायद्यांचा भंग केला नसेल तर ते परत करण्यायोग्य आहे. काही राज्यांमध्ये घरमालकाने भाड्याच्या मालमत्तेच्या आवश्यक दुरुस्तीसाठी सुरक्षा ठेव ठेवण्याची देखील गरज भासते. "अशाच प्रकारचा एक वाक्यांश, 'ग्राहक सुरक्षा निधी' हा अनेक स्टेट बार असोसिएशन सदस्य-न्यायप्रतिनिधी च्या अप्रामाणिक वर्तनामुळे व्यक्तींना झालेल्या नुकसानाची भरपाई करण्यासाठी स्थापन केलेली निधी म्हणून परिभाषित केली आहे. या दोन्ही वाक्यांशांचे अर्थ प्रतिभूति ठेव च्या आवश्यक घटकांबद्दल सुचवतात, जे खालील प्रमाणे आहेतः

(i) कराराची विश्वासू कामगिरी सुनिश्चित करण्यासाठी आगाऊ रक्कम;

(ii) कामगिरीसाठी आवश्यक 'कार्ये' पूर्ण करण्यासाठी देय रक्कम; आणि

(iii ) परतावाचा हक्क हानी, क्षति आणि कसूर प्रसंगासाठी आहे किंवा नाही यावर अवलंबून आहे .

४०. उपविधीच्या १२ व्या अध्यायात एसजीएफ (SGF) ची वैशिष्ट्ये दिली आहेतः

(i) एसजीएफ (SGF)चा वापर यासाठी केला जातोः

(ए ) त्याची निर्मिती आणि देखभाल यासाठी होणारा खर्च पुरविणे;

---

35 35 ब्रायन ए गार्नर ब्लॅक 'स लॉ डिशनरी (११ इडी. थॉम्सन रेटर्स).

(बी) जबाबदाऱ्या पार पाडल्यामुळे निर्माण झालेल्या कार्यक्षमतेची पूर्तता करण्यासाठी निधीचा तात्पुरता वापर करणे;

(सी) विमा संरक्षणावरील विम्याचा हफ्ता भरणे;

(डी) 'क्लिअरिंग अँड सेटलमेंट ऑपरेशन्स'मुळे उद्भवलेल्या देवाणघेवाणीचे नुकसान किंवा दायित्वासाठी भरणा ;

(ई) सदस्याला शिल्लक ठेवीची परतफेड;

(एफ) सदस्य त्याच्या सेटलमेंटच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्यास सदस्याच्या जबाबदाऱ्यांसाठी भरणा; आणि

(जी) कसूरदार म्हणून घोषित झाल्यावर सदस्याचे दायित्व फेडण्यासाठी;

(ii) सदस्यांचे योगदान व्यापाराच्या विविध विभागांमध्ये विभागले जाते, ज्यामध्ये ते सहभागी होऊ शकतात. देवाणघेवाणीच्या नुकसानीशी किंवा दायित्वांशी जुळण्यासाठी व्यापाराच्या विशिष्ट विभागाला वाटप केलेला निधी वापरण्याचा अधिकारही देवाणघेवाणीकडे राखून ठेवला आहे; आणि

(iii ) सेटलमेंट फंड मंजूर प्रतिभूती किंवा गुंतवणुकीच्या इतर साधनांमध्ये गुंतवला जाऊ शकतो.

४१. एसजीएफ (SGF)ची वैशिष्ट्ये सूचित करतात की निधीचा वापर त्या खर्चांसाठी केला जातो, जे नियमित सुरक्षा निधीतून केलेल्या वापराच्या बाहेर आहेत. घरमालक आणि भाडेकरू यांच्यातील सुरक्षा प्रतिभूति ठेव, जेथे निधीचा वापर घरमालकाच्या 'आवश्यक जबाबदाऱ्या' पूर्ण करण्यासाठी केला जातो, जसे की दुरुस्तीचे काम आणि भाडेकरूकडे थकबाकी असताना ज्या निधीची कपात केली जाते, यापेक्षा भिन्न एनएसईएल(NSEL) ठेवीचा वापर व्यापारी सदस्याच्या (खरेदीदार) दुसऱ्या व्यापारी सदस्याच्या (विक्रेता) देय जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी करते, कारण एनएसईएल(NSEL) हा व्यवहारांचा प्रति पक्ष आहे. तथापि, एनएसईएल (NSEL)या निधीचा वापर प्रति पक्ष म्हणून त्याच्या भूमिकेच्या पलीकडे कार्ये पूर्ण करण्यासाठी करते. उदाहरणार्थ, या निधीचा वापर एनएसईएल (NSEL)ला झालेल्या सेटलमेंट कार्यामधील तोटा भरून काढण्यासाठी केला जातो, रोख्यांमध्ये गुंतवणूक केली जाते आणि या निधीचे वाटप व्यापाराच्या विविध विभागांमध्ये केले जाते, जेथे निधीचा वापर त्या विभागातील काही तोटा असल्यास तो भरून

काढण्यासाठी देखील केला जातो. त्यामुळे, एसजीएफ (SGF)ची ही तीन वैशिष्ट्ये सूचित करतात की एसजीएफ (SGF) ला 'प्रतिभूती ठेव' म्हणून संबोधले जात असले तरी त्याची वैशिष्ट्ये प्रतिभूती ठेव दर्शवत नाहीत. एनएसईएल(NSEL) ला एसजीएफ (SGF) च्या स्वरूपात 'पैसा' मिळतो जो पैसा आणि सेवेच्या स्वरूपात परत केला जातो आणि अपवादांच्या कक्षेत येत नाहीत, त्यामुळे ते कायद्याच्या कलम २(सी) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे 'ठेव' या अभिव्यक्तीमध्ये येते.

**सी.३.२ वस्तूंची प्राप्ती: अधिनियमाच्या कलम २ (सी) अंतर्गत ठेव.**

४२. एनएसईएल (NSEL) च्या प्लॅटफॉर्म वर व्यापार करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने वस्तू एनएसईएल (NSEL) च्या मान्यताप्रापत वखारात ठेवणे आवश्यक आहे. त्यानंतर एनएसईएल (NSEL) व्यापाऱ्याला वखराची पावती देईल. जेव्हा खरेदीदाराचा प्रस्ताव आणि विक्रेत्याचा प्रस्ताव जुळला जाईल, तेव्हा एनएसईएल (NSEL) खरेदीदार सदस्याच्या देय रकमेतून दायित्वांमध्ये डेबिट (देय) करेल आणि ती एनएसईएल(NSEL)च्या देवाणघेवाण सेटलमेंट खात्यात जमा केली जाईल. विक्रेत्याच्या विशिष्ट वस्तू आवश्यक प्रमाणात उपलब्ध असल्यास ऑपेरेशन्स विभाग डिलिव्हरी विभागाकडे खात्री करेल. अशी खात्री केल्या नंतर, ऑपेरेशन्स विभाग विक्री दलालाच्या नियुक्त बँक खात्यात खरेदी किंमत जाहीर करेल. त्याच वेळी, खरेदीदाराच्या दलालाला किंवा खरेदीदाराला 'वितरण वाटप अहवाल' जारी केला जाईल. एकदा VAT चलन भरल्यानंतर, एनएसईएल(NSEL) खरेदीदाराला ठराविक वखारातून वितरण घेण्यास अधिकृत करणारी डिलिव्हरी नोट जारी करेल किंवा खरेदीदाराने निवडल्यास, तो वस्तुचा रचनात्मक ताबा घेऊ शकतो. 'ठेव' या शब्दाच्या व्याख्येत असे काहीही नाही की वस्तूची स्वीकृती वस्तूच्या मालकीच्या हस्तांतरणासह असावी. जरी वित्तीय आस्थापनेच्या 'ताब्यात' वस्तू असली, तरीही ती 'वस्तू स्वीकारणे' या वाक्यांशाच्या कक्षेत येईल. वस्तु ताबा स्वीकारल्यावर, एनएसईएल (NSEL) ला वस्तू कोणत्याही हानीशिवाय सुरक्षित ठेवण्याचे दायित्व अशा विविध सेवा पुरवाव्या लागतात. यावतिरिक्त कराराची जुळवाजुळव करतांना ऑपेरेशन्स विभाग आणि डिलिव्हरी विभाग यांच्यात समन्वय साधावा लागेल. त्याचप्रमाणे, खरेदीदाराला डिलिव्हरी नोट पाठवल्यानंतर, वस्तू एकतर खरेदीदाराकडे पाठवली जाते किंवा खरेदीदार वस्तूच्या रचनात्मक ताब्यात ठेवला जातो. वस्तू एनएसईएल(NSEL)च्या मान्यताप्राप्त वखराकडे

आहे याचा पुरावा देणारा दस्तऐवज म्हणून उपविधी २.९६ मध्ये 'वेअरहाऊस पावती' या वाक्यांशाची व्याख्या करण्यात आली आहे. उपविधी ४.२० मधील कलम (बी ) मध्ये असे म्हटले आहे की जर थकबाकी व्यवहारांचा निपटारा डिलिव्हरी देऊन किंवा सोडवून केला गेला नसेल, तर व्यवसायाच्या देवाणघेवाण नियमांनुसार खरेदी करून किंवा विक्री करून त्याचा (वस्तु) लिलाव केला जाईल. उपविधी १०.११ मध्ये असे म्हटले आहे की वस्तू केवळ ठराविक वखारामध्ये पोहोचविल्या जातील आणि वितरित केल्या जातील. त्यामुळे एनएसईएल(NSEL) वस्तू मिळवण्याच्या बदल्यात अनेक 'सेवा' देते. वस्तूची प्राप्ती आणि वस्तू (जेव्हा सदस्यांना रचनात्मक ताब्यात ठेवले जाते) मान्यताप्राप्त गोदामांमध्ये ठेवणे हे कायद्याच्या कलम 2 (सी) अंतर्गत 'ठेव' आहे.

४३.उत्तरवादीच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की कलम २(सी) मध्ये उल्लेखलेल्या 'मौल्यवान वस्तु' या अभव्यक्तीमध्ये केवळ सोने आणि चांदीसारख्या मौल्यवान धातूंचा समावेश असेल. 'मौल्यवान वस्तु' ही अभिव्यक्ती कायद्याने परिभाषित केलेली नाही. अभिव्यक्तीमध्ये केवळ सोने आणि चांदीसारखे मौल्यवान धातू समाविष्ट केले पाहिजेत हे उत्तरवादीचे निवेदन स्वीकारण्यास कोणताही वैध आधार नाही. जर विधिमंडळाचा मौल्यवान वस्तु या अभिव्यक्तीची व्याख्या मर्यादित करण्याचा हेतू होता, तर ते अभिव्यक्तीला कृत्रिम अर्थ सूचित करणारे स्पष्टीकरण देऊ शकले असते. मात्र, विधिमंडळाने तसे करण्यास नकार दिला आहे. मौल्यवान वस्तु ही एक अशी वस्तु आहे जिचे महत्त्वपूर्ण मूल्य आहे. हे केवळ वस्तुच्या आंतरिक मूल्याचा संदर्भ देत नाही. एखादी वस्तु मौल्यवान आहे की नाही हे या कायद्याचा हितकारक उद्देश आणि ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करणे हा उद्देश लक्षात घेऊन ठरवावे लागेल. या संदर्भात कायद्याचा अर्थ आणि आशय प्रभावी होईल अशा उद्देशपूर्ण रचनेचा अवलंब करणे आवश्यक आहे. प्रतिबंधात्मक अर्थाने व्याख्या वाचण्याचा कोणताही प्रयत्न वैधानिक हेतूच्या विरोधात असेल. 'ठेव' ही अभिव्यक्ती तसेच 'वित्तीय आस्थापना' ही अभिव्यक्ती व्यापक आणि सर्वसमावेशक पद्धतीने परिभाषित करणे हा विधिमंडळाचा हेतू आहे. त्यामुळे 'मौल्यवान वस्तु' हा शब्द केवळ मौल्यवान धातूंपुरताच मर्यादित राहू शकत नाही. एनएसईएल(NSEL) ज्या कृषी वस्तुंचा व्यापार करते, त्या अभिव्यक्तीच्या कक्षेच्या आत येतील.

४४. जरी यापूर्वी असे आढळून  आले कि  एमपीआयडी(MPID) कायद्याच्या कलम २ (सी) च्या उद्देशांसाठी ठेवीवर व्याज किंवा खात्रीशीर लाभ असणे आवश्यक नाही, तरी, आम्हाला  एनएसईएल(NSEL) ने केलेल्या निवेदनाचा संदर्भ  घेणे अजूनही आवश्यक आहे. एनएसईएल(NSEL) ने आपल्या माहितीपत्रकांद्वारे व्यापार आणि गुंतवणुकीच्या उपलब्ध संधींविषयी निवेदन सादर केले आहेः

(ए) निगम  ग्राहक;

(बी)सांपत्तीक स्थिती उच्च असलेली व्यक्ती; आणि

(सी) किरकोळ गुंतवणूकदार.

४५. 'कंत्राटी वैशिष्ट्यांच्या' शीर्षकाखाली, खालील प्रतिनिधित्व केले गेले आहेः

| वस्तू | कालावधी | गुंतवणूक (लाख) | उत्पादन |
|---|---|---|---|
| एरंडेल बी | टी+३ आणि टी+३६ | ७.५ -९ लाख | १६% |
| एरंडेल तेल | टी+५ आणि टी+३० | ७-९ | १६% |
| कॉटन वॉश ऑइल | टी+२ आणि टी+२५ | १० | १६% |
| भात | टी+२ आणि टी+२५ | ३.५ -४.५ | १६% |
| पोलाद | टी+२ आणि टी+२५ | ४.५-५ | १६% |
| कच्ची लोकर | टी+२ आणि टी+२५ | ३.५-४ | १६% |
| लोकर टॉप | टी+२ आणि टी+२५ | १.८-२ | १६% |
| कच्चे'सोयाबीन तेल | टी+२ आणि टी+२५ | ३.३-३.५ | १६% |
| सोया डीओसी | टी+२ आणि टी+२५ | १.७-२.० | १६% |
| शुद्ध मोहरीचे तेल | टी+२ आणि टी+२५ | ६.५ | १६% |
| शुद्ध सोयाबीनचे तेल | टी+२ आणि टी+२५ | ६.५ | १६% |
| शुद्ध सूर्यफुल तेल | टी+२ आणि टी+२५ | ६.५ | १६% |
| आरबीडी पामोलिन तेल | टी+२ आणि टी+२५ | ६.५ | १६% |
| साखर | टी+२ आणि टी+२५ | ३.० | १६% |
| मका | टी+२ आणि टी+२५ | ३.० | १६% |

वरील प्रतिनिधित्व उल्लेख करते कि :-

(i) वस्तू ;

(ii) व्यापाराची कालावधी ;

(iii) गुंतवणूक; आणि

(iv) उत्पादन

उदाहरणार्थ, एरंडीच्या बियाण्यांच्या बाबतीत एनएसईएल (NSEL) ने खरेदी करार (टी+३) आणि विक्री करार (टी+३६) केला, ज्यामध्ये उत्पादन १६% असल्याचे नमूद केले आहे. शिवाय, एनएसईएल(NSEL)ने प्रतिनिधित्व केले कीः

**" संधी**

- व्यापारी व्यापार करू शकतात आणि त्यांचा परतावा बंद करू शकतात .
- व्यापाऱ्याला 'नियर सेटलमेंट कॉन्ट्रॅक्टमध्ये' खरेदी करावी लागते आणि एकाच वेळी 'फार सेटलमेंट कॉन्ट्रॅक्टमध्ये' विक्री करावी लागते.
- दोन्ही सेटलमेंटसाठी किंमत उपलब्ध.
- एक्सचेंज काउंटरपार्टी हमी जोखीम प्रदान करते.
- कोणतीही आधारभूत जोखीम नाही, भविष्यातील करारांशी संबंध नाही "

"व्यापार संधी" च्या वैशिष्ट्यांचे वर्णन करताना एनएसईएल (NSEL) ने सादर केले कीः

**"व्यापार संधीची वैशिष्ट्येः**

- टी+२ आणि टी+२५ करार व्यापाऱ्यांना अनन्य व्यापार संधी प्रदान करतात.
- व्यापारी टी+२ करार खरेदी करतो आणि त्याच वेळी टी+२५ करार विकतो.
- पे-इन दायित्व टी+२ वर आहे तर निधीचे पे-आउट टी+२५ वर असेल. संपूर्ण सेटलमेंट सायकल ३५-३७ दिवसाची आहे.
- दोन सेटलमेंट तारखांमधील किंमतीतील फरक म्हणजे जर वार्षिक प्रिमियम व्याज दर सुमारे १६% टक्के असेल.
- अशा व्यापारातून मिळणारे उत्पन्न व्यावसायिक उत्पन्न मानले जाते."

बँकेच्या नियत ठेव आणि एनएसईएल(NSEL) मधील व्यापार संधींशी गुंतवणुकीच्या संधींची तुलना करताना एनएसईएल (NSEL) ने असे सांगितलेः

**" तुलना**

- ३९० दिवसांसाठी बँक मुदत ठेव ९.२५% एनएसईएल व्यापार संधी १६%.
- बँक एफ. डी. चा किमान कालावधी ३९० दिवस; एनएसईएल (NSEL) व्यापार कालावधी ३५-५५ दिवस, करारावर अवलंबून.
- व्यापाऱ्यांकडे त्यांच्या सोयीनुसार त्यांची स्थिती बदलण्याचा पर्याय आहे ”

रिस्क मॅनेजमेन्ट या शीर्षकाखाली एनएसईएल(NSEL) ने खालील निवेदन सादर केले आहेः

**“ रिस्क मॅनेजमेन्ट**

- व्यापार संपार्श्विकाद्वारे स्टॉकच्या स्वरूपात समर्थित केले जातात .
- टी+२/टी+३ करारांमध्ये विक्रेत्याच्या खुल्या स्थितीवर १०-१५% चे रोख मार्जिन आकारले जाते.
- किंमतीत प्रतिकूल हालचाल झाल्यास, एक्सचेंज टी + २/टी + ३ करारांमध्ये विक्रेत्याकडून अतिरिक्त मार्जिन गोळा करते.
- एक्सचेंजने लिलाव/क्लोज आउटसाठी मार्गदर्शक तत्त्वे परिभाषित केली आहेत (परिपत्रकः ०२९/२००८)
- वेयरहाऊस मॅनेजमेण्ट मध्ये निवड, अधिस्वीकृती , क्वॅलिटी रेस्टिंग फ्युमिगेशन आणि विमा यांचा समावेश होतो.

वरील सादरीकरण असे सूचित करते की जोड करार एनएसईएल (NSEL) द्वारे एक अद्वितीय व्यापार संधी म्हणून तयार केले गेले होते, ज्या अंतर्गत व्यापारी, उदाहरणार्थ, टी+२ करार खरेदी करेल (टी+२ वर ‘पे इन’ च्या बंधनासह) आणि एकाच वेळी टी + २५ करार विकेल (टी+२५ वर निधीच्या ‘पे आऊट’ सह). सुमारे १६ टक्के वार्षिक परतावा देण्यासाठी दोन सेटलमेंट तारखांमधील किंमतीतील फरक दर्शविला गेला. एनएसईएल.(NSEL) ने स्पष्टपणे अभिवेदन केले की सर्व व्यवहार, माल आणि त्यांचे व्यवस्थापन उपक्रमांमध्ये निवड, मान्यता, गुणवत्ता चाचणी, धूम्र आणि विमा ह्यांचा समाविष्ट असलेल्या संपार्श्विकांचा आधारावर असतो . त्यामुळे, एनएसईएल(NSEL) ने असे म्हंटले की पैसे की आणि वस्तू मिळाल्यावर सदस्यांना 'खात्रीशीर परतावा' आणि 'सेवा' मिळेल. एनएसईएल(NSEL)ला ठेवी मिळत असल्या तरी ठेवींच्या बदल्यात दिलेल्या आश्वासनानुसार सेवा पुरवण्यात ते अपयशी ठरले आहे आणि मागणी नुसार ठेवी परत करण्यात ते अपयशी ठरले आहे. त्यामुळे

महाराष्ट्र राज्याने एमपीआयडी कायद्याच्या कलम  अंतर्गत जप्तीची अधिसूचना जारी करणे न्याय्य होते.

**सी.४  कट उघड करणे**

**सी.४.१ ग्रँट थॉर्नटन अहवाल**

४६. एफएमसी(FMC)ने एनएसईएल(NSEL)च्या पद्धती आणि नोंदींचे न्यायवैद्यक लेखापरीक्षण करण्यासाठी ग्रँट थॉर्नटन एल.एल. पी. ला नियुक्त केले. एनएसईएल(NSEL) ने वारंवार नियमांचे उल्लंघन केल्याची अनेक उदाहरणे अहवालात आढळलीः

(ए) एनएसईएल (NSEL) ने ज्या सदस्यांनी वारंवार कसूर केले होते त्यांना एनएसईएल (NSEL)एक्सचेन्ज नियमांनुसार व्यापार सुरू ठेवण्याची परवानगी दिली,ज्या सदस्याकडे आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी पुरेसे तारण  नाही, त्यांना पुढे व्यापार करण्याची परवानगी दिली जाणार नाही;

(बी) जे सदस्य कसूरदार होते किंवा ज्यांनी त्यांच्या मार्जिन मर्यादा संपविल्या होत्या, त्यांना मार्जिन आवश्यकते मधून सूट देण्यात आली होती;

(सी) वखारमध्ये वस्तूंची पुरेशी संपार्श्विक नव्हती आणि एनएसईएल(NSEL) ने कार्यासक्तीने काम केले नाही.

(डी) एक्स्चेंजचे उपविधी आणि नियम प्रभावी संचालन आणि व्यवस्थापनासाठी विविध समित्यांची स्थापना करणे अनिवार्य करतात मात्र, अशा दहापैकी नऊ समित्या स्थापन करण्यात मंडळ अपयशी ठरले. स्थापन केलेली कोणतीही समिती कधी बोलावली गेली होती की नाही हे दर्शविण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा नाही;

(ई) कसूरदार सदस्यांच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी क्लायंट मार्जिन डिपॉझिट आणि सेटलमेंट फंडचा वापर करण्यात आला. एनएसईएल (NSEL) ने सदस्यांनी केलेल्या ठेवींचा त्यांच्या स्वतःच्या व्यावसायिक हेतूंसाठी नियमितपणे वापर केला. उदाहरणार्थ, २८ मार्च २०१३ रोजी एनएसईएल(NSEL) च्या व्यावसायिक ओव्हरड्राफ्ट खात्यासाठी  सेटलमेंट फंडातून रु.२३६.५ कोटी काढण्यात आले.  जून २०१२ ते जून २०१३ या

कालावधीत क्लायंट सेटलमेंट फंड बॅलन्स मध्ये चालू तूट आहे. वित्तीय संस्थेने हा मुद्दा अनेक प्रसंगी उपस्थित केला होता.

(एफ) श्री. जिग्नेश शाह यांनी १० जुलै २०१३ रोजी एफएमए (FMA) कडे सादर केलेल्या सादरीकरणात असे म्हटले होते की एनएसईएल(NSEL) च्या मान्यताप्राप्त १२० वखरामध्ये रू. ६,०००/- कोटी च्या किमतीच्या वस्तू ठेवल्या होत्या. तथापि, दीर्घकालीन व्यापारासाठी वखराच्या उपक्रमांशी संबंधित कोणतेही दस्तऐवजीकरण असे दर्शवत नव्हते की करार स्टॉकद्वारे सुरक्षित नव्हते. सदस्यांचे तारण त्यांच्या ताब्यात नव्हते आणि एनएसईएल(NSEL) चे त्यावर कोणतेही नियंत्रण नव्हते.

(जी) जरी वेअरहाऊस डेव्हलपमेंट अँड रेग्युलेटरी अथॉरिटीने ने मे २०११ मध्ये एनएसईएल(NSEL) च्या वखारच्या नोंदणीसाठीचा अर्ज फेटाळला होता, तरीही संस्थेची वेबसाईट असे दर्शविते की वखार प्राधिकरणाकडे नोंदणीकृत आहेत.

(एच) जरी वखाराच्या पावत्या एखाद्या वस्तुला मान्यताप्राप्त वखारमध्ये ठेवल्याचा पुरावा देत असल्या तरी वस्तु जमा न करताच पावत्या जारी केल्या जात असत. एनएसईएल(NSEL) ने विक्रीचे व्यवहार करण्यापूर्वी वखारामध्ये वस्तु जमा करण्याचा आग्रह धरला नाही. एनएसईएल(NSEL) ने डिलिव्हरी एलोकेशन अहवाल जारी केला ज्यामध्ये प्रत्येक व्यवहार वितरणावर आधारित आणि वस्तु समर्थित असल्याचे चुकीचे वर्णन केले गेले.

**सी.४.२. ६३ मुन्स न्यायनिर्णय**

४७. २४ कसूरदारांकडून ५६००/- कोटी रुपयांच्या वसुलीसाठी कथितपणे फसवणूक झालेल्या व्यापाऱ्यांनी दाखल केलेल्या खटल्यात एनएसईएल ने तृतीय पक्षाचे निवेदन दाखल केले. थकबाकी वसूल करण्यासाठी लवादाची कार्यवाहीही सुरू करण्यात आली होती . ५००० कोटी रुपयांपैकी ३,३६५ कोटी रुपये न्यायालयीन हुकूमनामा आणि लवादाच्या निर्णयांद्वारे समाविष्ट करण्यात आले आहेत. ६ जानेवारी २०१४ रोजी, ईओडब्ल्यू. मुंबईने एन एसईएल (NSEL) चे व्यवस्थापन संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, वखाराचे प्रमुख आणि इतर दोन थकबाकीदारांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. आरोपपत्रात असे नमूद

करण्यात आले कि एनएसईएल(NSEL) च्या या कर्मचाऱ्यांनी कसूरदारांशी संगनमत करून त्यांना मान्यताप्राप्त वखारामध्ये माल जमा न करता या माध्यमाद्वारे व्यापार करण्यास सक्षम केले होते. १८ ऑगस्ट २०१४ रोजी एफएमसी(FMC) ने एनएसईएल (NSEL) आणि ६३ मून्सचे विलीनीकरण करण्याचे पत्र युनियन ऑफ इंडिया ला लिहिले. स्थापन करण्यात आलेल्या प्रतिनिधीत्व खटल्यात, मुंबई उच्च न्यायालयाने कसूरदारांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी आणि वसुलीच्या प्रक्रियेत मदत करण्यासाठी तीन सदस्यीय समिती ज्यात न्यायमूर्ती व्ही. सी. डागा, न्यायमूर्ती जे. सोलोमन आणि न्यायमूर्ती योगेश थार यांचा समावेश असलेली समिती नेमली.न्यायालयीन हुकूमनामा आणि लवादाच्या निर्णयांद्वारे समाविष्ट केलेल्या रु.३,३६५ कोटीव्यतिरिक्त, उच्चस्तरीय समितीने ८३५.८८ रकमेची थकबाकीदारांकडून वसूली केली जाईल अशी घोषणा केली होती.

४८. १५ ऑक्टोबर २०१४ रोजी आर्थिक व्यवहार विभागाच्या अतिरिक्त सचिवांनी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाला पत्र लिहून सांगितले की गुंतवणूकदारांना पैशापासून वंचित ठेवण्यासाठी ६३ मून आणि एनएसईएल (NSEL) स्वतंत्र ओळख कायम ठेवत आहेत. कॉर्पोरेट पडदा उचलला पाहिजे आणि प्रलंबित थकबाकी वसूल करण्यासाठी दोन्ही कंपन्यांचे एकत्रीकरण केले पाहिजे, असे सांगण्यात आले. १२ फेब्रुवारी २०१६ रोजी, कलम ३९६(३) अंतर्गत ६३ मून्स आणि एनएसईएल(NSEL) ची मालमत्ता आणि दायित्वे विलीन करण्याचा एक विलीनीकरण आदेश पारित करण्यात आला. विलीनीकरणाला आव्हान देणारी अनुच्छेद २२६ अंतर्गत दाखल केलेली रिट याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली. या न्यायालयासमोर विशेष परवानगी याचिकेने मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान दिले. एकत्रीकरण आदेशाची वैधता निश्चित करताना द्विसदस्यीय खंडपीठाने ग्रँट थॉर्नटन अहवालाचा संदर्भ दिला, ज्यामध्ये दुहेरी करार (अल्पकालीन आणि दीर्घकालीन) संबंधित वैशिष्ट्ये आणि निवेदने आणि देयके एनएसईएल (NSEL) ची भूमिका यावर चर्चा करण्यात आली.

> “१.३ सप्टेंबर २००९ मध्ये या दीर्घकालीन करारांचा(उदा.टी+२५) एनएसईएल (NSEL) एक्सचेंजवर प्रथम व्यवहार झाला. एनएसईएल (NSEL) च्या मंडळाने नोव्हेंबर २००९ पासून सुरू होणाऱ्या कालावधीत अशा दीर्घकालीन करारांची सुरुवात करणाऱ्या परिपत्रकांना मान्यता दिली.

१.४ वित्तपुरवठा व्यवसायाच्या अस्तित्वाबाबत पुढील पुरावे प्राप्त झाले, जसे कि सादरीकरण **ज्यामध्ये असे म्हटले आहे कि एनएसईएल (NSEL) एक्स्चेंजवर विशिष्ट उत्पादनांमध्ये गुंतवणूक केल्यावर निश्चित दराची हमी दिली गेली आहे.**

अनेक अंतर्गत(NSEL) सादरीकरणे आढळली, ईमेल डेटाबेसच्या पुनरावलोकनावर, **गुंवणूकदारांना एनएसईएल(NSEL) एक्स्चेंजवर विशिष्ट उत्पादनांमध्ये व्यापार करण्याची संधी म्हणून उत्पन्न (उदा. १६%)ठरविले.**

एनएसईएल(NSEL)एक्सचेंजवर केलेल्या गुंतवणुकीवर निश्चित परताव्याचा दावा करणाऱ्या त्यांच्या ग्राहकांसाठी दलाली संस्थेने (जिओजित कॉमट्रेड लिमिटेड) केलेले बाह्य सादरीकरण देखील प्राप्त झाले होते. पुढे, या सादरीकरणात असे घोषित करण्यात आले की अशा व्यवहारांमध्ये साठ्यांच्या प्रत्यक्ष वितरणाची आवश्यकता नाही.

१.५ ग्रांट थॉर्नटननेही एनएसईएल(NSEL)एक्सचेंज **नियम आणि उप-विधीचे वारंवार उल्लंघनांचे पुरावे देखील मिळवले ज्यामुळे अशा वित्तपुरवठा व्यवहारांना पुढीलप्रमाणे आकारात चालू ठेवणे आणि वाढ करणे सुलभ झालेः**

*वारंवार केलेले कसूरः* एनएसईएल (NSEL) च्या एक्सचेंज नियमांनुसार ज्या सदस्याकडे त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी पुरेसे तारण /पैसे इ. नाहीत, त्याला पुढे व्यापार करण्याची परवानगी दिली जाणार नाही. या नियमाची परत परत पायामल्ली करण्यात आली आहे. पुढे वारंवार कसूर करणाऱ्या सदस्यांना व्यापार करण्याची आणि त्यांचा खर्च वाढवण्याची परवानगी देण्यात आली. उदाहरणार्थ, लोटस रिफायनरीजने एक्सचेंज च्या नियमांनुसार, १-४-२०१२ आणि ३०-७-२०१३ या पंधरा महिन्यांच्या कालावधीतील १९८ दिवसांच्या कालावधीचा कसूर केला होता.

*मार्जिन च्या आवश्यकतांमधून सूटः* जे सदस्य कसूर केल्याच्या स्थितीत होते किंवा ज्यांनी व्यापारावरील त्यांच्या मार्जिन मर्यादा संपविल्या होत्या त्यांना मार्जिन आवश्यकतांमधून सूट देण्यात आली आणि अशा प्रकारे त्यांना नवीन व्यापारात गुंतवून त्यांचे एक्सपोजर वाढवण्याची परवानगी मिळाली. २००९ ते २०१३ या काळात १८०० हून अधिक मर्यादा सवलती देण्यात आल्या.

*सदस्य संपार्श्विकांचे अपुरे निरीक्षणः* एनएसईएल (NSEL)ने सदस्य व्यवस्थापित वखारामध्ये साठ्याचे अस्तित्व स्थापित करण्यासाठी कोणतीही कार्यतत्परता दाखवली नाही, ज्यावर व्यवहार केले जात होते. ग्रँट थॉर्नटनने साठा पडताळणीचा अभ्यास केला आणि अपेक्षित संपार्श्विकांच्या तुलनेत लक्षणीय कमतरता आढळली. या न्यायनिर्णयात ग्रँट थॉर्नटन अहवालातील ग्राहकांच्या पैशाचा/सेटलमेंट फंडाचा गैरवापर केल्याच्या निष्कर्षांचा संदर्भ देण्यात आला आहेः

" १.१२. *ग्राहकांच्या पैशाचा/सेटलमेंट फंडाचा गैरवापरः* एनएसईएल (NSEL) एक्सचेंजच्या नियमांनुसार आणि उप-विधीनुसार "समाशोधन सदस्यांना त्यांच्या घटक सदस्यांकडून आणि ग्राहकांकडून कोणत्याही स्वरूपात मिळालेल्या मार्जिन ठेवीं वेगळ्या खात्यामध्ये, स्वतंत्रपणे ठेवल्या जातील आणि त्यांचा वापर केवळ संबंधित घटक सदस्यांच्या आणि ग्राहकांच्या स्थितीच्या फायद्यासाठी केला जाईल."

**ग्राहकांचे पैसे/सेटलमेंट फंड, कसूर करणाऱ्या सदस्यांच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी नियमितपणे वापरले जात होते, असे पुरावे (ईमेलसह) ग्रांट थॉर्नटन यांना सापडले.**

**पुढे, एनएसईएल (NSEL) ने ग्राहकांच्या पैशांचा /सेटलमेंट फंडचा नियमितपणे स्वतःच्या व्यावसायिक हेतूंसाठी वापर केला.** उदाहरणार्थ, २८-३-२०१३ रोजी एनएसईएल (NSEL) च्या स्वतःच्या व्यावसायिक ओव्हरड्राफ्ट खात्यासाठी निधी पुरवण्यासाठी रु.२३६ कोटी सेटलमेंट फंडातून काढले गेले.

एप्रिल २०१२ ते जून २०१३ या कालावधीत ग्राहकांचे पैसे/सेटलमेंट फंड मध्ये सतत तूट होती. एफटीआयएल (FTIL) च्या वित्त संघाने हा मुद्दा अनेक वेळा चिंतेचा विषय म्हणून उपस्थित केला होता."

न्यायनिर्णयात अहवालाच्या निष्कर्षांनुसार वखाराच्या उपक्रमांच्या दस्तऐवजीकरणाच्या अभावावर चर्चा करण्यात आलीः

"त्यानंतर अहवालात असे म्हटले गेले आहे की दीर्घकालीन व्यापारासाठी वखाराच्या कामकाजाच्या संबंधात असे कोणतेही दस्तऐवजीकरण नव्हते जे असे सूचित करते की असे करार वखाराच्या साठ्यांद्वारे सुरक्षित नव्हते. ही वखारे ग्राहक व्यवस्थापित वखारे होती आणि अंतर्निहित संपार्श्विक एनएसईएल (NSEL) च्या ताब्यात नव्हते. एनएसईएल (NSEL)चे या

वखारांवर नियंत्रण नव्हते आणि ग्रँट थॉर्नटनला अनेक वखारांमध्ये प्रवेश नाकारण्यात आला. खरे तर १६.०५.२०११ रोजी, वेयरहाऊस डेव्हलपमेंट अँड रेग्युलेटरी ऑथॉरिटी ने एनएसईएल (NSEL)च्या वखारांच्या नोंदणीसाठीचा अर्ज फेटाळला होता. असा अर्ज फेटाळल्यावर, एनएसईएल (NSEL)ची वेबसाईट दर्शविते की त्यांची वखारे प्राधिकरणाकडे नोंदणीकृत होती. एनएसईएल (NSEL) द्वारे नियम आणि उपविधींमध्ये नमूद केलेल्या अटींचे सदस्यांनी पालन केले आहे याची खात्री करण्यासाठी एनएसईएल (NSEL) द्वारे कधीही पडताळणी किंवा यथायोग्य कार्यसक्ती केली गेली नाही ,जरी एनएसईएल (NSEL) उपविधी नुसार, एनएसईएल (NSEL)ने जारी केलेली वखार पावती ही मान्यताप्राप्त वखारत वस्तू ठेवल्याचा पुरावा देण्यासाठी होती .एनएसईएल(NSEL) ने विक्री व्यवहार करण्यापूर्वी वखारांमध्ये वस्तु जमा करण्याचा आग्रह धरला नाही. त्याऐवजी एनएसईएल (NSEL) ने खऱ्या गुंतवणूकदारांना डिलिव्हरी एलोकेशन रिपोर्ट (डीएआर.) जारी करण्याचा अवलंब केला, ज्यामध्ये प्रत्येक व्यवहार वितरणावर आधारित होता आणि विक्रीच्या वेळी त्याच्या वखारामध्ये वस्तुंच्या आवश्यक प्रमाणाद्वारे समर्थित होता."

६३ मून्स आणि एनएसईएल(NSEL)यांनी उघडपणे केलेला कट १७.१२.२०१३ रोजीच्या एफएमसी(FMC) च्या आदेशातील निष्कर्षाचा देखील खालील उताऱ्यात उल्लेख करण्यात आला आहेः

" १५.१. *सूचना ज्याला दिली गेली* १: फायनान्शियल टेक्नॉलॉजीज (इंडिया) लिमिटेड (एफटीआयएल.): आम्ही एनएसईएल(NSEL) च्या समभाग संरचनेवर चर्चा केली आहे, जी पूर्णपणे एफटीआयएल (FTIL) च्या मालकीची आहे. एफटीआयएल(FTIL)चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक जिग्नेश शाह हे मंडळावर संचालक आहेत आणि एनएसईएल(NSEL) च्या स्थापनेपासून ते त्याचे उपाध्यक्ष आणि प्रमुख व्यवस्थापन व्यक्ती म्हणूनही कार्यरत आहेत, याकडेही आम्ही लक्ष वेधले आहे. त्याचप्रमाणे, जोसेफ मॅसी आणि श्रीकांत जावळगेकर हे या कंपनीचे अगदी सुरुवातीपासून एनएसईएल(NSEL) मधील तडजोडीचे संकट पहिल्यांदा जुलै २०१३ मध्ये समोर येईपर्यंत संचालक होते. ५५०० कोटी रुपयांहून अधिक रकमेची सेटलमेंट चूक जी एनएसईएल (NSEL) मध्ये झाली, त्या सिद्ध झालेल्या तथ्यांची चर्चा विस्तुतपणे एससीएनएस (SCNs) ने नोटीसाला बजावलेल्या नोटीस मध्ये केली आहे तसेच पुनरुच्चार केला आहे. जो आम्ही या आदेशाच्या परिच्छेद १४.७ मध्ये

स्पष्ट केले आहे. एनएसईएल (NSEL) च्या प्रशासनावर संपूर्ण नियंत्रण असलेली धारक कंपनी म्हणून एफटीआयएल (FTIL) ची ही जबाबदारी देखील अधोरेखित करण्यात आली आहे. श्री. जिग्नेश शाह, श्री. जोसेफ मॅसी आणि एफटीआयएल च्या इतर अधिकाऱ्यांनी न्यायवैद्यक लेखापरीक्षा अहवालाचा आढावा घेतला आणि त्यांची मंजुरी मिळाल्यानंतरच न्यायवैद्यक लेखापरीक्षकाने त्याचा अहवाल अंतिम केला असे नमूद करून मेसर्स ग्रँट थॉर्नटन यांनी आयोगासमोर दिलेल्या अनुकरियादांमुळे एनएसईएल(NSEL) वरील एफटीआयएल (FTIL) चे नियंत्रण आणखी स्पष्ट होते.

१५.१.१ सवलतीच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या अटींचे उल्लंघन, वस्तुंच्या व्यापाराच्या नावाखाली खात्रीशीर आर्थिक परतावा मिळविण्यासाठी जोडीदार (Paired)करारांमध्ये व्यापार करणे, कमी निव्वळ संपत्ती असलेल्या कमी भांडवल असलेल्या सदस्यांना प्रवेश देणे आणि थकबाकी भरण्यात वारंवार चूक करणाऱ्यांना मार्जिन सूट देणे, साठा नसलेली किंवा अपुरा साठा असलेल्या खराब वखार सुविधा, जोखीम व्यवस्थापन पद्धतींचे पालन न करणे, एसजीएफ (SGF) मध्ये निधीची तरतूद न करणे, श्री जिग्नेश शाह यांच्याशी संबंधित असलेल्या मुकेश पी. शाह यांची जाणीवपूर्वक २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करणे आणि गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यासाठी कसूरकरणाऱ्यांसोबत उघडपणे संगनमत करणे इत्यादींमुळे एनएसईएल (NSEL) ने दोन मंडळाच्या सदस्यांच्या उपस्थितीत मोठी फसवणूक केली असा अपरिहार्य निष्कर्ष निघतो.

१५.१.२ खटल्यातील तथ्ये आणि एनएसईएल(NSEL) चे व्यावसायिक व्यवहार ज्या पद्धतीने चालविले गेले होते, त्यावरून आमच्या मनात शंका नाही की एफटीआयएल (FTIL) ने एनएसईएल (NSEL) च्या कारभाराविषयी आणि वर्तनाबद्दल अनभिज्ञ असल्याचा वाद करूनही, व्यवस्थापनावर प्रभावी प्रभाव पाडला आणि एनएसईएल(NSEL) च्या प्रशासनाचे निदिष्ट , नियंत्रण आणि पर्यवेक्षण केले. एनएसईएल (NSEL) चा व्यापार माध्यम वर १३००० हून अधिक विक्रेते/गुंतवणूकदारांच्या ५५०० कोटी रुपयांच्या सेटलमेंटच्या संकटाचा समावेश असलेल्या इतक्या मोठ्या फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर, एफटीआयएल(FTIL), एनएसईएल (NSEL) मध्ये झालेल्या फसवणुकीच्या कारवायांपासून ज्यामुळे इतक्या मोठ्या देयक संकटाचा सामना करावा लागतो, त्यासाठी

स्वतःला अन्यायकारकपणे वेगळे करण्यासाठी कॉर्पोरेट बुरख्याच्या मागे आश्रय घेऊ शकत नाही.

१५.१.३. एफटीआयएल (FTIL) चा सॉफ्टवेअर तयार करण्याचा मुख्य व्यवसाय आहे जो शेअर्स आणि प्रतिभूती, वस्तू, परकीय चलन इत्यादींमध्ये गुंतलेल्या जवळजवळ संपूर्ण उद्योगासाठी तंत्रज्ञानाचा प्लॅटफॉर्म बनला आहे. एफटीआयएल (FTIL) ने त्यांच्या लेखी सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे, एफटीआयएल ने भारतात तसेच परदेशात प्रतिभूती आणि वस्तू या दोन्ही व्युत्पन्नासाठी अनेक नियंत्रित देवाणघेवाण सुरू केली आहे. अखिल भारतीय आधारावर 'कमोडिटी स्पॉट एक्सचेंज' करिता व्यापारिक प्लॅटफॉर्म प्रदान करण्यासाठी एनएसईएल (NSEL) ची स्थापना करण्यात आली होती, ज्यासाठी त्यांनी स्पष्टपणे मागणी केली होती आणि विदेशी योगदान नियमन कायदा (FCRA), १९५२ राबविण्यापासून सूट देण्यात आली होती. **एनएसईएल (NSEL) चा उद्देश इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्म वर वस्तूंच्या तत्काळ व्यापारास प्रोत्साहन देणे हा असल्याने, त्याच्या व्यावसायिक आदर्शामध्ये भावी संविदेत व्यापार करण्याचे धाडस योजले नव्हते.** एफटीआयएल (FTIL) ने भावी संविदेत व्यापार करण्याच्या उद्देशाने एफसीआरए (FCRA), १९५२ द्वारे नियंत्रित एमसीएक्स (MCX ) या विनियमाला आधीच चालना दिली होती. म्हणून एनएसईएल (NSEL) ला स्पॉट ट्रेडिंगला चालना देण्याचा हेतू असल्याच्या आधारावर एफसीआरए (FCRA), १९५२ च्या कक्षेतून सूट मिळवून जोड संविदाच्या योजनेद्वारे भावी संविदेत व्यापार करण्यास परवानगी देण्यात आली नाही, ज्यामुळे त्याला देण्यात आलेल्या सूट अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या अटींचे उल्लंघन केले गेले. एफसीआरए (FCRA), १९५२ अन्वये मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत नसलेल्या एनएसईएल (NSEL) प्लॅटफॉर्मवर अप्रत्यक्ष रीतीने भावी संविदेमध्ये व्यापारास परवानगी देण्यामागील हेतू, एफटीआयएल (FTIL)च्या प्रवर्तकाचा त्याच्या अनुषंगी कंपनीच्या व्यापारिक प्लॅटफॉर्मचा वापर विनियामकाच्या नजरेपासून दूर बेकायदेशीर फायद्यासाठी करण्याचा दुर्भावनापूर्ण हेतू दर्शवितो. एफटीआयएल (FTIL) ने प्रवर्तित केलेल्या एनएसईएल (NSEL) ने कोणताही व्यापार किंवा कार्य संचालन सुरू करण्यापूर्वी एफसीआरए(FCRA), १९५२ च्या तरतुदींमधून सूट मागितली होती, ही वस्तुस्थिती सुरुवातीपासूनच त्यांचा हेतू दर्शवते. अशा प्रकारे, त्यांनी काही मूठभर सदस्यांच्या संगनमताने सूट अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या अटींचा चुकीचा अर्थ लावला, ज्याची परिणती शेवटी ५५०० कोटी रुपयांच्या मोठ्या फसवणुकीत झाली, ज्याचा

संभाव्य परिणाम विनिमय आणि वित्तीय बाजारपेठेवरील निष्ठा आणि विश्वास कमी होण्यात झाला.

१५.१.४. एफटीआयएल (FTIL) द्वारे त्याच्या अनुषंगी कंपनी एनएसईएल (NSEL) च्या कामकाजाचे नियोजन, संचालन आणि नियंत्रण करताना एफटीआयएल (FTIL) कडून गैरवर्तन, सचोटीचा अभाव आणि अन्यायकारक पद्धती उघड करणारी तथ्ये आणि वरील निरीक्षणे लक्षात घेऊन, आम्ही असा निष्कर्ष काढतो की एफटीआयएल (FTIL) हे मल्टी-कमोडिटी एक्सचेंज लिमिटेड (MCX) मधील प्रमुख गुंतवणूकदार म्हणून उपरोक्त विनियमित केलेल्या एक्सचेंजचे भागधारक बनून राहण्यासाठी चांगली प्रतिष्ठा आणि चारित्र्य, निष्पक्षता, सचोटी किंवा प्रामाणिकपणा बाळगत नाही. *त्यामुळे, लोकहितासाठी आणि एफसीआरए (FCRA), १९५२ द्वारे विनियमित कमोडिटीज डेरिव्हेटिव्हस मार्केट (वस्तूचे व्युत्पन्न बाजार) च्या हितासाठी, आयोगाने मत व्यक्त केले आहे की, ५ वर्षांच्या संचालनानंतर वस्तु विनिमयांच्या भांडवलीच्या संरचनेसाठी भारत सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विहित केलेल्या एमसीएक्स (MCX ) च्या भरणा झालेल्या इक्विटी कॅपिटलच्या २% किंवा त्याहून अधिकचे भागधारक राहण्यासाठी फायनान्शियल टेक्नॉलॉजीज (इंडिया) लिमिटेड (FTIL) ही "यथायोग्य आणि अनुरूप व्यक्ती" नाही.* पुढे असे आदेश देण्यात येत आहे की, एफटीआयएल (FTIL) किंवा तिच्याद्वारे नियंत्रित कोणतीही कंपनी/संस्था, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, सरकारद्वारे मान्यताप्राप्त किंवा एफएमसी (FMC) द्वारे नोंदणीकृत कोणत्याही संघटना / एक्सचेंजमध्ये वस्तु विनिमय मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि ५ वर्षांनंतरच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विहित केलेल्या अशा संघटनेच्या/एक्सचेंजच्या एकूण भरणा झालेल्या इक्विटी कॅपिटलच्या सहन मर्यादेपेक्षा जास्त समभाग धारण करणार नाही."

**(भर दिला जातो)**

४९. या न्यायालयाच्या द्वि-सदस्यीय खंडपीठाने एनएसईएल (NSEL) सोबत काही ट्रेडिंग मेंबर्सनी रचलेल्या कटाद्वारे इतर ट्रेडिंग मेंबर्सची फसवणूक करण्याच्या कार्यपद्धतीची दखल घेतली. तथापि, या न्यायालयाने असे मत व्यक्त केले की, एनएसईएल (NSEL) आणि ६३ मून्सच्या विलीनीकरणाचा आदेश कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३९६

मधील आवश्यकतांची पूर्तता करत नाही कारण विलीनीकरणाची आवश्यकता असलेली 'आणीबाणीची परिस्थिती' अल्पकाळ टिकली होती ज्यामुळे कलम ३९६ मधील 'अनिवार्यतेचा पैलू ' पूर्ण झाला नव्हता. पुढे असे निरीक्षण नोंदविण्यात आले की कसूरदार सदस्यांकडून वसुली करण्यास एनएसईएल (NSEL) ची आर्थिक असमर्थता हे विलीनीकरणाचे कारण होते. न्यायालयाने असे नोंदवले की, दिनांक १२ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या विलीनीकरणाच्या अंतिम आदेशात आर्थिक गुन्हे शाखा (EOW) आणि अंमलबजावणी संचालनालय (Enforcement Directorate) ने वसुलीसाठी केलेल्या कारवाईचा संदर्भ देण्यात आला आहे, ज्यामध्ये विलीनीकरणाव्यतिरिक्त इतर पद्धती सूचित केल्या होत्या ज्याद्वारे पैसे वसूल केले जाऊ शकतात. आर्थिक गुन्हे शाखा (EOW) आणि अंमलबजावणी संचालनालय (Enforcement Directorate) ने केलेल्या कारवाईचा संदर्भ खालील उताऱ्यात दिला आहे :

"९२.१. याची नोंद घेणे महत्त्वाचे आहे की जेव्हा विलीनीकरणाचा अंतिम आदेश पारित झाला तेव्हा म्हणजे दिनांक १२/०२/२०१६ रोजी अंतिम आदेशातच असे नोंदविण्यात आले आहे :

**"८. १. आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई :**

(i) २४ कसूरदारांकडून एकूण देय आणि वसूल करण्यायोग्य रक्कम रुपये ५६८९.९५ कोटी एवढी आहे.

(ii) कसूरदारांच्या ४४००.०० कोटी रुपयांच्या मालमत्तेसाठी मनाई हुकूम प्राप्त झाले आहेत.

(iii) ५ कसूरदारांविरुद्ध १२३३.०२ कोटी रुपयांचे हुकूमनामे प्राप्त झाले आहेत.

(iv) कसूरदारांची ५४४४.३१ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असून त्यापैकी ४६५४.६२ कोटी रुपयांची मालमत्ता एमपीआयडी (MPID) अधिनियमांतर्गत एमपीआयडी (MPID) न्यायालयाच्या देखरेखीखाली परिसमापनासाठी राजपत्रात प्रकाशित करण्यात आली आहे आणि ७८९.६९ कोटी रुपयांची शिल्लक मालमत्ता आर्थिक गुन्हे शाखा (EOW) द्वारे जप्त करण्यासाठी संलग्न / सुरक्षित करण्यात आली आहे.

(v) एनएसईएल (NSEL) च्या संचालक आणि कर्मचाऱ्यांची ८८५.३२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असून त्यापैकी ८८२.३२ रुपयांची मालमत्ता एमपीआयडी (MPID) अधिनियमांतर्गत एमपीआयडी (MPID) न्यायालयाच्या देखरेखीखाली परिसमापनासाठी राजपत्रात प्रकाशित करण्यात आली आहे आणि ३ कोटी रुपयांची शिल्लक मालमत्ता आर्थिक गुन्हे शाखा (EOW) द्वारे जप्त करण्यासाठी संलग्न / सुरक्षित करण्यात आली आहे.

(vi) एमपीआयडी (MPID) न्यायालयाने एमपीआयडी (MPID) अधिनियमाच्या कलम ४ आणि ५ अन्वये ज्यांची वरीलप्रमाणे मालमत्ता जप्त करण्यात आली आहे अशा व्यक्तींना आधीच नोटीस बजावली आहे. अशा प्रकारे, जप्त केलेल्या मालमत्तेच्या परिसमापनाची प्रक्रिया सुरू झाली आहे.

(vii) मुंबई उच्च न्यायालयाने कसूरदारांच्या मालमत्तेची वसुली आणि मुद्रीकरण करण्यासाठी न्यायमूर्ती (सेवानिवृत्त) श्री. व्ही. सी. डागा यांच्या अध्यक्षतेखाली ३ सदस्यीय समिती आणि वित्त आणि कायदा क्षेत्रातील २ तज्ञांची नियुक्ती केली आहे.

(viii) आतापर्यंत ५५८.८३ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत, ज्यापैकी ३७९.८३ कोटी रुपये कसूरदारांकडून प्राप्त झाले आहे / वसूल करण्यात आले आहेत आणि १७९ कोटी रुपये एनएसईएल (NSEL) द्वारे लहान व्यापारी/गुंतवणूकदारांना संवितरित करण्यात आले आहेत.

**८.२. अंमलबजावणी संचालनालय (ईडी) :**

(i) ईडी ने २५ कसूरदारांच्या ३९७३.८३ कोटी रुपयांच्या गुन्ह्यातील उत्पन्नाचा शोध लावला आहे;

(ii) ईडी ने १२ कसूरदारांची ८३७.०१ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

(iii) पीएमएलए (PMLA) मध्ये नुकत्याच झालेल्या सुधारणानुसार, ईडी ने जप्त केलेल्या मालमत्तेचा वापर पीडितांना भरपाई देण्यासाठी केला जाऊ शकतो.

**८.३.** वरील स्थिती सूचित करते की उक्त अंमलबजावणी संस्था त्यांच्या अधिकारानुसार काम करत आहेत.

**(भर दिला जातो)**

या न्यायालयाने अशी नोंद घेतली आहे की, कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३९६ मधील 'अनिवार्यतेची' आवश्यकता पूर्ण केली गेली नाही :

> “ ९२.२. ऑगस्ट २०१४ मध्ये एफएमसी (FMC) ला जी काळजी होती, त्याचे मोठ्या प्रमाणात निराकरण विलीनीकरणाच्या अंतिम आदेशाच्या तारखेपर्यंत, विलीनीकरणाशिवाय केले गेले आहे. २०१३ ची "आणीबाणीची परिस्थिती" ज्यामध्ये केंद्र सरकारने सुद्धा म्हणण्यानुसार, सक्तीच्या विलीनीकरणाचे आपत्कालीन पाऊल उचलणे आवश्यक होते, ती परिस्थिती केंद्र सरकारचा आदेश पारित होईपर्यंत गायब झाली आहे. अशा प्रकारे, कंपनी अधिनियमाचे कलम ३९६ लागू करण्याचे कारण काळाच्या ओघात स्वतःच नाहीसे झाले आहे. खरेतर, आजतागायत, कसूरदारांविरुद्ध ३३६५ कोटी भारतीय रुपयांचे हुकूमनामे / निवाड्यांची रक्कम प्राप्त झाली आहे, त्याचे सोबत उच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या समितीने ८३५.८८ कोटी भारतीय रुपये निश्चित केले आहेत, जे एकत्रित कंपनी म्हणून एफटीआयएल (FTIL) च्या आर्थिक संसाधनांचा वापर न करताही उच्च न्यायालयाच्या स्वीकृतीसाठी प्रलंबित आहे. म्हणून याची नोंद घेणे महत्वाचे आहे की, २०१३-२०१४ मध्ये एफएमसी (FMC) आणि सरकारच्या मतानुसार सुद्धा, जे काही आकस्मिकपणे उद्भवले होते आणि म्हणूनच जे आवश्यक होते, त्याचे २०१६ मध्ये विलीनीकरणाचा आदेश दिला जाईपर्यंत मोठ्या प्रमाणात निराकरण करण्यात आले होते. तसेच, केंद्र सरकारचा आदेश कलम ३९६ मधील अनिवार्यतेच्या पैलूवर अजिबात लक्ष देत नाही. खरं तर, बऱ्याच ठिकाणी, ते "अनिवार्य सार्वजनिक हित" चा संदर्भ देते जसे की कलम ३९६ अंतर्गत शक्तीच्या वापराची पूर्व उदाहरण म्हणून स्वतंत्र आणि विशिष्ट अट न ठेवता"अनिवार्य " हे "सार्वजनिक हित" बरोबर जाते. म्हणून वस्तुस्थितीनुसार हे स्पष्ट आहे की, अनिवार्यतेची चाचणी, जी कलम ३९६ लागू होण्याची पूर्वअट आहे, ती पूर्ण झाली आहे असे म्हणता येणार नाही.”

न्यायनिर्णयात असे मानले गेले की एनएसईएल (NSEL) ने खोटे दर्शविले होते की, त्यांच्याकडे तारण म्हणून पूर्ण स्टॉक होता आणि त्या स्टॉकची किंमत ६,००० कोटी रुपये एवढी होती.

"९१.३. आम्ही पाहिले आहे की, एफटीआयएल(FTIL) किंवा एनएसईएल (NSEL) या दोघांचे कमोडिटीज मध्ये जोड संविदा सुरू होती, ही वस्तुस्थिती त्यांनी नाकारली नाही आणि एप्रिल ते जुलै २०१३ पर्यंत, एनएसईएल (NSEL) च्या ९९% (आणि ई-सीरिज संविदा वगळता) उलाढालीपैकी किमान ४६% अशा जोड संविदांमुळे केलेली होती. यात काही शंका नाही की असे जोड संविदा वस्तुत: वित्तीय व्यवहार होते जे कमोडिटीज मधील विक्री आणि खरेदी व्यवहारांपेक्षा वेगळे होते आणि त्यामुळे एनएसईएल (NSEL) आणि एफसीआरए (FCRA) या दोहोंना देण्यात आलेल्या सवलतींचे उल्लंघन होते. आम्ही हे देखील पाहिले आहे की सुरुवातीपासून शेवटपर्यंत एनएसईएल (NSEL) असेच दर्शवत राहिले की, ते खरं तर, स्पॉट डिलिव्हरीशी संबंधित एक कमोडिटी एक्सचेंज (वस्तू विनिमय केंद्र ) होते. ग्रँट थॉर्नटन अहवाल आणि एफएमसी (FMC) च्या आदेशाव्यतिरिक्त आम्ही हे देखील पाहिले आहे की श्री जिग्नेश शाह यांनी दिनांक १०/०७/२०१३ रोजी डीसीए (DCA) आणि एफएमसी (FMC) ला निवेदन सादर केले होते, ज्यामध्ये त्यांनी असे म्हटले होते की एनएसईएल (NSEL) कडे तारण म्हणून संपूर्ण स्टॉक होता; मार्जिन मनी म्हणून ओपन पोझिशनच्या १०-२०%; आणि सध्या एनएसईएल (NSEL) च्या १२० वखारांमध्ये असलेल्या स्टॉकची किंमत ६००० कोटी भारतीय रुपये आहे, जे सर्व चुकीचे ठरले. पुढे, यात काहीही शंका नाही की जुलै २०१३ मध्ये, एनएसईएल (NSEL) ने त्याच्या एक्सचेंजवर ट्रेडिंग थांबवल्यामुळे, सुमारे ५६०० कोटी देय असलेल्या रकमेचे संकट निर्माण झाले. सदर तथ्ये लक्षात घेता, कलम ३९६ लागू होण्याच्या पूर्वनिश्चित अटींचे पालन केले होते काय, हा आणखी एक प्रश्न उरला आहे.

५०. या न्यायालयाने विनिर्देशपुर्वक **६३ मून्स** (उपरोल्लेखित) मध्ये आपल्या निर्णयात नियमांचे पालन न करण्यात एनएसईएल (NSEL) च्या भूमिकेवर अधिक भर देऊन, ज्या *कार्यपद्धती* द्वारे चूक झाली त्याची नोंद घेतली. कलम ३९६ अंतर्गत अधिकाराचा वापर करण्याच्या पूर्व अटी पूर्ण केल्या गेल्या नाहीत या संकुचित आधारावर त्यांनी विलीनीकरणाचा आदेश रद्द केला. विलीनीकरणाचा आदेश रद्द करण्यासाठी या न्यायालयाचे मन वळण्याचे एक कारण म्हणजे ईओडब्ल्यू (EOW) आणि अंमलबजावणी संचालनालय (ED) ने

डिफॉल्ट (अप्राप्त) रकमेची वसुली करण्यासाठी आधीच पावले उचलली होती. ग्रँट थॉर्नटनच्या अहवालाच्या तपशीलवार विश्लेषणानंतर एफएमसी (FMC) च्या आदेशानुसार, **६३ मून्स** (उपरोल्लेखित) मधील न्यायनिर्णयात असे मत व्यक्त करण्यात आले आहे की, कसूरदार आणि एनएसईएल(NSEL) नी सदस्यांच्या पैशांचा अपहार करून त्यांना फसविण्याचा कट रचला.

**सी. ५ एमपीआयडी (MPID) अधिनियमाची संवैधानिक वैधता**

५१. उत्तरवादींनी एमपीआयडी (MPID) अधिनियमाच्या तरतुदींच्या संवैधानिक वैधतेला या आधारावर उच्च न्यायालयात आव्हान दिले कीत्या तरतुदी स्वेच्छानुसारी आहेत. आक्षेपित न्यायनिर्णयात उच्च न्यायालयाने तरतुदींच्या संवैधानिक वैधतेचा विचार केला नाही आणि प्रश्न खुला ठेवला. उत्तरवादींनी या न्यायालयासमोर असा युक्तिवाद केला की, **भास्करन** (उपरोल्लेखित) मधील न्यायनिर्णयाने तामिळनाडू अधिनियमाला संवैधानिकदृष्ट्या वैध ठरवताना केवळ एमपीआयडी (MPID) अधिनियमाचा संदर्भ दिला आहे. अशा प्रकारे, एमपीआयडी (MPID) अधिनियमाच्या तरतुदींच्या वैधतेवर निर्णय घेताना हे खंडपीठ **भास्करन** (उपरोल्लेखित) मधील न्यायनिर्णयाला बांधील नाही असा युक्तिवाद करण्यात आला.

५२. मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायाधीशमंडळाने असे मत मांडले होते की एमपीआयडी (MPID) अधिनियम [36]3636 लागू करण्याची विधीमंडळाची क्षमता राज्य विधानमंडळाकडे नाही. दुसरीकडे, मद्रास उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायाधीशमंडळाने तामिळनाडू अधिनियमाची संवैधानिक वैधता कायम ठेवली होती. **भास्करन** (उपरोल्लेखित) मध्ये मद्रास उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अचूकतेवर या न्यायालयासमोर हल्ला करण्यात आला. मद्रास उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाविरुद्ध केलेल्या अपीलावर सुनावणी करणाऱ्या द्विसदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाने मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायाधीशमंडळाच्या न्यायनिर्णयाचा संदर्भ दिला आणि त्यावर विचार केला. या न्यायालयाने असे मत व्यक्त केले की, राज्य विधानमंडळाकडे आक्षेपित कायदा अधिनियमित करण्याची वैधानिक क्षमता आहे आणि हा कायदा बँकिंग व्यवहार किंवा ठेवी स्वीकारण्यासाठी नव्हता

3636 विजय सी. पुलजल -विरुद्ध - महाराष्ट्र राज्य, (२००५) ४ सीटीसी ७०५ (बॉम्बे)

तर फसव्या वित्तीय आस्थापनांद्वारे फसवणूक झालेल्या बँक ठेवीदारांच्या संरक्षणासाठी होता.

> "२६. फसवणूक करणाऱ्या वित्तीय आस्थापनांच्या तावडीत सापडलेल्या हजारो ठेवीदारांची स्थिती सुधारण्यासाठी तामिळनाडू अधिनियम लागू करण्यात आला होता, ज्यांनी उच्च व्याजदराची आशा निर्माण केली होती आणि अशा प्रकारे ठेवीदारांची फसवणूक केली होती. अशा प्रकारे तामिळनाडू अधिनियम बँकिंग व्यवहार किंवा ठेवी स्वीकारण्यावर भर देत नाही, तर फसवणूक करणाऱ्या वित्तीय आस्थापनांद्वारे फसवणूक केलेल्या ठेवीदारांची परिस्थिती सुधारण्यावर केंद्रित आहे. आक्षेपित तामिळनाडू अधिनियमाचा हेतू रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम आणि बँकिंग नियमन कायद्याद्वारे नियमित व्यवसाय किंवा बँकिंग करणाऱ्या बँकांशी किंवा कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत अधिनियमित गैर-बँकिंग वित्तीय कंपन्यांशी व्यवहार करण्याचा नव्हता.
>
> २७. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, बँकिंग नियमन कायदा आणि कंपनी अधिनियम हे आक्षेपित तामीळनाडू अधिनियमाने व्यापलेले क्षेत्र, व्यापत नाहीत, जरी नंतरचे प्रकरण योगायोगाने आधीच्या अधिनियमाचे उल्लंघन करू शकते. तामीळनाडू अधिनियमाचा मुख्य उद्देश लाखो ठेवीदारांचे अश्रू पुसून त्यांची थकबाकी प्रभावीपणे आणि वेगाने वसूल करण्यासाठी त्यांना किंवा त्यांच्या विक्रेत्यांना कायदेशीर लढाईत न खेचता, फसवणूक करणाऱ्या वित्तीय आस्थापनांकडून त्यांची थकबाकी वसूल करण्याचा उपाय प्रदान करणे हा आहे. त्यामुळे *दिल्ली क्लॉथ मिल्स* [(१९८३) ४ *एससीसी* १६६] मधील या न्यायालयाच्या निर्णयाचा तामिळनाडू अधिनियमाच्या संवैधानिक वैधतेवर कोणताही परिणाम होत नाही.

**विजय सी. पुलजल -विरुद्ध - महाराष्ट्र राज्य** [37]3737 प्रकरणातील मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायाधीशमंडळाने **भास्करन**(उपरोल्लेखित) प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयात दिलेला न्यायनिर्णय विशेषतः नामंजूर करण्यात आला होता, ज्यामध्ये न्यायालयाने असे म्हटले होते :

3737 (२००५) ४ सीटीसी ७०५ (बॉम्बे)

"१४. महाराष्ट्र अधिनियमाप्रमाणेच तामिळनाडू अधिनियम हा राज्य विधानमंडळाच्या वैधानिक मर्यादेबाहेर असल्याने तो असंवैधानिक होता या त्याच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने *विजय सी. पुलजल* [(२००५) ४ *सीटीसी* ७०५ (*बॉम्बे*)] प्रकरणामधील मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायाधीशमंडळाने दिलेल्या निर्णयावर भर दिला. आम्ही सहमत नाही.

१५. *विजयच्या प्रकरणात* [(२००५)४ *सीटीसी* ७०५ (*बॉम्बे*)] मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायाधीशमंडळाने दिलेल्या निर्णयाचा आम्ही काळजीपूर्वक अभ्यास केला आहे आणि मुंबई उच्च न्यायालयाने घेतलेल्या दृष्टिकोनाशी आम्ही आदरपूर्वक असहमत आहोत. हे लक्षात घेतले जाऊ शकते की **तामिळनाडू अधिनियम आणि महाराष्ट्र अधिनियम यात काही फरक असला तरी तो किरकोळ फरक आहे आणि म्हणूनच आम्ही येथे घेत असलेला दृष्टिकोन महाराष्ट्र अधिनियमाला देखील लागू होईल.**

**(भर दिला जातो)**

५३. राज्य विधिमंडळात कायदा लागू करण्यासाठी विधिमंडळाच्या क्षमतेचा अभाव नाही, असा निष्कर्ष काढण्याबरोबरच भास्करन(उपरोल्लेखित) मधील निकालात असेही म्हटले आहे की तामिळनाडू कायद्याने संविधानाच्या अनुच्छेद १४, १९ (१) (जी) किंवा २१ च्या तरतुदींचे उल्लंघन केलेले नाही. त्या संदर्भात, तामिळनाडूमध्ये लागू केलेल्या कायद्याविरोधातील घटनात्मक आव्हान फेटाळताना न्यायालयाने असे म्हटलेः

"३१. राज्यघटनेच्या अनुच्छेद १४, १९ (१) (जी) किंवा २१ चे उल्लंघन कसे होते हे आपल्याला समजत नाही. हा कायदा एका मोठ्या सामाजिक दुष्टतेवर उपाय म्हणून एक हितकारक उपाय आहे. काही फसव्या वित्तीय आस्थापनांनी पद्धतशीर कट रचला, ज्यांनी केवळ ठेवीदारांची फसवणूकच केली नाही, तर ठेवीदारांचा निधी दुर्भावनापूर्ण पद्धतीने वळवला किंवा त्याची दिशा बदलवली. आमचे असे मत आहे की ठेवीदारांचे शोषण करण्याची वित्तपुरवठादारांची कृती हा ठेवीदारांच्या श्रद्धेचा कुख्यात गैरवापर आहे, ज्यांनी उच्च व्याजदरासाठी निर्दोषपणे त्यांचा पैसा ठेवीदाराकडे जमा केला. या ठेवीदारांना त्यांच्या ठेवीच्या पावतीचे प्रतीक म्हणून

अनेकदा एक लहान पासबुक दिले जात असे, जे ते त्यांच्या मुलांचे उच्च शिक्षणासाठी किंवा त्यांच्या मुलींच्या लग्नासाठीचे पारपत्र किंवा बहुतेक वृद्ध ठेवीदारांच्या बाबतीत वैद्यकीय विम्याचे धोरण म्हणून मानत असत, परंतु प्रत्यक्षात सर्व प्रकरणांमध्ये ते निरुपयोगी कागदावर अंमलात आणलेले असुरक्षित वचन होते. ८० वर्षांपेक्षा जास्त वयाचे ज्येष्ठ नागरिक, ६० ते ८० वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिक, विधवा, अपंग, बालकांनी बाहेर काढलेले, निवृत्त सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारक आणि दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती मोठ्या प्रमाणात ठेवीदार होते. आक्षेपित कायद्याच्या मदतीशिवाय, त्यांच्या बँक ठेवी आणि त्यावरील व्याज वसूल करणे अशक्य झाले असते.

३२. न्यायालयीन शुल्क, वकिलांचे शुल्क, इतर गैरसोयींव्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात खर्च होणारी पारंपरिक कायदेशीर कार्यवाही आणि न्यायालयांमध्ये डॉकेट स्फोटामुळे खटले निकाली काढण्यास होणारा प्रदीर्घ विलंब यामुळे ठेवीदारांना त्यांचा पैसा वसूल करणे शक्य झाले नसते, त्यावर व्याज सोडून द्या. त्यामुळे, आमच्या मते, या संदर्भात ठोस पावले उचलत ठेवीदारांना त्यांचा पैसा वेगाने वसूल करता यावा, यासाठी आक्षेपित अधिनियम योग्यरित्या लागू करण्यात आला आहे.

३३. संरक्षक देशभक्त म्हणून नागरिकांच्या कल्याणाचे संरक्षक असलेले राज्य या आजारावर तोडगा काढल्याशिवाय मूक प्रेक्षक राहू शकत नाही. आर्थिक फसवणूक करणारे, जे दुसरे काही नसून फसवणूक करणारे आणि सामाजिक जबाबदारी नसलेले, परंतु भोळसट गुंतवणूकदारांना आकर्षक परताव्याचे खोटे आश्वासन देऊन सहज पैसा कमावणारे, वासना बाळगणारे ढोंगी आहेत, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आली. मोठ्या संख्येने वैयक्तिक ठेवीदारांकडून गोळा केलेल्या छोट्या रकमेचा पराकाष्ठा मोठ्या रकमेत झाला. पैशाचे संकलन तिसऱ्या पक्षाच्या नावे वळवले गेले आणि शेवटी एक दिवस फसव्या वित्तपुरवठादारांनी निर्दोष ठेवीदारांना संकटात टाकून त्यांच्या वित्तीय आस्थापना बंद केल्या."

५४. न्यायनिर्णयात असे मत व्यक्त करण्यात आले की, तामिळनाडू अधिनियम संवैधानिकदृष्ट्या वैध आहे आणि या प्रकरणांना सामोरे जाण्यासाठी दीर्घकाळ प्रलंबित

असलेला एक स्तुत्य उपाय आहे. विशेष म्हणजे, **भास्करन**(उपरोल्लेखित) मधील निर्णयातील उपरोक्त उतारे असे सूचित करतात की तामिळनाडू आणि महाराष्ट्रच्या अधिनियमतीमधील मतभेद "किरकोळ" आहेत आणि आणि पूर्वीच्या वैधतेबद्दल न्यायालयाचा दृष्टिकोन नंतरच्या अधिनियमाच्या वैधतेवर देखील नियंत्रण ठेवेल.

५५. **भास्करन** (उपरोल्लेखित) मधील न्यायनिर्णयानंतर **न्यू होरायझन्स शुगर मिल्स लिमिटेड-विरुद्ध –पाँडिचेरी सरकार** [38]3838 मधील या न्यायालयाच्या आणखी एक द्वि-सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाने न्यायनिर्णय दिला. एका कंपनीने अधिग्रहित केलेल्या मालमत्ता जप्त करण्याच्या पाँडिचेरी सरकारच्या कारवाईमुळे हे प्रकरण उद्भवले. पाँडिचेरी प्रोटेक्शन ऑफ इंटरेस्ट ऑफ डिपॉजिटर्स इन फायनान्शियल एस्टेब्लिशमेंट एक्ट, २००४ च्या वैधतेवरही प्रश्नचिन्ह होते. या न्यायालयाच्या द्वि-सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाने, सदर अधिनियमाचे सत्व आणि सार हे संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील केंद्र सूची किंवा राज्य सूचीतील नोंदींमध्ये शोधण्यायोग्य आहे की नाही यावर विचार केला. एमपीआयडी (MPID) अधिनियम लागू करण्याच्या राज्य विधानमंडळाच्या वैधानिक सक्षमतेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाच्या निर्णयाला नामंजूर करताना तामिळनाडू अधिनियमाला समर्थन देणाऱ्या **भास्करन** (उपरोल्लेखित) मधील आधीच्या निर्णयाला दुजोरा दिल्यानंतर, या न्यायालयाने पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले :

> "५०. वरील गोष्टींव्यतिरिक्त, हे देखील लक्षात घेतले पाहिजे की, ज्या उद्देशांसाठी तामिळनाडू अधिनियम, महाराष्ट्र अधिनियम आणि पाँडिचेरी अधिनियम लागू करण्यात आले होते, ते समान आहेत, म्हणजे, अविचारी गुंतवणूकदारांवर झालेल्या फसवणुकीपासून लहान ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, ज्यांनी त्यांच्या जीवन भराची बचत, बेईमान आणि फसव्या व्यक्तींना सोपवली आणि ज्यांनी शेवटी त्यांचा विश्वासघात केला.
>
> ५१. तथापि, मद्रास उच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाने व्यक्त केलेल्या दोन मतांमुळे मांडलेल्या घटनात्मक प्रश्नाकडे परत येताना, या दोन्हीपैकी कोणती मते घटनात्मक तरतुदींशी अधिक सुसंगत असतील याचा विचार करावा लागेल. त्यानंतर

3838 (२०१२) १० एससीसी ५७५

मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र अधिनियम अधिकारबाह्य घोषित केलेला निर्णय[(२००५) ४ सीटीसी ७०५ (बॉम्बे)] या न्यायालयाने [*सोनल हेमंत जोशी-विरुद्ध-महाराष्ट्र राज्य,* (२०१२) *१० एससीसी* ६०१], [*महाराष्ट्र राज्य-विरुद्ध-विजय सी. पुलजल,* (२०१२) *१० एससीसी* ५९९] रद्द केला आहे, ज्यामुळे आता महाराष्ट्र आणि तामिळनाडू अधिनियमांशी संबंधित निकालांमध्ये समानता आहे.

[......]

५९. [......] तामीळनाडू अधिनियम, महाराष्ट्र अधिनियम आणि पाँडिचेरी अधिनियमाचे उद्दिष्ट समान आणि/किंवा तत्सम स्वरूपाचे असल्याने आणि तामीळनाडू आणि महाराष्ट्र अधिनियमाची वैधता कायम राखली गेल्यामुळे, पाँडिचेरी अधिनियमाची वैधता कायम ठेवण्याच्या मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयाला पुष्टी मिळणे आवश्यक आहे. आपण सर्व ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या या तीन अधिनियमांचे फायदेशीर स्वरूप लक्षात ठेवले पाहिजे , ज्यामध्ये ठेवीदार त्यांच्या आयुष्यभराची कमाई आणि बचतीची गुंतवणूक, निगमित आणि अनिगमित अशा दोन्ही प्रकारच्या अनैतिक व्यक्ती आणि कंपन्यांद्वारे नफा कमावण्यासाठी योजनांमध्ये करतात."

**भास्करन** (उपरोल्लेखित) मधील निर्णयानंतर, वैधानिक सक्षमतेच्या आधारावर पाँडिचेरी अधिनियमाला दिलेले आव्हान मागे घेण्यात आले.

५६. या न्यायालयाच्या **महाराष्ट्र राज्य -विरुद्ध - विजय सी. पुलजल** [39]3939 आणि **सोनल हेमंत जोशी विरुद्ध महाराष्ट्र राज्य** [40]4040 या दोन निर्णयांमध्ये एमपीआयडी (MPID) अधिनियमाची वैधता विनिर्देशपूर्वक हाताळली गेली होती. दोन्ही निर्णयांमध्ये, **भास्करन** (उपरोल्लेखित) मधील आधीच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर या न्यायालयाने एमपीआयडी (MPID) अधिनियमाची संवैधानिक वैधता कायम ठेवली. **सोमा सुरेश कुमार- विरुद्ध -आंध्र प्रदेश सरकार**[41]4141 मध्ये, या न्यायालयाच्या द्वि-सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाने **भास्करन** (उपरोल्लेखित) आणि **न्यू होरायझन्स शुगर मिल्स**

39 39 (२०१२) १० एससीसी ५९९

40 40 (२०१२) १० एससीसी ६०१

41 41 (२०१३) १० एससीसी ६७७

**लिमिटेड** (उपरोल्लेखित) मधील आधीच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेश प्रोटेक्शन ऑफ डिपॉजिटर्स ऑफ फायनान्शियल एस्टेब्लिशमेंट एक्ट, १९९९ च्या तरतुदी कायम ठेवल्या.

५७. एमपीआयडी (MPID) अधिनियमासह ठेवी योजना देऊ करणाऱ्या वित्तीय आस्थापनांवर नियंत्रण ठेवणाऱ्या राज्य विधिविधानाच्या संवैधानिक वैधतेवर या न्यायालयाच्या न्यायनिर्णयांवर चर्चा केल्यानंतर, आम्हाला हा प्रश्न पुन्हा उघडण्याचे कोणतेही कारण नाही. या न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की, एमपीआयडी (MPID) अधिनियम वैधानिक सक्षमतेच्या आधारावर आणि जेव्हा संविधानाच्या भाग III च्या तरतुदी अन्वये त्याची चाचणी केली जाते तेव्हा तो संवैधानिकदृष्ट्या वैध आहे.

**सी. ६ उच्च न्यायालयाचा निर्णय**

५८. एनएसईएल (NSEL) च्या उपविधी आणि नियमांचा संदर्भ देत, उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले की, एनएसईएल (NSEL) हा एक इलेक्ट्रॉनिक ट्रेडिंग प्लॅटफॉर्म आहे जो केवळ खरेदीदार आणि विक्रेते यांच्यातील व्यवहार सुलभ करतो. या संदर्भात, असे निरीक्षण नोंदवले गेले आहे की एनएसईएल (NSEL) ला त्याच्या स्वतः च्या अधिकारात पे-इन मिळाला नाही, परंतु ते त्याच दिवशी विक्री करणाऱ्या ट्रेडिंग मेंबरला देण्याच्या उद्देशाने मिळाला. उच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले :

> "त्यामुळे या इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मवर व्यापार सुरू झाल्यापासून एनएसईएल (NSEL) च्या प्लॅटफॉर्मवर होणाऱ्या व्यवहाराचे स्वरूप देखील सार्वजनिक क्षेत्रामध्ये होते. एनएसईएल (NSEL) च्या माध्यमातून चालणारा व्यवसाय/व्यवहार, एनएसईएल(NSEL) ला त्याच्या स्वतः च्या अधिकारात मिळालेली कोणतीही पे-इन रक्कम उघड करत नाही, परंतु ती केवळ कमोडिटी ट्रेडच्या तडजोडीच्या प्रक्रियेत प्राप्त झाली होती आणि ती केवळ त्याच दिवशी विक्री करणाऱ्या ट्रेडिंग सदस्याला हस्तांतरित करण्याच्या उद्देशाने प्राप्त झाली होती. ही रक्कम एमपीआयडी (MPID)अधिनियमाच्या कलम २(सी) च्या अर्थान्वये ठेव म्हणून प्राप्त झाली असे म्हणता येणार नाही ज्यामध्ये 'ठेव' ही पैशाची प्राप्ती किंवा मौल्यवान वस्तुची स्वीकृती या आश्वासनावर करण्याचे अभिप्रेत आहे की विशिष्ट कालावधीनंतर वित्तीय

आस्थापनांद्वारे अशा पैशाची किंवा मौल्यवान वस्तूची वापसी / परतफेड किंवा अन्यथा केली जाईल".

एमपीआयडी (MPID) कायद्याच्या कलम २ (सी) मध्ये 'ठेवी' ची व्यापक व्याख्या करण्यात आली आहे या वस्तुस्थितीकडे उच्च न्यायालयाने दुर्लक्ष केले आहे. पुढे, व्याख्येनुसार, परतावा एकतर पैसा, वस्तु किंवा सेवेमध्ये असू शकतो आणि वस्तु किंवा पैसा त्याच स्वरूपात परत करणे आवश्यक नाही. या व्याख्येमध्ये पैशाची प्राप्ती आणि वस्तूचा परतावा किंवा अगदी वस्तुची प्राप्ती आणि सेवेच्या स्वरूपात परतावा यांचा समावेश होतो. पुढे, उपविधी १०.८ असे दर्शविते की की एनएसईएल (NSEL) हा केवळ मध्यस्थ नव्हता. उपविधीमध्ये असे म्हटले आहे की खरेदीदार क्लिअरिंग हाऊसला डिलिव्हरी वाटणीचे मूल्य अदा करेल. तथापि, डिलिव्हरीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, पैसा एनएसईएल (NSEL) च्या क्लिअरिंग हाऊसकडे ठेवला जाईल.

५९. कॉन्ट्रॅक्ट नोट्स आणि इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्म वर तयार केलेल्या पुष्टीकरणाच्या पावत्यांचा संदर्भ देत, उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की एनएसईएल (NSEL) हे केवळ एक 'माध्यम' आहे. तथापि, उच्च न्यायालयाने नंतर नमूद केले की 'या व्यवहारांमध्ये कुठेतरी काहीतरी चूक झाली आहे'. पुढे, उच्च न्यायालयाने श्री. पंकज सराफ यांनी दाखल केलेल्या प्रथम खबरी अहवालाचा संदर्भ देत असे निरीक्षण नोंदवले की तक्रारदाराने देखील आपण एनएसईएल (NSEL) कडे कोणतीही रक्कम जमा केल्याचे सांगितले नव्हते. न्यायालयाने पुढे अशी नोंद घेतली आहे :-

> " प्रथम खबरी अहवालामधील (FIR) तक्रारदार कोणत्याही प्रकारे व्याज, बोनस, नफा या स्वरूपात परतावा देण्याचे वचन दिल्याचे अभिकथन करत नाही, परंतु उत्पन्न-टी +२ आणि टी+ ३०/३३/२५ या दोन ट्रेडिंग तारखांमधील वस्तुच्या किंमतीतील फरक हा उत्पन्न म्हणून मोजला गेला होता, परंतु आमच्या मते, हे ठेवीच्या कक्षेत येणार नाही, कारण एनएसईएल (NSEL) ला स्वत:कडे ठेवण्यासाठीच्या वस्तू मिळाल्या नाहीत किंवा त्याच्या खात्यात जमा करण्यासाठी कोणतीही रक्कम प्राप्त झाली नाही".

६०. उच्च न्यायालयाने न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ३३ मध्ये असेही निरीक्षण नोंदवले की जास्तीत जास्त, केवळ टी + २ मधील विक्रेत्यांना (आणि टी + २५ मधील खरेदीदारांना) 'वित्तीय आस्थापना' म्हणून संबोधले जाऊ शकते. अधिनियमाच्या कलम २ (सी) आणि २(डी) च्या तुलनेत एक्सचेंजच्या कार्याचे विश्लेषण न करता हा निष्कर्ष काढण्यात आला. न्यायालयाने असेही म्हटले आहे की 'वेअरहाऊस पावत्या' प्लॅटफॉर्मवर झालेल्या व्यवहाराचे स्वरूप स्थापित करत नाहीत. या संदर्भात त्यांनी असे निरीक्षण नोंदवलेः

> "...... ही पावती एनएसईएल (NSEL) च्या प्लॅटफॉर्मवर झालेल्या व्यवहाराच्या स्वरूपाचे उत्तर देत नाही आणि जरी वस्तु ठेवी म्हणून स्वीकारली गेली यात शंका नाही, परंतु ती खात्रीशीर परताव्यासह स्वीकारली गेली पाहिजे आणि सध्याच्या प्रकरणात, जी वस्तु स्वीकारली गेली ती यासाठी की खरेदीदाराला विकायची होती आणि सरकार पक्षाचे असे म्हणणे नाही की हा निव्वळ व्यवहार होता जिथे वस्तू ठेव म्हणून स्वीकारल्या जातात".

उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की ट्रॅन्जेक्शन चार्जेस (व्यवहार शुल्क) एनएसईएल (NSEL) द्वारे आकारले जात असल्याने आणि खरेदीदाराने दिलेली रक्कम सेटलमेंटच्या तारखेपर्यंत एनएसईएल (NSEL) द्वारे दिली जात असल्याने, ती वित्तीय आस्थापना नाही.

६१. उच्च न्यायालयाने चुकीचे मत बनवले आहे की, एकतर जर परताव्यामध्ये व्याज, बोनस किंवा इतर कोणताही अतिरिक्त लाभ असेल तरच तो एमपीआयडी (MPID) अधिनियमाच्या संदर्भात ठेव समजला जाईल. तथापि, कलम २ (सी) मध्ये असे म्हटले आहे की परतावा व्याज, बोनस, नफा किंवा इतर कोणत्याही स्वरूपात कोणत्याही लाभासह किंवा त्याशिवाय असू शकतो. या व्याख्येमध्ये असे नमूद केलेले नाही की अतिरिक्त लाभ असणे आवश्यक आहे, त्याऐवजी वाढीव लाभ व्याख्येच्या कक्षेसाठी अप्रासंगिक आहे; दुसरे म्हणजे, कलम २ (सी) च्या कक्षेत, वस्तु किंवा पैश्यांची प्राप्ती राखून ठेवली गेली पाहिजे. या व्याख्येमध्ये अशा कोणत्याही निर्बंध नाही. त्याऐवजी, मर्यादित हेतूसाठी वस्तूंचा ताबा देखील समाविष्ट करण्यासाठी ही व्याख्या व्यापकपणे शब्दबद्ध केली आहे. उच्च न्यायालयाने

एमपीआयडी (MPID) अधिनियमाच्या हितकारक उद्देशाचा कोणताही संदर्भ न देता ‘ठेव’ ह्या शब्दाची संकुचित व्याख्या विचारात घेतली.

६२. उच्च न्यायालयाने फौजदारी कारवाईच्या गुणदोषावरही निरीक्षणे नोंदवली. देय रक्कम चुकवण्यात एनएसईएल (NSEL) च्या भूमिकेचा संदर्भ देताना असे निरीक्षण नोंदवले गेले आहे की एनएसईएल (NSEL) चे कृत्य हे भा. द. वि. च्या कलम ४६५ आणि ४६७ अंतर्गत गुन्हेगारी ठरेल. ईओडब्ल्यू (EOW) ने कलम १२० (बी), सह -कलम ४०९, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४ आणि ४७७ (४) अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांसाठी एमपीआयडी (MPID) कायद्यांतर्गत विशेष न्यायालयाच्या सत्र न्यायाधीशांसमोर कलम १७३ फौ.प्र. सं. अंतर्गत आरोपपत्र दाखल केले. एनएसईएल (NSEL) ही एमपीआयडी (MPID) अधिनियमान्वये वित्तीय आस्थापना आहे की नाही या मुद्द्यापुरती रिट याचिका मर्यादित असताना उच्च न्यायालयाने फौजदारी कारवाईच्या गुणदोषावर निरीक्षणे करायला नको होती.

६३. उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की **६३ मून्स** (उपरोल्लेखित) मधील या न्यायालयाच्या निर्णयाचा 'सध्याच्या कार्यवाहीवर कोणताही गंभीर परिणाम होत नाही', जरी या न्यायालयाने एक्सचेंजच्या संरचनेवर प्रकाश टाकून ट्रेडिंग मेंबर्सची फसवणूक करण्याच्या एनएसईएल (NSEL) च्या *कार्यपद्धतीवर* दीर्घ चर्चा केली आहे. **भास्करन** (उपरोल्लेखित), **न्यू होरायझन्स** (उपरोल्लेखित), **सोनल हेमंत जोशी** (उपरोल्लेखित) आणि **विजय कुलिजल** (उपरोल्लेखित) यांच्या प्रकरणांमध्ये संवैधानिक वैधतेचा प्रश्न निकाली काढण्यात आल्याचे दिसून आले असले तरी, एमपीआयडी (MPID) अधिनियमाच्या संवैधानिक वैधतेस उत्तरवादीने दिलेले आव्हान उच्च न्यायालयाने अजूनही खुले ठेवले होते. न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ३९ मधील अशा निरीक्षणांची दाखल घेऊन सुद्धा की **भास्करन** (उपरोल्लेखित) मध्ये या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले होते की एमपीआयडी (MPID) अधिनियम आणि तामिळनाडू अधिनियम यात किरकोळ फरक आहेत आणि हा कायदा संविधानाच्या अनुच्छेद १४, १९ (१) (जी) किंवा २१ चे उल्लंघन करत नाही, सदर निरीक्षण नोंदवले गेले.

६४. पुढे, एमपीआयडी (MPID) अधिनियमान्वये एनएसईएल (NSEL) ही एक 'वित्तीय आस्थापना' असल्याचे प्रथमदर्शनी नोंदवण्यात आले होते, त्या १ ऑक्टोबर २०१५ रोजीच्या खंड न्यायाधीशमंडळाच्या आधीच्या आदेशाचा संदर्भ देताना उच्च न्यायालयाने असे

निरीक्षण नोंदवले की ते प्रथमदर्शनी दृष्टिकोनास बांधील नाही. १४ ते १६ टक्के उत्पन्नाचे आश्वासन देणारी निवेदने हे प्रथमदर्शनी दृष्टिकोनापर्यंत पोहोचण्यासाठी खंड न्यायाधीशमंडळासाठी प्राथमिक आधार होते. तथापि, उच्च न्यायालयाने आपल्या आक्षेपित न्यायनिर्णयात हा युक्तिवाद या आधारावर फेटाळून लावला की खात्रीशीर परताव्यासाठी केवळ 'क्षीण संदर्भ' देण्यात आला होता. असे निरीक्षण दस्तावेजी सामग्रीद्वारे समर्थित असलेल्या तथ्यात्मक घटनांचे चुकीचे वर्णन करते.

६५. एमपीआयडी (MPID) कायद्याच्या कलम ७ अंतर्गत नियुक्त न्यायालयासमोर आक्षेप नोंदवण्याचा पर्यायी उपाय असल्याने उत्तरवादीने दाखल केलेली रिट याचिका दाखल करून घेण्यायोग्य नाही, असा युक्तिवादही अपीलकर्त्याने केला. अपीलकर्त्याच्या युक्तिवादात जरी गुणवत्ता असली तरी, उच्च न्यायालयाने आक्षेपित जप्तीच्या अधिसूचनेच्या वैधतेवर गुणदोषाच्या आधारे निर्णय घेतल्यामुळे आणि सध्याच्या कार्यवाहीत युक्तिवाद हाताळले गेल्यामुळे, आम्ही गुणवत्तेनुसार या प्रकरणाचा निर्णय घेण्यासाठी पुढे गेलो आहोत.

६६. या निकालात नोंदवलेल्या कारणांमुळे, आम्ही अपील मंजूर करतो आणि दिनांक २२ ऑगस्ट २०१९ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचा आक्षेपित न्यायनिर्णय रद्द करतो. एमपीआयडी (MPID) अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत उत्तरवाद्यांच्या मालमत्तांना जप्त करण्यासाठीची जारी केलेली आक्षेपीत अधिसूचना वैध आहे.

६७. प्रलंबित असलेले अर्ज (असल्यास) निकाली काढले जातात.

अपील मंजूर.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

**X–X–X-X**